CMYK

गुढी पाडवा
गुढी उभारू या, आनंद साजरा करू या,
नव्या आशांनी नववर्ष स्वागत करू या...
सर्वांना गुढीपाडव्याच्या मंगलमय शुभेच्छा...

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | गुरुवार, १९ मार्च २०२६ । वर्ष ४ थे अंक ११ । पाने १२ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महत्वाचे...

### सीबीआय चौकशीसाठी देवेंद्र फडणवीसांचे अमित शहांना पत्र

**मुंबई :** अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत आ. रोहित पवार यांनी संशय व्यक्त करत राज्य सरकारने सीबीआय चौकशीसाठी केंद्राला अद्याप पत्र दिले नसल्याचा गंभीर आरोप केला होता. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना सीबीआय चौकशीच्या मागणीसाठी लिहिलेले अधिकृत पत्र समोर आले आहे. तर पत्रासोबत रोहित पवारांच्या मागणीचे पत्रही जोडले आहे. यामुळे या प्रकरणाला आणि राजकीय चर्चांना मोठी कलाटणी मिळाली आहे.

### पर्यावरण कर होणार दुप्पट; विधेयक एकमताने मंजूर

**मुंबई :** महाराष्ट्र विधिमंडळात आज 'महाराष्ट्र मोटर वाहन कर (सुधारणा) विधेयक, २०२६' एकमताने मंजूर केले असून, यामुळे राज्यातील जुन्या आणि प्रदूषणकारी वाहनांवरील



पर्यावरण करात वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या विधेयकाची माहिती देताना स्पष्ट केले की, वाढत्या वायू प्रदूषणावर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासोबतच पर्यावरण संरक्षण, आर्थिक शिस्त आणि औद्योगिक विकास यांचा समतोल साधण्याच्या दृष्टीने हे विधेयक अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. दुचाकी वाहनांसाठीचा पर्यावरण कर २००० रुपयांवरून ४००० रुपये, पेट्रोल वाहनांसाठी ३००० रुपयांवरून ६००० रुपये, तर डिझेल वाहनांसाठी ३५०० रुपयांवरून ७००० रुपये इतका वाढवण्यात आला आहे.

# महसूल विभागाकडून दीड लाख शेतकऱ्यांची फसवणूक

## मंत्री बावनकुळे : सातबाऱ्यावर फेरफार, दोषींवर तात्काळ कारवाई

**मुंबई, दि. १८ मार्च -**

महाराष्ट्राच्या महसूल विभागात मोठा गैरप्रकार झाल्याचे उघडकीस आले आहे. जमिनीच्या सातबारा उताऱ्यातच फेरफार करून तब्बल एक ते दीड लाख शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याची कबुली सरकारने दिली आहे. महाराष्ट्र जमीन महसूल कायद्याच्या कलम १५५ चा गैरवापर करून महसूल अधिकाऱ्यांनी बेकायदेशीर आदेश पारित केल्याने हा प्रकार घडला असल्याचे समोर आले आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल कायद्यातील कलम १५५ चा वापर ७/१२ मधील उताऱ्यातील लेखनदोष किंवा शुद्धलेखनातील चुका दुरुस्त करण्यासाठी केला जातो. मात्र, पुण्यातील काही महसूल अधिकाऱ्यांनी या कलमचा गैरवापर करत जमिनीच्या मालकी हक्कतच परस्पर बदल केले आहेत. जुलै-ऑगस्ट २०२५ च्या काळात हा गैरप्रकार झाल्याचे उघडकीस आले आहे. शिवसेना ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी या विषयाकडे लक्ष वेधले होते. त्यानंतर या घटनेची व्याप्ती व गांभीर्य लक्षात घेता विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी समिती नेमण्यात आली होती. विभागीय आयुक्तांनी सादर केलेल्या अहवालात महसूल प्रशासनातील या गैरप्रकारावर प्रश्न उपस्थित करण्यात आले. चौकशीत असे समोर आले की अनेक प्रकरणांत मूळ मालकाची संमती नसताना देखील ७/१२ मध्ये बदल करण्यात आले आहेत. तसेच नियमबाह्य पद्धतीने बेकायदेशीर आदेश पारित करून खाजगी हितसंबंध जपल्याचे समोर आले आहे.

### सर्वात मोठा घोटाळा : मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

या घटनेवर विधान परिषदेत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्टीकरण देत झालेल्या चुकीची कबुली दिली आहे. ते म्हणाले, शुद्धलेखनात बदल करण्याच्या नावाखाली सातबारा बदलले गेले, ही बाब गंभीर आहे. महसूल खात्याच्या इतिहासातील हा आत्तापर्यंतचा सर्वात मोठा घोटाळा असू शकतो, असे त्यांनी म्हटले आहे. तसेच जवळपास एक ते दीड लाख शेतकरी या प्रक्रियेत भरडले गेल्याचेही त्यांनी मान्य केले आहे.

### अधिवेशन संपायच्या आत दोषींवर होणार कारवाई

शिवसेना ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी या घोटाळ्यातील मुख्य सूत्रधार तसेच सहभागी अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. आता या प्रकरणी दोषी तहसीलदार ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत कोणावर कारवाई होणार याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे. अधिवेशन संपायच्या आत दोषींवर कारवाई करू, असे आश्वासन चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहे.

# सांगोल्यातील पेपर चोरी; विधी संघर्ष बालक ताब्यात

**पालकांच्या समक्ष चौकशी**

**गुन्हा केल्याची बालकाची कबुली**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर|सांगोला, दि. १८ मार्च-**

सांगोला विद्यामंदीर प्रशालेतील कस्टडी रुममध्ये ठेवलेले इयत्ता १० वी बोर्ड परिक्षेचे पेपर दिनांक १७ मार्च २०२६ रोजी अज्ञात इसमाने चोरुन नेल्याबाबत सांगोला पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. हा गुन्हा अल्पवयीन विधी संघर्ष बालकाने केल्याचे तपासात उघड झाले. पालकांच्या समक्ष सविस्तर चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली.

गुन्ह्या करते वेळी वापरलेले इलेक्ट्रीक कटर, इलेक्ट्रीक मोटार सायकल, चोरीस गेलेले इयत्ता १० वी बोर्ड परिक्षेच्या प्रश्न पत्रिका व तीन कोऱ्या उत्तर पत्रिका जप्त करण्यात आल्या. सदर गुन्ह्याचा अधिक तपास पुढे चालू आहे. ही कामगिरी विशेष पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी, एसपी अतुल कुलकर्णी, ॲडिशनल एसपी प्रितम यावलकर, उपविभागीय अधिकारी डॉ. बसवराज शिवपुजे, पोलीस निरीक्षक संजय जगताप याच्या मार्गदर्शनाखाली आणि सांगोल्याचे पोलीस निरीक्षक विनोंद घुगे यांच्या आदेशान्वये सपोनि वाघे, सपोनि मोरे सपोनि विजय शिंदे, सपोनि भाऊसाहेब गोसावी स्थानिक गुन्हे शाखा, पोसई पुजारी, पोसई पाटील, मपोसई चव्हाण, पोहेकॉ वाघमोडे, अस्लम काझी, वजाळे, राजगे, सावंत, प्रमोद गवळी, संतोष देवकर, क्षीरसागर, जाधव, पोना लेंगरे, पोकॉ पाटील, पोकों मारुती पांढरे, माळी, कुंभार, राजु आवटे, पोकॉ अमोल वाडकर, रमेश सुर्यवंशी, पोना इरकर, पोकों वाघमोडे, यांनी केली तर अधिक तपास सपोनि मोरे करीत आहे.

# जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी वैद्य; उपाध्यक्षपदी इंद्रजीत पवार बिनविरोध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ मार्च-**



सोलापूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी बार्शीचे दिपक वैद्य तर उपाध्यक्षपदी उत्तर सोलापूर तालुक्याचे इंद्रजीत पवार यांची बिनविरोध निवड झाली आहे. अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी 'सव्वा-सव्वा वर्ष' असा फॉर्म्युला ठरला आहे. जिल्हा परिषद स्थापनेच्या इतिहासात पहिल्यांदाच सोलापूर जिल्हा परिषदेवर भाजपाचे बहुमत आणि अध्यक्ष निवड झाली आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून जिल्हा परिषदेचा अध्यक्ष आणि उपाध्यक्ष कोण होणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार बंद लिफाफामध्ये अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदाची नावे सोलापुरात आल्यानंतर अर्ज सादर करावयाच्या दिवशी बुधवार, १८ मार्च रोजी सकाळी पावणे बारा वाजता भाजप जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण आणि चेतनसिंह केदार यांच्यासह गटनेत्या रश्मी बागल, नेताजी खंडागळे, बालाजी नरोटे आदींनी पुढाकार घेत अध्यक्षपदासाठी दीपक वैद्य तर उपाध्यक्ष पदासाठी इंद्रजीत पवार या दोघांचे अर्ज दाखल केले. यावेळी व्यासपीठावर साहाय्यक निवडणूक निर्णयाधिकारी संतोष देशमुख, उपजिल्हाधिकारी लक्ष्मण कसेकर, तहसीलदार पूनम दंडीले यांनी अर्ज स्वीकारले. अध्यक्ष अर्जासाठी बालाजी नरोटे सूचक तर नेताजी खंडागळे अनुमोदक राहिले तर उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांच्या अर्जासाठी पृथ्वीराज माने हे सूचक तर चेतनसिंह केदार हे अनुमोदक राहिले. जिल्हाधिकारी तथा पीठासन अधिकारी कुमार आर्शीवाद यांनी निवडणुकीची प्रक्रिया चोखपणे पार पाडली.

**(सविस्तर वृत्त पान ६ आणि पान ९ वर)**

# नाशिकचा 'हायप्रोफाईल' भोंदू बाबा जेरबंद

**पुणे, दि. १८ मार्च -**

नाशिकमधील स्वयंघोषित ज्योतिषी अशोक खरात उर्फ 'कॅप्टन' याला बलात्कार आणि भोंदूगिरी प्रकरणी अटक झाल्यानंतर आता या प्रकरणावर राजकीय प्रतिक्रिया उमटत आहेत. महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या 'छत्रछाये'खालीच अशा भामट्यांचे उद्योग सुरू आहेत, असा घणाघाती आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी केला आहे. यासोबतच त्यांनी रूपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याची अप्रत्यक्ष मागणी देखील केली आहे.

एका ३५ वर्षीय महिलेला गुंगीचे औषध देऊन तिच्यावर अत्याचार केल्याच्या आरोपाखाली नाशिक गुन्हे शाखेच्या युनिट १ ने अशोक खरातला अटक केली. खरातच्या ताब्यातून पोलिसांनी एक पेनड्राइव्ह जप्त केला असून, त्यात ५८ आक्षेपार्ह व्हिडीओ आढळल्याने खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे अनेक राजकीय नेते, अधिकारी, सेलिब्रिटी आपले भविष्य जाणून घेण्यासाठी अशोक खरात याच्याकडे जात होते. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर या अशोक खरात याच्या संस्थेवर पदाधिकारी म्हणून आहेत. यावरून सुषमा अंधारे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत रूपाली चाकणकर यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### सेंट थॉमस स्कूलच्या पायल लोंढेची महाराष्ट्र फुटबॉल संघात निवड




**सोलापूर, दि.१८ मार्च-**

येथील सेंट थॉमस स्कूलच्या पायल लोंढेची महाराष्ट्र फुटबॉल संघात निवड झाली. खेलो इंडिया व अस्मिता फाउंडेशन पुरस्कृत १३ वर्षाखालील मुलींच्या फुटबॉल स्पर्धेत सेंट थॉमस स्कूल उपविजयी झाला होता. यातून महाराष्ट्र संघ निवड चाचनित स्कूलच्या पायल लोंढे, मरियम शेख, उर्वी गायकवाड व कृतिका वजमाने यांची निवड झाली होती. यातुन पायल ची महाराष्ट्र संघात निवड झाली. या स्पर्धा गुजरात मधील भावनगर संपन्न झाल्या. तिचे मुख्याध्यापक फादर रॉबिन, क्रीडा शिक्षक राजेंद्र गायकवाड, अमित येवलेकर आदींनी अभिनंदन केले.



### मंगळवेढ्यातील घरनिकी येथे काँग्रेस पक्षाच्या शाखा स्थापनेचे उद्घाटन

**मंगळवेढा, दि. १८ मार्च-**

मंगळवेढ्यातील मौजे घरनिकी येथे काँग्रेस पक्ष शाखेचे उद्घाटन जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हा काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष ॲड. नंदकुमार पवार, ॲड.अर्जुनराव पाटील, प्रदेश सचिव ॲड. रवीकिरण कोळेकर, सरचिटणीस दिलीप जाधव, मंगळवेढा तालुका काँग्रेसचे अध्यक्ष प्रशांत साळे, शहर अध्यक्ष ॲड. राहुल घुले, मुबारक शेख, जिल्हा परिषदेचे उमेदवार दत्तात्रय खडतरे, कविता खडतरे यांच्या प्रयत्नातून मंगळवेढा तालुक्यात गाव तेथे काँग्रेसची शाखा स्थापन होत आहेत. यावेळी दत्तात्रय खडतरे, कविता खडतरे, दिलीप जाधव, मुबारक शेख, अविनाश मोरे, काकासाहेब मोरे, उपसरपंच चाँदसाहेब मुलाणी, बालाजी गरड, तानाजी वाघमारे, लालासाहेब मुलाणी, पैगंबर मुलाणी, शरद क्षीरसागर, चांद मुलाणी, मारुती गरड, समीर मुलाणी, बापू मुलाणी, संभाजी मोरे तानाजी मोरे, दादा क्षीरसागर, सज्जन मोहिते उपस्थित होते.

### विश्व हिंदु महासंघाचा आज धर्म संरक्षण संकल्प सोहळा

**मंगळवेढा, दि. १८ मार्च-**

हिंदु नव वर्ष स्वागत आणि धर्म संरक्षण संकल्प सोहळा गुरूवार दि. १९ मार्च रोजी सकाळी १० वाजता चाटी गल्ली क्रांती चौक येथे होणार आहे. सायंकाळी भव्य शोभा यात्रा बाळीवेस येथे काढण्यात येणार असल्याची माहिती प्रदेश अध्यक्ष नंदकिशोर झंवर यांनी दिली. चैत्र पाडवा म्हणजेच हिंदु नव वर्ष या निमित्ताने हिंदु नव वर्षाचे स्वागत मोठ्या जल्लोषात करण्यासाठी त्याचबरोबर धर्म संरक्षण संकल्प सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये भगवा ध्वजाचे पूजन, नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती, धर्म संरक्षण संकल्प आणि विविध मान्यवरांचे सत्कार असा हा कार्यक्रम असल्याचे यावेळी सांगण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हाध्यक्ष सुयश खानापुरे, जिल्हा संघटन महामंत्री कपिल कोळी शहराध्यक्ष उपेंद्र दासरी, शहर संघटन महामंत्री सागर तांबोळकर हे प्रयत्न करीत आहेत.



### अकलूजमध्ये गुढी पाडवा पट वाढवा उपक्रम

**अकलूज, दि. १८ मार्च-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुले दोन व मुली तीन अकलूज येथे प्रवेशोत्सवा अंतर्गत आज शैक्षणिक गुढी उभारण्यात आली. रांगोळीच्या पायघड्या, फुग्यांची सजावट, डोक्यावर मुकुट, सेल्फी पॉईंट, पहिल्याच दिवशी स्कूल बॅग, गुणवत्तेची गुढी, गोड खाऊ आणि हलगीच्या तालावर झालेले स्वागत. यामुळे मुले आणि पालक खूप आनंदी झाले. कार्यक्रमाप्रसंगी मुले दोनच्या मुख्याध्यापिका सुकुमारी अंगुले, मनीषा बळवंतराव, श्रीमती अंजली अडाणे, दत्तात्रय गायकवाड, तय्यब शेख, श्रीकांत राऊत, फातिमा मुलाणी, श्रीमती हजराबी बांगी तसेच मुली तीन शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय कोरे, महादेव नागणे, रेखा कोळी, सुरेय्या कोरबु, पांडुरंग मोहिते, समीर कोरबू, वर्षा राणी जाधव, करीना शेख उपस्थित होते.

# सोलापूर महापालिका सभेत पुतळ्यांसह विविध प्रस्ताव

## विविध विकासकामे, पाणीपुरवठा, झोपडपट्टी पुनर्वसनासह महत्त्वाचे प्रस्ताव सभेपुढे येणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

महापालिकेच्या मार्च महिन्यातील सर्वसाधारण सभेसाठी पुरवणी अजेंडा प्रसिद्ध झाला असून विविध विकासकामे, पुतळे उभारणी, पाणीपुरवठा, झोपडपट्टी पुनर्वसन आदी महत्त्वाचे प्रस्ताव सभेपुढे मांडण्यात येणार आहेत. महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा शुक्रवार, दि. २० मार्च रोजी सकाळी साडेअकरा वाजता होणार आहे.

अजेंड्यात माता जिजाऊ, वीरांगणा राणी अवंतीबाई लोधी तसेच माजी महापौर महेश कोठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यांच्या उभारणीचे प्रस्ताव समाविष्ट आहेत. शहरातील विविध ठिकाणी हे पुतळे उभारण्याबाबत नगरसेवकांनी स्वतंत्र प्रस्ताव




सादर केले आहेत. तसेच लिंगायत स्मशानभूमीच्या देखभालीचे काम सिद्धेश्वर देवस्थानाकडे सोपवण्याचा प्रस्तावही सभेत चर्चेला येणार आहे.

पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक २३ मध्ये उंच पाणी साठवण टाकी उभारण्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. वाढती लोकसंख्या आणि अपुरा पाणीपुरवठा लक्षात घेता हा प्रस्ताव महत्त्वाचा मानला जात आहे. याशिवाय प्रभाग २१ मधील महाराणा प्रताप झोपडपट्टीतील रहिवाशांना

**महत्त्वाचे प्रस्ताव असे**
- राजमाता जिजाऊ, राणी अवंतीबाई लोधी व महेश कोठे यांच्या पुतळ्यांचे प्रस्ताव
- प्रभाग २३ मध्ये पाणीटाकी उभारणीचा प्रस्ताव
- झोपडपट्टी पुनर्वसन व न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी
- पर्यटनासाठी वेबसाईट, ठव बोर्ड व विशेष बस सेवा
- संभाजी तलाव कामांची चौकशी व अक्कलकोट रोडवर पादचारी पूल प्रस्ताव.

न्यायालयाच्या आदेशानुसार घरे बांधून देण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला आहे.

शहराच्या पर्यटन व धार्मिक स्थळांच्या विकासासाठी स्वतंत्र वेबसाईट, माहिती फलक, क्यू आर कोडसह डिजिटल बोर्ड आणि विशेष बस सेवा सुरू करण्याची मागणीही अजेंड्यात आहे. तसेच डी-मार्ट ते विजापूर हायवे रस्त्याच्या कामातील अनियमिततेची चौकशी व डांबरीकरणाची मागणी करण्यात आली आहे. मनिष केत व सारिका खजुरगी यांनी सोलापूर शहरातील धार्मिक व पर्यटन क्षेत्राबाबत महापालिकेने स्वतंत्र वेबसाईट काढावी यासह इतर मुद्द्यांबाबत प्रस्ताव ठेवला आहे.

धार्मिक स्थळे व पर्यटनाबाबत शहरामध्ये ठिकठिकाणी माहिती फलक तयार करावेत व सोलापूर विमानतळ, एस.टी.स्टँड, रेल्वे स्टेशन अशा महत्वाच्या ठिकाणी ते लावण्यात यावे. तसेच वरील ठिकाणांचे अंतर आणि डिजिटल माहितीसाठी क्यू आर कोडसह डिजिटल बोर्ड उभारावेत तसेच धार्मिक स्थळे व अन्य महत्वाची ठिकाणे दाखविण्यासाठी परिवहन विभागाकडून स्वतंत्र बस सेवा उपलब्ध करावी असे प्रस्तावात म्हटले आहे. दरम्यान, छत्रपती संभाजी तलावातील १८ कोटींच्या विकासकामांची चौकशी करण्याचा आणि अक्कलकोट रोडवर अपघात टाळण्यासाठी लोखंडी पादचारी पूल उभारण्याचा प्रस्तावही सभेपुढे ठेवण्यात आला आहे. या सर्व मुद्द्यांवर सभेत सविस्तर चर्चा होण्याची शक्यता आहे.



# ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालय द्वितीय
## राष्ट्रीय जीआरपी हॅकेथॉपन राष्ट्रीय स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

तळे हिप्परगा येथील नागेश करजगी ऑर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी येथील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील जीआरपी हॅकेथॉपन २०२५ या स्पर्धेत द्वितीय स्थान मिळवले असून त्यांना रु. २ लाखांचे रोख बक्षीस मिळाले. महाराष्ट्र व गुजरात राज्यांमधून निवडलेल्या केवळ आठ संघांमध्ये या महाविद्यालयाच्या संघाचा समावेश होता.

जीआरपी लिमिटेडतर्फे आयोजित केलेल्या या हॅकाथॉनमध्ये अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना टायर पावडरचा पुनर्वापर करून सस्टेनेबल उत्पादने विकसित करण्याचे आव्हान देण्यात आले होते. त्यांनी टायर पावडरचा अभिनव वापर करून पर्यावरणपूरक उत्पादनाची कल्पना मांडत सादरीकरण केले. यात विद्यार्थ्यांनी रिसायकलिंग प्रक्रिया, मटेरिअल टेस्टिंग आणि व्यावसायिक मॉडेल विकसित करून पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाची प्रभावी मांडणी केली.या संघास डॉ. आर. आर. पाटील, प्रा. आर. जी. मस्के आणि डॉ. व्ही. एस. हिरेमठ यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष, सचिव तसेच सर्व विश्वस्त मंडळ, प्राचार्य डॉ. बी. के. सोनगे, उपप्राचार्य डॉ. एस. एस. मेतन ,डॉ. व्ही. के. पत्की तसेच स्थापत्य व यांत्रिक अभियांत्रिकी विभागप्रमुख यांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले.

**कामगिरी केलेला संघ :** स्थापत्य अभियांत्रिकी शाखा : वैष्णवी सावंत, सानिया शेख, मोईन शेख आणि कु. साफी सगरी यांनी (टायर पावडरचा स्ट्रक्चरल वापर सिद्धांत विकसित).

यांत्रिक अभियांत्रिकी शाखा : वैष्णवी अरवत, वर्षा मंठाळकर, स्नेहल शिंदे, दर्शन गंगजी, गणेश लिंबोळे (टायर पावडर प्रक्रिया यंत्रणा व उत्पादन तंत्रज्ञान विकसित) या यशस्वी आयोजनासाठी आणि विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण संशोधनासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल लिमिटेडच्या संपूर्ण टीमचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.






सोलापूर : रिक्षामध्ये एलपीजी गॅस भरण्यासाठी जुळे सोलापूर परिसरातील गॅस पंपावर बुधवारी रिक्षाच्या रांगा लागल्या होत्या. (छायाचित्र : केवल तिवारी)

# पूररेषेतील बांधकामांवर बंदीमुळे
## चंद्रभागा तीरावरील नागरिक अडचणीत
### ● नगरसेवक विक्रम शिरसट यांची मुख्याधिकाऱ्यांकडे धाव

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १८ मार्च-**

राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने पंढरपूर शहरातील चंद्रभागा नदीच्या तीरावर असलेल्या पूर रेषेच्या तसेच ज्या भागांमध्ये पूर परिस्थिती निर्माण झाल्यानंतर पुराचे पाणी साठत आहे. अशा सखल भागात नवीन बांधकाम करण्यास परवानगी न देण्याचा निर्णय नगर विकास विभागाच्या वतीने घेण्यात आला आहे. त्यामुळे पंढरपूर शहरातील दाट लोकवस्ती असलेल्या गोविंदपुरा, हरिदास वेस, भजनदास चौक, घोंगडे गल्ली, जुनी पेठ, संत पेठ प्रदक्षणा मार्ग , केंद्रेकर महाराज मठ आदी भागातील नागरिकांची गैरसोय होत आहे.

राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडून घेण्यात आलेल्या निर्णयामुळे या भागातील नागरिकांमधून मोठा संताप व्यक्त केला जात आहे. या भागामध्ये अनेक जुने वाडे, जुन्या बिल्डिंग, मठ आहेत त्याची बांधकाम दुरुस्ती करण्याची प्रक्रिया नागरिकांकडून सुरूच



असते. परिस्थिती निर्माण झाल्यामुळे या भागातील अनेक घरांना धोका निर्माण झालेला असतो त्यामुळे कालांतराने या भागातील बांधकामे नव्याने करावी लागतात. मात्र शासनाच्या या निर्णयामुळे या भागातील नागरिकांची मोठी गैरसोय निर्माण झाली आहे. उजनी धरणामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये पाणी आल्यानंतर उजनीतून भीमा नदीच्या पात्रामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये विसर्ग सोडण्यात येतो. त्यामुळे पंढरपूरला पूर जन्य परिस्थिती निर्माण होते. नदीपात्राच्या लगत असलेल्या भागांमध्ये पुराचे पाणी येऊन या भागातील अनेक घरामध्ये पूर परिस्थिती निर्माण होते. यामुळे जनजीवन विस्कळीत होते. पुरामुळे अनेक घरांची पडझड होत असते. पुराचे पाणी मोठ्या प्रमाणामध्ये घरामध्ये साचल्यामुळे घराचे भिंतीची, मोठे नुकसान देखील होते. त्यामुळे या भागातील नागरिकांना त्यांच्या घराची वेळोवेळी दुरुस्ती करणे गरजेचे असते. मात्र पूररेषेच्या आत असलेल्या निवासी ठिकाणी संबंधित भागांमध्ये नवीन बांधकाम करण्यास परवानगी न देण्याचा निर्णय नगर विकास विभागाच्या वतीने घेण्यात आलेला आहे. नगरसेवक विक्रम शिरसट यांनी नाराजी व्यक्त केली आहे. प्रशासनाला यावर योग्य त्या उपाययोजना करण्याबाबत विनंती केली आहे. मुख्याधिकारी महेश रोकडे यांची भेट घेऊन नगरसेवक शिरसट व वाळूजकर यांनी यावर तोडगा काढण्याची मागणी केली.




# नियमाचे उल्लंघन केल्यास नागरी बँकांना आर्थिक दंड
### ● रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे उपसरव्यवस्थापक माला लाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

रिझर्व्ह बँकेच्या व बँकिंग रेग्युलेशन ॲक्टच्या डायरेक्टिव्हज व नियमाचे उल्लंघन केल्यास नागरी बँकांना आर्थिक दंड ठोठावण्यात येतो त्याचा परिणाम बँकेच्या प्रतिमेवर होतो, असे मत आरबीआयचे उपसरव्यवस्थापक माला लाल यांनी व्यक्त केले

रिझर्व्ह बँकेचे नागरी सहकारी बँकेतील संचालक मंडळासाठी Importance of Governance या विषयावर प्रशिक्षणप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को ऑप बँक्स ॲंड केडीट सोसायटी लि, नवी दिल्ली व सोलापूर जिल्हा बँक्स असोसिएशनचे दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाले. यावेळी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे मॅनेजर सिओल उके यांनी रिझर्व्ह बँक ही मुख्यतः ठेवीदारांचा पैसा कसा सुरक्षित राहिल यासाठी नियंत्रण ठेवते व बँकेच्या धोरणनुसार कामकाज व कार्यपध्दती तपासते असे मार्गदर्शन केले.

यावेळी सीए. धनंजय गोखले, नॅफकबचे चिफ ॲडव्हायझर सुभाष गुप्ता यांनीही मार्गदर्शन केले. सोलापूर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.अशोक सुरवसे यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. नॅफकबचे असिस्टंट डायरेक्टर अनिल चौहान यांनी वक्त्यांचा परिचय करुन दिला. असोसिएशनचे उपाध्यक्ष दिपक मुनोत, सर्व संचालक राजगोपाल झंवर, सीए राजगोपाल मणियार, सीए किसन माळी, संगीता फाटे, संपादक राजेंद्र कोठावळे उपस्थित होते. संचालक दिनकर देशमुख व अस्मिता गायकवाड यांनी आभार मानले.

### आले नववर्ष आले..

आले मराठी नववर्ष आले
आगमनाने तयाच्या
कडुलिंब मोहरले..
कोकिळांनी नववर्षाचे
गीत गाईले ..
रांगोळ्यानी घरांचे
अंगण सजले..
गुढी उभारून
सकलजन आनंदले..
पक्वानाचां स्वाद
घरातूनी दरवले...
नवस्त्रानी स्त्रियांचे
सौंदर्य खुलले..
शुभेच्छांसाठी
कर-करांशी जुळले..
शब्दसुमनांनी अंतरमनी
भाव फुलले..
हेच आपुल्या
संस्कृतीने शिकविले..
आपुल्या संस्कृतीने
शिकविले ...
आले मराठी नववर्ष
आले...

- सुधीर कोटीकर
छत्रपती संभाजीनगर
मो.९७६५५५३३१२

# गुडी पाडव्याचा मानाचा 'पिसोळा'

**वसंत ऋतूच्या सुरुवातीला सुरु होणारा व सणांची सुरवात करून देणारा हिंदू नववर्षाचा पहिला दिवस व पहिला सण म्हणजे गुढीपाडवा. पाडव्याला घरोघरी गुडी उभारली जाते. महाराष्ट्रात विशेषतः पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यात गुडी उभारताना त्यास साखरेचा हार व कडुलिंबाच्या पानांचे तोरण बांधतात आणि गुडी उभारल्यानंतर कडुलिंबाची फुले, हरभऱ्याची भिजवलेली कच्ची डाळ, जिरे आणि गूळ मिसळून बनवलेला 'भोलाना' प्रसाद म्हणून सकाळी रिकाम्या पोटी खाण्यास देतात. निरोगी आरोग्याच्या दृष्टीने कडुनिंब हा त्याच्या विशेष औषधी गुणधर्मांसाठी ओळखला जातो. हिवाळा संपून उन्हाळ्याची सुरुवात होताना या काळात बदलत्या हवामानामुळे होणारे ताप, संसर्ग यासारखे आजार रोखण्यासाठी गुळासोबत कडुलिंबाची पाने खाणे फायदेशीर आहे. मराठवाड्यात कुडूनिंबा प्रमाणेच 'पिसोळा' या वनस्पतीला त्याच्या औषधी गुणांमुळे पाडव्याच्या दिवशी अनन्य साधारण महत्व आहे. पारंपारिक औषधात दाह-शामक, वेदनाशामक आणि सूक्ष्मजीव-नाशक गुणधर्म असलेली पिसोळा ही वनस्पती सर्वज्ञात आहे. पाडव्याच्या दिवशी सकाळी अंघोळ करताना याची फुले असलेले फांदी पायाखाली घेऊन किंवा कानाच्या वर फुलोरा अडकवून अंघोळ करतात. किंवा काहीजण याची पाने व फुले अंघोळीच्या पाण्यात टाकून त्या पाण्याने अंघोळ करतात.**

पिसोळा किंवा 'कॉमन हिल स्पर्ज' ही वनस्पती 'दुधानी (युफोर्बियेसी)' कुळातील असून, 'युफोर्बिया रोथियाना' हे त्याचे शास्त्रीय नाव. पिसोळा हा बहुवर्षायु किंवा उपझुडूप, गुळगुळीत, सरळ वाढणारा आणि भरपूर फांद्या असलेला मुळचा भारत, श्रीलंका आणि आग्नेय आशियाच्या प्रामुख्याने दमट उष्णकटिबंधीय क्षेत्रात आढळतो. डोंगराळ, सदाहरित जंगलांच्या कडेला, काळ्या जमिनीवर तसेच काहीवेळा रस्त्यांच्या कडेला आढळणाऱ्या या वनस्पतीला भारतामध्ये धार्मिक महत्व आहे. पिसोळा वनस्पती साधारणतः १ मीटर उंचीपर्यंत वाढते, हे एक भरपूर फांद्या असलेले झुडूप आहे. संपूर्ण वनस्पतीमध्ये दुधाळ रस असतो. फांद्या गुळगुळीत असून लालसर छटा असतात. खोडाच्या टोकावर छत्रीसारख्या वर्तुळातून (वलयातून) नाजूक फांद्या फुटतात. पाने ५ ते १० सें.मी. लांब व एकाआड एक, रेखीय-लंबवर्तुळाकार, भाल्यासारखी आणि बिनदेठाची असतात. फुले २.५ ते ३ सें.मी. रुंद असतात. त्यामध्ये, नर फुले मादी फुलाच्या भोवती वेढलेली असतात. फुलांच्या अगदी खाली लहान, समोरासमोर (समुख) पाने असतात. फळे गोलाकार, गुळगुळीत, अंदाजे ६ मिमी व्यासाची असतात. बिया आयताकृती, एका बाजूला खाच असलेल्या असतात. जानेवारी ते जून महिन्यात फुले व फळे येतात.

मराठवाड्यातील ग्रामीण भागात काही लोकांना याची नीट ओळख नसल्याने, पिसोळा या नावाने दोन



वेगवेगळ्या वनस्पती वापरल्या जातात. 'युफोर्बिया रोथियाना' म्हणजे, खरा 'पिसोळा' ज्याची ओळख त्याच्या फुलोऱ्याच्या बुडाशी असलेल्या स्वतंत्र/देठ असल्यासारखे, मोठ्या गोलाकार व बुडाकडे हृदयाकृती पानासारख्या स्वतंत्र ब्रॅक्ट/छदपत्र आणि गुळगुळीत बिया यावरून होते. 'युफोर्बिया ड्राकुनकुलॉयडीस' म्हणजे 'पिसोळी' याच्या ब्रॅक्ट/छदपत्र लांबट पानासारख्या निमुळत्या असून त्या फांदीवर चिकटल्या प्रमाणे असतात आणि बियां वर गाठीदार किंवा उंचवटे असल्यासारखे असतो. याची पाने, खोड, बिया आणि मुळांमध्ये मोठ्या प्रमाणात अल्कलॉइडस, फ्लेव्होनॉइड् स, फिनॉल्स, टर्पेनॉइड् स आणि स्टिरॉइड् असतात. याचा उपयोग गळू, मधुमेह, उच्च रक्तदाब आणि एक्झिमासारखे त्वचा विकार, अंगदुखी यांसारख्या आजारांवर उपचार करण्यासाठी



तसेच तिच्या बुरशी-नाशक आणि सूक्ष्मजीव/कृमीनाशक गुणधर्मांसाठी पारंपारिक औषधोपचारात याचा अनेकदा वापर होतो. बियांच्या तेल बिनविषारी असून यात, ५६% पेक्षा जास्त दाह-शामक आणि ६६% पेक्षा जास्त वेदनाशामक गुणधर्म आहेत. बियातील तेलात ६० टक्क्यांपेक्षा जास्त 'लिनोलेनिक आम्ल' असल्याने याचा वापर पारंपारिक वैद्यकीय पद्धतींमध्ये (विशेषतः गुजरात आणि महाराष्ट्रात) औषधात रक्तदाब कमी करण्यासाठी (हायपोटेन्सिव्ह एजंट म्हणून) याचा सर्रास वापर केला जातो. भारतात पारंपारिकपणे वापरल्या जाणाऱ्या या वनस्पतीमध्ये सर्पविषविरोधी गुणधर्म असल्याचे नोंदवले गेले आहे. पिसोळा वनस्पती विषनाशक म्हणून काम करते. तसेच, संधिवात आणि दातांच्या समस्यांवरही उपयोग होतो. वैज्ञानिक संशोधनातून असे सिद्ध झाले आहे की, युफोर्बिया रोथियाना वनस्पतीच्या अर्कामध्ये जीवाणूविरोधी आणि बुरशीविरोधी गुणधर्मांचा अभ्यास केला गेला आहे. जीवाणूविरोधी व महत्वपूर्ण असलेले सिल्व्हर नॅनोपार्टिकल्स (Er-gNPs) च्या संश्लेषणासाठीही याचा वापर झालेला आहे.

**-प्रा. डॉ. रामचंद्र ज्ञानोबा गोरे**
**मो. ९०११६७४३४९**




सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा



सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित


सोलापूर | गुरुवार, १९ मार्च २०२६

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प

हिंदू संघटनेचे हे विशाल कार्य केवळ एका व्यक्तीकडून किंवा काही थोड्या लोकांकडून होण्यासारखे नाही. त्याकरिता एकाच ध्येयाने भारलेल्या लक्षावधी व कोट्यवधी लोकांच्या संघटित प्रयत्नांची आवश्यकता आहे. माझी आपणाला हीच विनंती आहे की, अशा ध्येयनिष्ठ आणि बलवान तरुणांच्या संघटनेचे जाळे भारताच्या कान्याकोपऱ्यातही पसरू द्या. मग आपले कार्य मुळीच कठीण नाही. उलट आपल्याला सर्वत्र आशा आणि उत्साह यांनी परिपूर्ण अशा नवीन युगाचे सुंदर चित्र सहज दिसू लागेल.

**- डॉ. केशव बळीराम हेडगेवार ।** रा. स्व. संघाचे आद्य सरसंघचालक



रा. स्व. संघाचे आद्य सरसंघचालक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांचा आज तिथीनुसार जन्मदिन

## प. बंगालमध्ये पाच आयपीएस अधिकारी 'डीआयजी' म्हणून नियुक्त

**कोलकाता :** आगामी विधानसभा निवडणुकांच्या तयारीचा आढावा घेतल्यानंतर, निवडणूक आयोगाने बुधवारी पश्चिम बंगालमधील पाच आयपीएस अधिकाऱ्यांची उपमहानिरीक्षक पदी बदली आणि नियुक्ती करण्याचा आदेश दिला, असे एका अधिकृत निवेदनात नमूद करण्यात आले. राठोड अमितकुमार भारत यांची रायगंज परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात यावी, तर अजितसिंह यादव यांची मुर्शिदाबादचे उपमहानिरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात यावी, असा निर्देश आयोगाने मुख्य सचिवांना लिहिलेल्या पत्रात दिला. श्रीहरी पांडे यांची बर्धानचे उपमहानिरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली, तर प्रेसिडेन्सी परिक्षेत्राच्या उपमहानिरीक्षकपदी कांकेर प्रसाद बारुई यांची नियुक्ती केली आहे. अंजली सिंह यांना जलपाईगुडी येथील उपमहानिरीक्षकपदाची जबाबदारी देण्यात आली.

# अमेरिका एकटीच लढणार

## डोनाल्ड ट्रम्प यांनी 'नाटो' देशांना सुनावले

**वॉशिंग्टन, १८ मार्च**

खंडीत झालेला वायू आणि कच्च्या तेलाचा पुरवठा पूर्ववत सुरू व्हावा, यासाठी 'नाटो'देशांना मदतीचे आवाहन केले आहे. दुर्दैवाने कुणीही समोर आले नाही. आम्ही जे काही करीत आहोत ते जगाच्या भल्यासाठीच. पण, अमेरिका आता एकट्यानेच युद्ध लढणार आहे. आम्हाला कुणाचीही मदत लागणार नाही, असा निर्धार डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे.

युद्धाच्या काळात संवेदनशील झालेला होमुर्झ जलमार्ग सुरक्षित करण्यासाठी 'नाटो'सह अन्य देशांना नौदल पाठविण्याचे आवाहन केले होते. भूतकाळात 'नाटो'देशांना अमेरिकेने सहकार्य केले आहे. इराणने आण्विक अस्त्रे प्राप्त करू नये, म्हणून लढत आहोत. यात 'नाटो'देशांचाही फायदा आहे. वास्तविक पाहता या देशांनी पाणसुरूंग निष्प्रभ करण्यासाठी दोन जहाजे पाठविली असती तरी पुरेसे होते. आणि यासाठी जास्त खर्चही आला नसता. पण, त्यांनी मदत पाठविली नाही. ठिक आहे. हे युद्ध आम्ही स्वतःच्या बळावर लढू, असे सांगत ट्रम्प म्हणाले की, इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेत्यानाहू यांच्यामुळे अमेरिका युद्धात उतरल्याचे जे आरोप केले जात आहे त्यात तथ्य नाही. इराणपासून निर्माण झालेला धोका जोपर्यंत संपणार नाही तोपर्यंत युद्ध सुरू राहील.



रशियाचे आक्रमण थोपविण्यासाठी 'नाटो'देशांनी युक्रेनच्या बाजूने लक्षावधी डॉलर्स खर्च `केले आहेत. अमेरिकेनेही युरोपीयन देशांना मदत केली. पण, जेव्हा आम्हाला गरज पडली तेव्हा मात्र, नाटो देशांनी माघार घेतली. इराणमुळे मध्यपूर्वेतील देशांना धोका आहे. या धोक्याचा सामना करता यावा म्हणून अमेरिकेने युरोपीयन आणि आशियाई देशांची संरक्षण व्यवस्था मजबूत करण्यासाठी प्रचंड पैसा खर्च केला,अशी आठवण ट्रम्प यांनी करून दिली. जपान, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण कोरिया हे मित्र देश आणि चीनने अमेरिकेला साथ देण्यास नकार दिला आहे.

फ्रान्सचे अध्यक्ष इम्यॅन्यएल मॅक्रॉन यांनी होर्मुझच्या सुरक्षेसाठी सहकार्य करण्यास तयार असल्याचे म्हटले आहे. पण, मध्यपूर्वेतील युद्धाचा भाग होणार नसल्याचे स्पष्ट केले. यावर ट्रम्प यांनी ''मॅक्रॉन यांचे दिवस भरले आहेत,'' अशा शब्दात सुनावले. मे २०२७ मध्ये मॅक्रॉन यांचा कार्यकाळ संपणार आहे. *(वृत्तसंस्था)*

### इराणच्या क्षेपणास्त्रे तळांवर बॉम्बवर्षाव

**होर्मुझच्या खाडीमधून जाणाऱ्या जहाजांना लक्ष्य करण्यासाठी इराणने आजूबाजूला क्षेपणास्त्रे तैनात केली होती. या क्षेपणास्त्रे तळांना नष्ट करण्यासाठी पाच हजार पौंड वजनाचे बॉम्ब टाकले आहेत. त्यामुळे येत्या काही दिवसांमध्ये होर्मुझवर अमेरिकेचे नियंत्रण असेल, अशी माहिती ट्रम्प यांनी दिली आहे.**

### हे आमचे युद्ध नाही

**हे युद्ध का सुरू केले हेच आम्हाला माहित नाही. हे युद्ध युरोपचे नाही. त्यामुळे या संघर्षात पडण्याची आमची मुळीच इच्छा नाही, असे युरोपीयन युनियनचे परराष्ट्रविषयक धोरण समितीचे प्रमुख काज कॅलास यांनी म्हटले आहे. युरोपीयन संघात २७ देशांचा समावेश आहे. होर्मुझच्या खाडीत नौदल पाठविण्याचा प्रस्ताव युरोपीयन संघटनेने फेटाळून लावला आहे.**

# युद्धविरामासाठी पंतप्रधान मोदींनी पुढाकार घ्यावा

## फिनलँड राष्ट्रपतींचे वक्तव्य

**हेलसिंकी, १८ मार्च**

रायसीना डायलॉग २०२६ मध्ये अॅलेक्झांडर स्टब यांनी सहभागी होत भारताच्या कूटनीतीचे कौतुक केले. सध्या सुरू असलेल्या संघर्षावर उपाय म्हणजे युद्धविराम असून भारत यात प्रभावी भूमिका बजावू शकतो, असे वक्तव्य फिनलँडचे राष्ट्रपती अॅलेक्झांडर स्टब यांनी केले. भारताचे सर्व संबंधित देशांशी संतुलित संबंध असल्यामुळे तो मध्यस्थी करू शकतो, असे त्यांनी नमूद केले.

अमेरिकेचे माजी लष्करी अधिकारी डगलस मॅकग्रेगर यांनीही अशाच प्रकारचे वक्तव्य करत माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताची मदत घ्यावी, असे म्हटले आहे. वाढत्या तणावामुळे ऊर्जा क्षेत्रावर परिणाम होत असून कच्च्या तेलाच्या दरात मोठी वाढ होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी संवाद हाच एकमेव मार्ग असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. याआधी संयुक्त अरब अमिरातीचे भारतातील माजी राजदूत हुसैन हसन मिर्जा यांनीही अशीच भूमिका मांडली होती. त्यांच्या मते, पंतप्रधान मोदी यांनी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू आणि इराणच्या नेतृत्वाशी संवाद साधल्यास संघर्ष थांबवण्यास मदत होऊ शकते.

# 'त्या' अमेरिकी भाडोत्री सैनिकाचा 'ख्रिश्चन राष्ट्रा'चा कट?

## शेख हसीना यांनी केले होते सावध

**नवी दिल्ली, १८ मार्च**

हिंसक उठावादरम्यान सत्तेवरून पायउतार होण्याच्या काही महिन्यांपूर्वी बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांनी एका कथित कटाबाबत सावध केले होते. यानुसार एका 'गोऱ्या माणसा'चा बांगलादेश आणि म्यानमारच्या काही भागांतून एक वेगळे 'ख्रिश्चन राष्ट्र' निर्माण करण्याचा कट होता. हा कट एनआयएने अलिकडेच अटक केलेल्या अमेरिकी भाडोत्री सैनिकाने रचल्याचा संशय आहे.



मॅथ्यू व्हॅनडाईक

शेख हसीना यांनी केलेल्या दाव्याकडे त्यावेळी लक्ष दिले गेले नव्हते. दोन वर्षांनंतर ईशान्य भागात बेकायदेशीर कारवाया केल्याप्रकरणी एनआयएने एका भाडोत्री अमेरिकी सैनिक आणि सहा युक्रेनियन नागरिकांना अटक केल्यामुळे दोन्ही घटनांचा संबंध असू शकतो, असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

या घडामोडींमुळे अमेरिका आणि इतर विदेशी सत्ता म्यानमारमधील लष्करशाही-विरोधी गटांना पाठिंबा देत असल्याच्या चर्चांना पुन्हा उधाण आले आहे. २०११ मध्ये लष्करी राजवटीने सत्ता बळकावल्यानंतर म्यानमारमध्ये गृहयुद्धाचा भडका उडाला. अमेरिकेचे छद्मयुद्ध आता भारताच्या ईशान्य भागापर्यंत येऊन पोहोचले आहे, असे भू-राजकीय तज्ज्ञ डॉ. ब्रह्मा चेलानी यांनी सांगितले. एनआयएच्या जाळ्यात अडकलेल्या अमेरिकी माशाचे नाव मॅथ्यू व्हॅनडाईक असे आहे. लिबिया आणि सीरिया या दोन देशांमधील तत्कालीन सत्ताधाऱ्यांना पदच्युत करण्यासाठी झालेल्या सशस्त्र संघर्षात त्याने सहभाग घेतला होता. २०११ मध्ये लिबियातील मुअम्मर गडाफी यांच्या राजवटीकडून अटक करण्यात आल्यानंतर तो काही काळ तिथे युद्धकैदी म्हणूनही राहिला होता. अमेरिकेच्या 'डीप स्टेट'चा एक भाग मानल्या जाणाऱ्या व्हॅनडाईकच्या भारतात झालेल्या अटकेमुळे खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, व्हॅनडाईल हा 'सन्स ऑफ लिबर्टी इंटरनॅशनल' या एनजीओचा संस्थापक आहे. *(वृत्तसंस्था)*

### बांगलादेशात वायुतळ उभारण्याची परवानगी द्या

बांगलादेशातील २०२४ मध्ये झालेल्या निवडणुकीपूर्वी एका 'गोऱ्या' व्यक्तीने भेट घेतली होती. बांगलादेशी भूमीवर विदेशी देशाला वायुतळ उभारण्याची परवानगी दिल्यास सत्तेत परतण्यासाठी मदत केली जाईल, असा प्रस्ताव त्या 'गोऱ्या' व्यक्तीने दिला होता, असा दावा शेख हसीना यांनी केला होता.

### उपस्थित केला होता ख्रिश्चन छळाचा मुद्दा

'सन्स ऑफ लिबर्टी इंटरनॅशनल' ही संस्था ही हुकूमशाही राजवटींविरुद्ध लढा देणाऱ्या गटांना प्रशिक्षण देते. २०१९ मध्ये व्हॅनडाइकच्या संस्थेने भारतातील ख्रिश्चनांच्या कथित छळाचा मुद्दा उपस्थित केला होता. याचे वृत्त फॉक्स न्यूजने दिले होते. हसीना यांनी २०२४ मध्ये ज्या गटाबाबत सावध केले होते, त्या गटाचाच एक भाग व्हॅनडाइक असू शकतो, अशी शक्यता तज्ज्ञांनी या पृष्ठभूमीमुळे वर्तवली आहे.

# खा. प्रद्युत बोरदोलोई यांचा भाजपात प्रवेश

## मुख्यमंत्री सरमा यांनी केले स्वागत

**नवी दिल्ली, १८ मार्च**

काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिल्यानंतर काही तासांतच आसाममधील लोकसभा खासदार प्रद्युत बोरदोलोई यांनी बुधवारी भाजपामध्ये प्रवेश केला. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा आणि भाजपाचे प्रदेशाध्यक्ष दिलीप सैकिया यांच्या उपस्थितीत नवी दिल्लीत बोरदोलोई यांनी भाजपाचे सदस्यत्व स्वीकारले.



याप्रसंगी मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा म्हणाले, नागावचे विद्यमान खासदार प्रद्युत बोरदोलोई १९७५ पासून काँग्रेस पक्षाशी संबंधित होते. त्यांच्या भाजपा प्रवेशामुळे पक्षाला बळकटी मिळेल. त्यांनी विधानसभा निवडणूक लढवावी, अशी शिफारस आसाम भाजपा केंद्रीय नेतृत्वाकडे करेल. स्वाभिमानी व्यक्तीने काँग्रेस पक्षात राहण्यात अर्थ नाही, असेही ते म्हणाले.

**अपमान सहन करणे शक्य नव्हते**

माध्यमांशी बोलताना प्रद्युत बोरदोलोई म्हणाले, तिकिट मिळवणे माझ्यासाठी जीवन-मरणाचा प्रश्न नव्हता. अनेक आव्हाने होती. माझ्यासाठी स्वाभीमान सर्वात महत्त्वाचा होता. काँग्रेसने मला खूप काही दिले आहे. मी लोकसभेत दुसऱ्यांदा निवडून आलो आहे. माझा अजूनही तीन वर्षांचा कार्यकाळ शिल्लक आहे. *(वृत्तसंस्था)*

## गुजरात एटीएसने लावला मेफेड्रोन कारखान्याचा छडा

**अहमदाबाद :** उत्तरप्रदेशातील आंबेडकर नगर जिल्ह्यातील एका मेफेड्रोन कारखान्याचा छडा लावल्यानंतर गुजरात एटीएसने दोन जणांना अटक केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी बुधवारी दिली. गुजरात दहशतवादविरोधी पथकाने सहा किलो मेफेड्रोन, ५० किलो द्रव मेफेड्रोन आणि त्याच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेला ८८ किलो मुख्य घटक जप्त केला.

# तरुण भारतचा शताब्दीपूर्ती सोहळा आज

तरुण भारत १०० वर्ष शताब्दी

### अनेक मान्यवरांची राहणार उपस्थिती






**नागपूर, १८ मार्च**

१९२६ साली साप्ताहिकाच्या स्वरूपात सुरू झालेल्या दै. तरुण भारतला शंभर वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्त तरुण भारतच्या शताब्दीपूर्ती सोहळ्याचे भव्य आयोजन कविवर्य सुरेश भट सभागृहात करण्यात आले आहे. हा सोहळा उद्या, गुरुवार, १९ मार्च रोजी सकाळी ११ वाजता गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर होणार आहे.

प. पू. सरसंघचालकांसह महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी याप्रसंगी उपस्थित असतील. तसेच श्री नरकेसरी प्रकाशनचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. विलास डांगरे, कार्याध्यक्ष अनिल दांडेकर, प्रबंध संचालक धनंजय बापट आणि संचालक मंडळातील सदस्यही व्यासपीठावर उपस्थित असतील. सर्वांनी सकाळी ११ वाजता येऊन आपापले स्थान ग्रहण करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

तरुण भारतच्या पोर्टल व सोशल मीडिया अकाऊंट्सवर (यू ट्यूब व फेसबूक) या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण होणार असले तरी मुलाखत प्रत्यक्ष ऐकण्यासाठी सभागृहात वेळेवर पोहोचावे, असे आवाहन तरुण भारत परिवारातर्फे करण्यात आले आहे. *(तभा वृत्तसेवा)*

### प. पू. सरसंघचालकांची विशेष मुलाखत



**या सोहळ्यादरम्यान प. पू. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांची प्रकट मुलाखत घेतली जाणार आहे. राजाराम वाचनालयाचे सचिव रवींद्र देशपांडे आणि तरुण भारतचे मुख्य संपादक शैलेश पांडे ही मुलाखत घेणार आहेत.**

### 'समर्पण' विशेषांकाचे प्रकाशन

**ज्येष्ठ प्रचारकांच्या कार्याची नोंद घेणाऱ्या 'समर्पण' या विशेषांकाचे तसेच शताब्दीपूर्तीनिमित्त 'अविरत' या विशेष पुरवणीचे अतिथींच्या हस्ते प्रकाशन होईल. 'समर्पण'मध्ये ज्येष्ठ प्रचारकांच्या देशभरातील प्रचार कार्याबाबत रंजक माहिती देण्यात आली आहे.**

### सकाळी ९ वाजता प्रदर्शनाचे उद्घाटन





तरुण भारतच्या जुन्या मुखपृष्ठांच्या फोटोंचे प्रदर्शन या ठिकाणी आयोजित करण्यात येणार आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन सकाळी ९ वाजता महापौर नीता ठाकरे आणि स्थायी समितीच्या अध्यक्ष शिवानी दाणी-वखरे यांच्या हस्ते करण्यात येईल. या प्रदर्शनात पाच दशकांहून जुनी मुखपृष्ठे वाचकांना पाहण्यास मिळतील.

# मंगळावर सापडला शुद्ध गंधकाचा पहिला पुरावा

## • नासाच्या 'क्युरिऑसिटी' रोव्हरने लावला शोध • खडकातून निघाले पिवळे स्फटिक

**वॉशिंग्टन, १८ मार्च**

नासाचा 'क्युरिऑसिटी रोव्हर' मंगळावर फिरत असताना त्याला एक खडक सापडला. या रोव्हरच्या धडकेने तो मऊ खडक फुटला आणि त्यातून पिवळे स्फटिक बाहेर आले. हे स्फटिक शुद्ध गंधक (मूलभूत गंधक) होते. याला 'ब्रिमस्टोन' असेही म्हणतात. मंगळावर यापूर्वी 'सल्फेट' आढळले आहे, परंतु शुद्ध गंधकाचा हा पहिलाच पुरावा आहे.



हा आश्चर्यकारक शोध शास्त्रज्ञ समजून घेण्याचा प्रयत्न करत आहेत. हा खडक मंगळावरील 'गेडीझ व्हॅली चॅनल' नावाच्या एका प्राचीन नदीच्या पात्रात सापडला. तिथे अब्जावधी वर्षांपूर्वी पाणी वाहत होते. या पात्रातून जात असताना रोव्हरच्या धडकेने तो खडक फुटला. आजूबाजूला असे अनेक समान खडक पडलेले होते. ते बाहेरून सामान्य दिसत असले तरी त्यांच्या आत शुद्ध गंधक असू शकते, असे शास्त्रज्ञांच्या लक्षात आले.

हे वाळवंटात 'ओॲसिस' सापडण्यासारखे आहे. असे येथे व्हायला नको होते. यामुळे आता आम्हाला याचे कारण शोधावे लागेल, असे क्युरिऑसिटी प्रकल्पाचे शास्त्रज्ञ अश्विन वासवदा म्हणाले. सल्फेट हे पाण्यात विरघळलेल्या गंधकापासून तयार होणारे क्षार आहेत. जेव्हा पाण्याचे बाष्पीभवन होते, तेव्हा हे सल्फेट मागे राहतात. मंगळावरील पाण्याच्या इतिहासाला समजून घेण्यासाठी सल्फेट अत्यंत महत्त्वाचे आहेत. तथापि, शुद्ध गंधक तयार होण्यासाठी अत्यंत विशिष्ट परिस्थितींची आवश्यकता असते.

शास्त्रज्ञांनी या प्रदेशात अशी परिस्थिती पाहिलेली नाही. तरीही, पृष्ठभागावर गंधकाचे इतके मोठे तुकडे पडलेले आहेत. याचा अर्थ, मंगळाच्या भूवैज्ञानिक इतिहासात काही गहन रहस्ये दडलेली आहेत, ती आपल्याला अजून माहीत नाहीत, असे शास्त्रज्ञांचे मत आहे. *(वृत्तसंस्था)*

### सल्फेट जीवनासाठी अत्यावश्यक

**सल्फर हे जीवनासाठी एक अत्यावश्यक मूलद्रव्य आहे. ते दोन अत्यावश्यक अमिनो आम्ले तयार करण्यास मदत करते. मंगळावर सल्फेट्स आधीपासूनच होते, यामुळे यातून जीवनाच्या शक्यतेबद्दल कोणतीही नवीन माहिती मिळत नाही. तथापि, मंगळावर पाणी, रसायने आणि इतर जीवन-पोषक पदार्थांचा वारंवार शोध लागल्याने मंगळ एकेकाळी जीवनासाठी अनुकूल असावा, असे सूचित होते.**




## अग्रलेख...

# 'स्वीकृत' ही सोय ठरू नये...

महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्येही 'स्वीकृत सदस्य' घेण्याबाबतचे सुधारणा विधेयक मंजूर करण्यात आले. या निर्णयामुळे राजकीय पक्ष व नोंदणीकृत गटांना त्यांच्या संख्याबळानुसार स्वीकृत सदस्य नेमण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सक्षमीकरणासाठी हा निर्णय स्वागतार्ह असला, तरी प्रत्यक्षात होणाऱ्या अंमलबजावणीवर त्याची खरी दिशा ठरणार आहे. एव्हाना नगरपालिका व महानगरपालिकांमध्ये राजकीय पक्ष ज्या पद्धतीने स्वीकृत सदस्यांच्या नेमणुका केल्या जातात, तशाच पद्धतीने येथेही होणार असतील तर ती केवळ राजकीय सोय ठरेल. नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या धर्तीवर ग्रामीण प्रशासनातही तज्ज्ञांचा शिरकाव होईल, अशी अपेक्षा करणे रास्तच. पण स्थानिक स्वराज्य संस्थांचा आजवरचा अनुभव पाहता, 'तज्ज्ञ' आणि 'अनुभवी' या शब्दांच्या आड राजकीय कार्यकर्त्यांचे पुनर्वसन करण्यापलीकडे दुसरे काही घडण्याची शक्यता कमीच असते. राज्यसभा आणि विधान परिषदेतही काही अंशी असे लोक असावेत, अशी अपेक्षा आहेच. त्याचे काय होते, हे सर्वांना ठावूक आहे. त्यामुळे या स्तरावरील स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी हा अत्यंत चांगला निर्णय प्रत्यक्षात आणताना तो अशी परंपरा पाळणारा ठरू नये, एवढीच काय ती अपेक्षा.

भारतीय लोकशाहीच्या ७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांना अत्यंत महत्त्वाचे अधिकार प्रदान केले आहेत. प्रशासनात केवळ लोकप्रतिनिधी असून चालत नाही, तर विविध विषयांतील जाणकार, कायद्याचे अभ्यासक, सनदी अधिकारी, डॉक्टर, अभियंते आणि दीर्घकाळ समाजसेवेचा अनुभव असलेले प्रतिनिधीही सभागृहात असावेत, हा स्वीकृत सदस्य नेमणुकीमागचा मूळ हेतू आहे. ज्या व्यक्ती निवडणुकांच्या रणांगणात पडू शकत नाहीत, परंतु ज्यांच्याकडे विकासाची सम्यक दृष्टी आणि प्रशासकीय समज आहे, अशांच्या ज्ञानाचा उपयोग नगरपालिका, महानगरपालिका व आता जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या विकासासाठी व्हावा, ही या तरतुदीमागची उदात्त भावना आहे. मात्र, तेथेही राजकीय पुनर्वसनालाच महत्त्व दिले गेले तर त्यातून फारसे चांगले निष्पन्न होण्याची शक्यता नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियमान्वये 'स्वीकृत सदस्य' नेमणुकीबाबतचे नियम आखून दिलेले आहेत. महानगरपालिकेत एकूण निर्वाचित सदस्यांच्या १० टक्के किंवा जास्तीत जास्त ५ सदस्य, यापैकी जी संख्या कमी असेल तेवढे सदस्य स्वीकृत पद्धतीने घेतले जातात. नगरपालिकेतही याच निकषानुसार स्वीकृत सदस्यांची नेमणूक होते. त्यासाठी, नगरपालिका किंवा महानगरपालिकेचे माजी सदस्य राहिलेल्यांसह राज्य सरकार किंवा केंद्र सरकारच्या सेवेतील राजपत्रित अधिकारी म्हणून कामाचा अनुभव असलेले, मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी असलेले आणि किमान ५ वर्षांचा अनुभव असलेले डॉक्टर, अभियंता, वकील, सनदी लेखापाल, शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ किंवा नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेत सामाजिक कार्याचा किमान ५ वर्षांचा अनुभव असलेल्या लोकांचा विचार केला जातो. स्वीकृत सदस्यांची निवड ही राजकीय पक्षांच्या निवडून आलेल्या सदस्य संख्येच्या प्रमाणात केली जाते हे खरेच आहे. ज्या पक्षाचे जास्त नगरसेवक, त्या पक्षाला जास्त स्वीकृत सदस्य मिळतात. इच्छुकांना विहित नमुन्यात अर्ज करावा लागतो. महानगरपालिकेचे आयुक्त किंवा मुख्याधिकारी या अर्जांची आणि अनुभवाच्या प्रमाणपत्रांची छाननी करतात. शेवटी निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवारांची नावे सभेत सादर केली जातात आणि त्यानंतर त्यांची अधिकृत नियुक्ती केली जाते. त्यातही निवडणुकीत पराभूत झालेली व्यक्ती, अपवाद वगळता त्याच कार्यकाळासाठी स्वीकृत सदस्य म्हणून पात्र ठरत नाही. ज्या व्यक्तीने विहित मुदतीत निवडणूक खर्च सादर केलेला नाही, ती व्यक्तीही अपात्र ठरू शकते. तसेच सदस्याबाबत कोणत्याही प्रकारची गंभीर गुन्हेगारीची पृष्ठभूमी किंवा पालिकेची थकबाकी नसावी, असेही निकष आहेत. स्वीकृत सदस्यांना निवडून आलेल्या नगरसेवकांप्रमाणेच सर्व अधिकार असतात. परंतु, त्यांना सभागृहात मतदान तेवढे करता येत नाही. ते चर्चेत भाग घेऊ शकतात आणि आपले तांत्रिक किंवा प्रशासकीय ज्ञान प्रशासनाला देऊ शकतात.

असे सगळे नियम असले तरी दुर्दैवाने, नगरपालिका व महानगरपालिकांमधील स्वीकृत सदस्यांच्या निवडीचा इतिहास फारसा दिलासादायक नाही. नियमांना सोयीनुसार लवचीक केले जाणे हे आता साऱ्यांच्याच अंगवळणी पडले आहे. ज्या कार्यकर्त्याला निवडणुकीत उमेदवारी नाकारली जाते, त्याचवेळी त्याला 'सांभाळून' घेण्यासाठी स्वीकृत सदस्यपदाचा मार्गही मोकळा केला जातो. पक्षाशी, त्याहीपेक्षा संबंधित पुढाऱ्याशी निष्ठा असणे ही त्यासाठीची एकमेव पात्रता असते. अशा कार्यकर्त्यासाठी नेत्याचा ऊर भरून येतो आणि तो स्वीकृत सदस्य होतो. त्यामुळे खऱ्या तज्ज्ञ मंडळींसाठी या सभागृहाची दारे बंद झाली असतात. समाजातील झाकले माणिक सभागृहात क्वचित दिसतात. आता जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्येही हेच लोण पसरण्याची शक्यता अधिक दिसते आहे. खरे तर, ग्रामीण भागात विकासकामांना वेग देण्यासाठी कृषी तज्ज्ञ, जलसंधारण तज्ज्ञ किंवा ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या अभ्यासकांची गरज जास्त आहे. मात्र, राजकीय पक्ष आपल्या मर्जीतील कार्यकर्त्यांचीच वर्णी लावणार असतील, तर या सुधारणा विधेयकाच्या मूळ उद्देश छेदला जाण्याची भीती आहे. पालिका अधिनियमानुसार, स्वीकृत सदस्यांसाठी पाच वर्षांचा प्रशासकीय अनुभव किंवा व्यावसायिक पदवीचे निकष आहेत. पण अनेकदा तशी बनावट अनुभव प्रमाणपत्रे सादर करून किंवा केवळ कागदोपत्री निकष पूर्ण करून राजकीय नियुक्ती केली जाते. समाजसेवक सभागृहात आला पाहिजे, अशी अपेक्षा आहे. पण समाजसेवकाचे प्रमाणपत्र देणाऱ्या शेकडो संस्था गल्लीबोळात आहेत. त्यामुळे मर्जीतील कार्यकर्त्याला सभागृहात स्वीकृत म्हणून पाठवणे नेत्यांसाठी सहज शक्य आहे. नगरपालिका व महानगरपालिकांचा बहुतांश अनुभव असाच काहीसा आहे. जिल्हा परिषदांच्या बाबतीत जर नियमावली कडक नसेल, तर सभागृहात होणाऱ्या चर्चांचा दर्जा अधिक उन्नत करण्यासाठीची राज्य सरकारची ही धडपड वाया जाईल. स्वीकृत सदस्याला मतदानाचा अधिकार नसला तरी, धोरणात्मक निर्णय घेताना त्याचे मत मोलाचे असते. हे सदस्य केवळ 'होयबा' म्हणून काम करणार असतील, पाच वर्षांत सभागृहात कधीच तोंड उघडणार नसतील, तर सरकारी तिजोरीवर त्यांच्या मानधनाचा आणि भत्त्यांचा अतिरिक्त भार कशासाठी? असा प्रश्न स्वाभाविकपणे उपस्थित होईल. निवडणूक आयोग आणि राज्य सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थेतील स्वीकृत सदस्यांच्या पात्रतेसाठी केवळ 'राजकीय पक्षाची शिफारस' हा एकच निकष न ठेवता, त्यांच्या कार्याचे सार्वजनिक मूल्यमापन करणे आवश्यक आहे. नियुक्तीपूर्वी त्यांच्या ज्ञानाचा किंवा अनुभवाचा समाजाला काय लाभ झाला, याची माहिती सार्वजनिक होणे अपेक्षित आहे. राजकीय पक्षांनीही आता जरा आत्मपरीक्षण केले पाहिजे. केवळ सत्तेचे गणित जुळवण्यासाठी सभागृहाची प्रतिष्ठा, वादविवादाचा दर्जा घालवायचा आहे, की खऱ्या अर्थाने विकासाची दृष्टी देणारे सदस्य नेमून गावाचा कायापालट करायचा आहे, याचाही विचार कधी तरी केला गेला पाहिजे. सुधारणा विधेयक मंजूर होणे ही केवळ एका प्रक्रियेची सुरुवात आहे. त्याचे यश हे प्रशासनाच्या दृष्टीवर आणि राजकीय पक्षांच्या नैतिकतेवर अवलंबून आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये 'राजकीय तडजोड' म्हणूनच स्वीकृत सदस्य घेतले जाणार असतील, तर हे विधेयक लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी नसून कार्यकर्त्यांच्या सोयीसाठी, टेंभा मिरवण्यासाठी आहे, असेच चित्र दिसेल. आयत्या पिठावर रेघोट्या ओढणाऱ्यांची संख्या कमी नाही. पण ग्रामीण महाराष्ट्राला सध्या टिवल्याबावल्या करणाऱ्यांची गरज नाही, तर जाणकार नेतृत्वाची आणि तज्ज्ञ मार्गदर्शकांची गरज आहे. तसे लोक सर्वत्र आहेत. अशांना सभागृहात आणल्याने राजकारण्यांना थोडा त्रास होणार असला तरी गाव-शहरांसाठी ते चांगलेच आहे. ही गरज ओळखून या पदांवरील नियुक्त्यांचा वापर झाला, तरच अर्थसंकल्पीय अधिवेशनातील हा एक चांगला निर्णय सार्थ ठरेल, असे वाटते.

## तंत्रवेध

# उपयुक्तता आणि आव्हानांमध्ये समतोल हवा

**डॉ. दीपक शिकारपूर**

इंटरनेटच्या सुरुवातीच्या काळात माहिती शोधणे म्हणजे फक्त काही की-वर्ड टाकून वेबसाईट्सची यादी पाहणे इतकेच होते. मात्र, गेल्या काही वर्षांमध्ये इंटरनेटवरील माहितीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. अशा परिस्थितीत योग्य, अचूक आणि विश्वासार्ह माहिती शोधणे एक मोठे आव्हान बनले आहे. डिजिटल तंत्रज्ञानाने मोठ्या वेगाने साधलेली प्रगती अभूतपूर्व आहे. मार्केटिंग किंवा विपणन हे क्षेत्र या बदलांपासून अलिप्त राहू शकत नाही. पारंपरिक जाहिरातबाजीच्या युगातून बाहेर येऊन आता डेटा, अल्गोरिदम आणि कृत्रिम बुद्धिमत्ता हे व्यवसायाचे मुख्य कणा बनले आहेत. याच गरजेतून 'आन्सर इंजिन ऑप्टिमायझेशन' (एईओ) आणि जनरेटिव्ह इंजिन ऑप्टिमायझेशन (जेईओ) या संकल्पनांचा उगम झाला आहे. हे केवळ तांत्रिक बदल नसून ग्राहकांशी संवाद साधण्याचे एक नवीन माध्यम आहे. आता एआयच्या मदतीने लाखो ग्राहकांच्या डेटाचे विश्लेषण काही सेकंदांमध्ये केले जाते. मशीन लर्निंगच्या माध्यमातून संगणक कोणत्या ग्राहकाला कोणत्या वेळी काय पाहायला आवडेल, हे शिकतात. यामुळे जाहिरातींची अचूकता वाढली आहे.

एआयमुळे प्रत्येक ग्राहकासाठी स्वतंत्र मार्केटिंग धोरण आखणे शक्य झाले आहे. मागील खरेदीचा इतिहास, सोशल मीडियावरील वर्तन आणि आवड लक्षात घेऊन प्रत्येक व्यक्तीला वेगळी ई-मेल किंवा वेगळी ऑफर पाठवली जाते. यालाच हायपर-पर्सनलायझेशन असे म्हणतात. यामुळे ब्रँड आणि ग्राहक यांच्यात एक भावनिक नाते तयार होते. आजच्या काळात सर्च इंजिन्स केवळ शब्द शोधत नाहीत, तर वापरकर्त्याचा हेतू समजून घेण्याचा प्रयत्न करतात. आन्सर इंजिन ऑप्टिमायझेशनमध्ये वेबसाईट किंवा डिजिटल माहिती अशी तयार केली जाते की शोध इंजिन वापरकर्त्याला थेट उत्तर देऊ शकेल. परिसरात सर्वोत्तम मिसळ कुठे आहे याची माहिती हवी असेल तर पूर्वी ग्राहक गूगलवर 'सर्वोत्तम मिसळ' या शब्दांमध्ये शोध घ्यायचे आणि त्याला दहापेक्षा अधिक वेबसाईट्सच्या लिंक मिळत. आता हाच ग्राहक एआय चॅटबॉटला विचारतो, 'माझ्या जवळच्या भागात आत्ता उघडी असलेली आणि पार्किंगची सोय असलेली मिसळची जागा सांग.' त्याला लगेच उत्तर मिळते. लाईव्ह लोकेशन तंत्र वापरून तो त्या जागेचे निरीक्षण करू शकतो आणि दूरध्वनी करून टेबल आरक्षित करू शकतो. एकीकडे एआय अत्यंत उपयुक्त वाटत असताना या तंत्रज्ञानापुढे काही कायदेशीर आव्हानेही आहेत. शिक्षण, आरोग्य, बँकिंग, शेती, उद्योग, न्यायव्यवस्था अशा अनेक क्षेत्रांमध्ये एआयचा वापर होत आहे. पण फायदे वाढतात तसे कायदेशीर आणि नैतिक प्रश्नही उभे राहतात. विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्तेने तयार केलेले साहित्य, बनावट चित्रे आणि आवाज तसेच निर्णयप्रक्रियेत होणारा पक्षपातीपणा या विषयांवर मोठी चर्चा सुरू आहे. कायद्याच्या दृष्टीने पाहिले तर बहुतांश देशांमध्ये बौद्धिक संपदा हक्क हा माणसाच्या सर्जनशीलतेशी जोडलेला आहे. म्हणजे एखादे पुस्तक, चित्र किंवा गाणे तयार करणारा लेखक किंवा कलाकार त्याचा मालक मानला जातो. पण ते साहित्य पूर्णपणे यंत्राने तयार केले असेल आणि त्यात मानवी सर्जनशीलतेचा थेट सहभाग नसेल, तर त्या साहित्याला हक्क मिळावा का, हा प्रश्न निर्माण होतो. यामुळे भविष्यात अनेक न्यायालयीन वाद उद्भवू शकतात.

उदाहरण देऊन सांगायचे तर एखाद्या लेखकाने कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने कादंबरी लिहिली आणि ती प्रसिद्ध झाल्यानंतर असे आढळले की मदतकर्त्या कृत्रिम बुद्धिमत्ता माध्यमाने आधीच्या अनेक पुस्तकांमधील कल्पना वापरल्या आहेत, तर मग मूळ लेखकांचे हक्क भंग झाले का? कृत्रिम बुद्धिमत्ता शिकताना मोठ्या प्रमाणावर उपलब्ध साहित्याचा अभ्यास करते. त्यात कॉपीराईट असलेले साहित्यही असू शकते. त्यामुळे प्रशिक्षण प्रक्रियेबाबतही पारदर्शकता आवश्यक आहे. भविष्यात कायद्यात स्पष्ट तरतुदी करून कृत्रिम बुद्धिमत्तेने तयार केलेल्या साहित्याचे नियम ठरवावे लागतील. दुसरा गंभीर विषय म्हणजे डीपफेक. डीपफेक म्हणजे एखाद्या व्यक्तीचा चेहरा किंवा आवाज वापरून खोट्या चित्रफिती किंवा ध्वनी तयार करणे. यात एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीचे किंवा सामान्य माणसाचेही चेहरे दुसऱ्या दृश्यात बसवले जातात. कधी कधी याचा वापर विनोदासाठी केला जातो, पण अनेक वेळा याचा गैरवापर होतो. खोट्या चित्रफिती पसरवून एखाद्याची बदनामी किंवा फसवणूक करणे किंवा राजकीय अस्थिरता निर्माण करणे, हे गंभीर गुन्हे आहेत.

भारतामध्ये अशा प्रकारच्या गुन्ह्यांवर माहिती तंत्रज्ञान कायदा आणि भारतीय दंड संहितेअंतर्गत कारवाई होऊ शकते. एखाद्याची बदनामी केल्यास बदनामीचे कलम लागू होते. खोटी कागदपत्रे किंवा चित्रफिती तयार करून फसवणूक केल्यास फसवणुकीचे कलम लागू होते. एखाद्याचा खाजगीपणा भंग केल्यास त्यासंबंधीचे कायदे वापरले जाऊ शकतात. एखाद्या महिलेचे बनावट अश्लील चित्र तयार करून प्रसारित केले, तर कठोर शिक्षा होऊ शकते. त्यामुळे डीपफेक हा फक्त तांत्रिक नाही, तर मानवी सन्मान आणि गोपनीयतेचा प्रश्न आहे. यामध्ये आणखी एक गुंतागुंतीचा मुद्दा म्हणजे याची जबाबदारी कोणाची? डीपफेक तयार करणाऱ्या व्यक्तीची की ते साधन उपलब्ध करून देणाऱ्या मंचाची? बहुतांश वेळा गुन्हा करणारी व्यक्ती थेट जबाबदार असते. परंतु याबाबत योग्य नियंत्रण ठेवले न गेल्यास, तक्रारींवर कारवाई न केल्यास त्यांनाही काही प्रमाणात जबाबदार धरले जाऊ शकते. त्यामुळे तंत्रज्ञान कंपन्यांनी कठोर नियम आणि तपास यंत्रणा तयार करणे गरजेचे आहे. पूर्वीचा सायबर कायदा (आयटी ॲक्ट २०००) हा त्या काळासाठी योग्य असला तरी आजच्या डिजिटल अर्थव्यवस्थेसाठी अपुरा आहे. त्यामुळे 'सायबर कायदे २.०' ही अद्ययावत, व्यापक आणि भविष्याभिमुख कायदेव्यवस्था आवश्यक आहे.

बदलत्या तांत्रिक वास्तवाला अनुरूप सक्षम व आधुनिक कायदेव्यवस्था घडवणे ही काळाची गरज आहे. जगातील अनेक देश कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर वेगवेगळ्या पद्धतीने काम करत आहेत. या तंत्रज्ञानाचा वेग खूप जास्त असल्यामुळे सरकारांना नवीन कायदे आणि नियम तयार करावे लागत आहेत. काही देशांनी आधीच सविस्तर नियम जाहीर केले आहेत, तर काही देश अजूनही विचारमंथन करत आहेत. एक महत्त्वाची बाब म्हणजे आंतरराष्ट्रीय सहकार्य. कृत्रिम बुद्धिमत्ता हे सीमारेषा ओलांडणारे तंत्रज्ञान आहे. एका देशात तयार झालेली प्रणाली दुसऱ्या देशात वापरली जाऊ शकते. त्यामुळे संयुक्त मार्गदर्शक तत्त्वांची गरज आहे.

काही आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये देश एकत्र येऊन सुरक्षित आणि जबाबदार वापरासाठी तत्त्वे ठरवत आहेत. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता अधिक शक्तिशाली होणार आहे. ती न्यायालयीन साहाय्य, वैद्यकीय निदान, शेती नियोजन अशा महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये काम करेल. त्यामुळे तिच्यावर विश्वास ठेवण्यासाठी मजबूत कायदेशीर पाया आवश्यक आहे. त्यासाठी उत्तरदायित्व निश्चित करणे, मानवी हक्कांचे संरक्षण करणे आणि पारदर्शकता राखणे हे तीन मुख्य आधारस्तंभ असतील.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## प्रासंगिक

### १०० वर्षांचा तरुण...

आज तरुण भारत आपल्या प्रवासाचे १०० वे वर्ष पूर्ण करत आहे. हा क्षण केवळ एका वृत्तपत्राच्या प्रकाशनाचा वर्धापनदिन नाही, तर तो एका वैचारिक परंपरेचा, निष्ठेचा आणि लाखो वाचकांच्या वर्धिष्णू होत गेल्या विश्वासाचा गौरव सोहळा आहे. आजचा हा शताब्दीपूर्ती सोहळा जरी औपचारिक असला, तरी त्याचे स्वरूप मात्र पूर्णतः पारिवारिक आहे. व्यासपीठावरील मान्यवरांपासून ते सभागृहात बसलेल्या शेवटच्या व्यक्तीपर्यंत प्रत्येक जण या परिवारात एकाच धाग्याने गुंफलेला आहे आणि तो धागा म्हणजे आपुलकी आणि राष्ट्रीयत्व.

**निष्ठेची अक्षय परंपरा :** खरे तर शतकाचा काळ हा एका दैनिकाच्या प्रकाशनासाठी फार मोठा काळ आहे. शंभर वर्षे सातत्याने समाजाचे वैचारिक पालन-पोषण करणे ही साधी गोष्ट नाही. ही एक अक्षय परंपरा आहे. ही परंपरा केवळ तरुण भारतच्या शीर्षस्थानी असणाऱ्या संपादकांनीच नव्हे, तर छपाई करणाऱ्या कामगारांपासून ते वितरण विभागातील सहकाऱ्यांपर्यंत प्रत्येकाने अत्यंत निष्ठेने आणि समर्पित भावनेने चालवली आहे. आजचा दिवस गेल्या १०० वर्षांत तरुण भारतसाठी योगदान देणाऱ्या या सर्वांच्या कृतज्ञ स्मरणाचा आहे. आणि आज हा वारसा समर्थपणे पुढे नेणाऱ्या, नव्हे त्याचा अधिक विस्तार करणाऱ्या नव्या दमाच्या टीमचे अभिनंदन करण्याचा हा दिवस आहे.

**वाचक : परिवाराचा आधारस्तंभ :** तरुण भारत आणि वाचक यांच्या बाबतीत असणारे नात्याचे हे गणित वेगळे आहे. इथला वाचक या दैनिकाला आपल्या कुटुंबाचा अविभाज्य भाग मानतो. सकाळी चहाचा कप हातात घेतल्यावर तरुण भारत समोर नसेल, तर अस्वस्थ होणारा आणि येरझारा घालत अंकाची वाट पाहणारा वाचक, हीच या वृत्तपत्राची खरी शक्ती आहे, ऊर्जा आहे. या वाचकांच्या भरवशावरच तरुण भारताचा गेल्या शतकाचा खडतर पण गौरवशाली प्रवास यशस्वी झाला आहे. गेली १०० वर्षे तरुण भारत आणि वाचक यांच्यातील हा स्नेहबंध अतूट राहिला आहे.

**नात्यातील वैदर्भीय ओलावा :** कुटुंब म्हटले की कुटुंबातील सदस्यांप्रति प्रेम-जिव्हाळा असतोच. आणि कधी कधी थोडा रुसवा-फुगवा सुद्धा असतो. तरुण भारताच्या वाचकांचेही तसेच आहे. कधीकधी वाचकांकडून केल्या जाणाऱ्या तक्रारीत टोकाचा राग, द्वेष-त्वेष किंवा तिरस्कार नसतो, तर ती आपुलकीची कळकळ असते. आपल्या कुटुंबातील सदस्याबद्दल कुणी उणेदुणे बोललेले आपल्याला खपत नाही, तशीच भावना वाचकांची असते. त्यामुळे कुणी नावं ठेवावीत असे काही घडू नये या काळजीपोटी केलेली ती प्रेमळ तक्रार असते. त्यांच्या या तक्रारीत एक प्रकारचा वैदर्भीय रोखठोकपणा असतो. पण हा आपुलकी आणि आत्मीयतेपोटी कळकळीने येणारा उमाळा असतो. जो केवळ प्रेमापोटीच जन्माला येतो.

**नव्या क्षितिजाकडे वाटचाल :** आपल्या परिवारातील तरुणाकडून आपल्या काही अपेक्षा असतात. त्याने आपल्याजवळ राहावे, आपल्याला प्राधान्य द्यावे, आपली काळजी घ्यावी, आपल्या कामासाठी त्याची प्राथमिकता असावी अशी आपली अपेक्षा असते. तशीच अपेक्षा आपल्या तरुण भारताकडून मायबाप वाचकांची असते. ती अगदीच चुकीची आहे असे म्हणता येणार नाही.

पण जेव्हा कुटुंबातील त्या तरुणाच्या भविष्याचा विषय येतो, त्याच्या कार्य विस्ताराचा विषय येतो तेव्हा त्याच्या प्रगतीच्या आड कुटुंब येत नाही. त्याला अतिशय आनंदाने परगावी जाण्यास अनुमती मिळते. ''आम्ही इथे व्यवस्थित सांभाळून घेऊ, तू निश्चिंतपणे जग जिंकण्यासाठी बाहेर पड'' अशी विश्वासाची शिदोरी त्याला हेच कुटुंब देत असतं. आज जेव्हा १०० वर्षांचा 'तरुण' असलेल्या तरुण भारताचा पुण्यात कार्यविस्तार होतो आहे. तेव्हा ...तसाच विश्वास, तशीच शिदोरी गेली १०० वर्ष काळजी वाहणारे नागपूरकर वाचक तरुण भारतला देत आहेत. शंभर वर्षांचे अनुभव पाठीशी आणि तरुणाचा उत्साह उराशी बाळगून तरुण भारत आज नव्या युगात पाऊल टाकत आहे. तरुण भारताचा वाचकां सोबतचा हा स्नेहबंध असाच अतूट राहो, हीच सदिच्छा!

**प्रसाद दत्तात्रेय पोफळी**/९८२२५६९६४८

### शतायु तरुण भारत

राष्ट्रीय नेतृत्व करणारा दैनिक तरुण भारत आज शतायु होत असल्याचा मला आनंद आहे. विद्यार्थिदशेत 'वर्तमानपत्रे' हा पाठ दिवंगत संपादक ग. त्र्यं. माडखोलकर माझ्या मनावर कायम स्मृतिमान बनल्याने तरुण भारताचा मी आजन्म वाचक बनलो. याच दरम्यान मा. गो. वैद्य यांचे पत्र मजकडे उपलब्ध असणे आणि गजानन निमदेव यांच्याशी आताही संवाद असणे हा तरुण भारताचा सामान्याच्या प्रति असलेला स्नेहभाव आणि राष्ट्रीय सद्‌भावाची जोपासना सिद्ध करणारी कर्तव्यतत्परता होय. तरुण भारताच्या मुखपृष्ठावर 'न मे कर्मफले स्पृहा' हे ब्रीद वाक्य राष्ट्राप्रति समर्पणाची आणि त्यागाची मूर्तिमंत सिंहगर्जना! हाच वारसा वर्तमान संपादक शैलेंद्र पांडे समर्थपणे चालवीत आहेत. तरुण भारतच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा.

**वि. ल. उईके**/८२७५५२८०१६

## दिल्ली वार्तापत्र

# राज्यसभा निवडणूक निकालाचा अन्वयार्थ

**श्यामकांत जहागीरदार**

राज्यसभेच्या ३७ जागांसाठी नुकतीच निवडणूक झाली, खरं म्हणजे यातील २६ उमेदवार अविरोध निवडून आले. यात रालोआ आणि इंडिया आघाडीच्या प्रत्येकी १३ उमेदवारांचा समावेश होता. त्यामुळे फक्त ११ जागांसाठी निवडणूक घ्यावी लागली. प्रत्यक्षात ज्या ११ जागांसाठी निवडणूक घ्यावी लागली, त्यातील ९ जागा रालोआला तर दोन जागा विरोधी पक्षांना मिळाल्या. यात भाजपाला सर्वाधिक म्हणजे ५ तर त्याच्या मित्रपक्षांना ४ जागा मिळाल्या. काँग्रेस आणि बिजू जनता दलाला प्रत्येकी एका जागेवर समाधान मानावे लागले. ३७ पैकी २२ जागा राष्ट्रीय लोकशाही आघाडीने जिंकल्या, तर १५ जागांवर इंडिया आघाडीला समाधान मानावे लागले. रालोआच्या २२ जागांमध्ये भाजपाच्या सर्वाधिक म्हणजे १३ जागांचा समावेश आहे, भाजपाच्या मित्रपक्षांनी ९ जागा जिंकल्या. विरोधकांच्या १५ जागांत काँग्रेसच्या ६, तृणमूल काँग्रेसच्या ४ तर द्रमुकच्या ३ जागांचा समावेश आहे. शरद पवार विजयी झाल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला एक जागा मिळाली.

अपेक्षेप्रमाणे बिहार आणि ओडिशा या दोन राज्यात क्रॉस व्होटिंग झाली. त्याचा फायदा भाजपा आणि भाजपा समर्थित उमेदवारांना मिळाला. मागील राज्यसभा निवडणुकीत हरयाणा आणि हिमाचल प्रदेशमध्ये क्रॉस व्होटिंग झाले होते. हरयाणात यावेळीही निवडणुकीतील मतदानाच्या मुद्यावरून आरोप-प्रत्यारोप झाले. पण यानंतरही प्रत्येकी एकेक जागा जिंकण्यात भाजपा आणि काँग्रेस यशस्वी झाले. राज्यसभेच्या ७२ जागांसाठी यावर्षी तीन टप्प्यांत निवडणूक होणार आहे. पहिल्या टप्प्यात ३७ जागांसाठी निवडणूक झाली. आता उर्वरित ३५ जागांसाठी येत्या काही महिन्यांत दोन टप्प्यांत निवडणूक होणार आहे.

या निवडणुकीचे वैशिष्ट्य काय असा प्रश्न कोणी विचारला तर त्याचे उत्तर आहे, भाजपाची राज्यसभेत हळूहळू स्वबळावर बहुमताकडे वाटचाल सुरू झाली आहे. रालोआ म्हणून भाजपा आजच राज्यसभेत बहुमतात आहे, पण स्वबळावरील बहुमतासाठी भाजपाला आणखी काही महिने वाट पाहावी लागणार आहे.

राज्यसभेची सदस्यसंख्या २४५ असते, यातील २३३ सदस्य निर्वाचित असतात, तर १२ सदस्य नामनियुक्त असतात. २४५ सदस्यांच्या सभागृहांत बहुमतासाठी १२३ जागांची आवश्यकता आहे, पण भाजपाचे सध्याचे संख्याबळ १०७ आहे. त्यामुळे भाजपा आता स्वबळावरील बहुमतापासून फक्त १६ पावलं दूर आहे. गणिती भाषेत पाहिले तर या निवडणुकीमुळे रालोआचा १० जागांचा फायदा झाला, तर विरोधकांचे दहा जागांचे नुकसान. रालोआच्या जागा १२ वरून २२ झाल्या तर विरोधकांच्या २५ वरून १५ वर आल्या. निवडणुकीच्या आधी भाजपाजवळ ९ जागा होत्या, त्या १३ झाल्या, म्हणजे भाजपाचा ४ जागांचा फायदा झाला, तर काँग्रेसच्या जागा ४ वरून सहावर पोहोचल्या, म्हणजे काँग्रेसलाही दोन जागा जास्तीच्या मिळाल्या. जदयुला आपल्या दोन जागा कायम ठेवण्यात यश आले, तर राजदला आपल्या दोन्ही जागा गमवाव्या लागल्या. बिहारमध्ये भाजपाची एकही जागा नसताना दोन जागा भाजपाने जिंकल्या. तृणमूल काँग्रेस आपल्या चार जागा कायम ठेवण्यात यशस्वी ठरली, तर चार जागा असणाऱ्या द्रमुकला यावेळी फक्त ३ जागा जिंकता आल्या, म्हणजे त्यांचे एका जागेचे नुकसान झाले. तीच स्थिती शिवसेना उबाठाची झाली. या पक्षाजवळ एक जागा होती, ती शून्यावर आली. माकप आणि भारत राष्ट्र समितीलाही आपली जागा गमवावी लागली. बिजू जनता दलाजवळ दोन जागा होत्या, त्यांना एक जागा मिळाली, म्हणजे त्यांचे एका जागेचे नुकसान झाले.

महाराष्ट्रातील सातही जागांवरील उमेदवार अविरोध विजयी झाले. यात भाजपाच्या ४, शिवसेना एकनाथ शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या प्रत्येकी एका उमेदवाराचा समावेश होता.

निवडणुकीच्या आधी राज्यसभेतील भाजपा सदस्यांची संख्या १०३ होती, ९ सदस्य निवृत्त झाल्यामुळे भाजपाचे संख्यबळ ९४ वर आले होते, पण यावेळी १३ जागा जिंकल्यामुळे भाजपा १०७ वर पोहोचली आहे. भाजपाची राज्यसभेतील ही सर्वांत जास्त सदस्यसंख्या आहे. २०१४ मध्ये सत्तेवर आली तेव्हा, भाजपा राज्यसभेत अल्पमतात होती. त्यामुळे अनेक विधेयके राज्यसभेत पारित करून घेण्यात भाजपाला अडचण येत होती. काही वर्षांपासून राज्यसभेत भाजपाची ताकद वाढत गेली. रालोआ तर बहुमतात आली, त्यामुळे भाजपाच्या अडचणी कमी झाल्या. राज्यसभेतही विधेयके सहजपणे पारित होऊ लागली.

राज्यसभेत रालोआ आणि इंडिया आघाडी व्यतिरिक्त या दोन्ही आघाड्यांत नसणारेही म्हणजे एकला चलो रेचा मार्ग पत्करणारे काही पक्ष आहेत. या सर्वांचे एकत्रित संख्याबळ २८ आहे. यात आम आदमी पक्षाचे (आप) १०, वायएसआर काँग्रेसचे सात, बिजू जनता दलाचे ६, भारत राष्ट्र समितीचे ३ तर बसपा आणि मिझो नॅशलन फ्रंटचा प्रत्येकी एक सदस्य आहे.

यावेळच्या राज्यसभा निवडणुकीने देशातील अनेक राजकीय पक्षांची समीकरणे बदलणार आहेत. या निवडणुकीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन बिहारमधून राज्यसभेवर निवडून आले. राज्यसभेत आता माजी राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि विद्यमान अध्यक्ष नितीन नवीन असे भाजपाचे दोन आजी-माजी अध्यक्ष जवळजवळ असतील. भाजप आणि काँग्रेस या देशातील दोन प्रमुख राष्ट्रीय पक्षांचे राष्ट्रीय अध्यक्ष राज्यसभेत आहेत. आतापर्यंत भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा राज्यसभेत सत्ता पक्षनेते होते, तर काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे विरोधी पक्षनेते आहेत. नड्डांप्रमाणे भाजपाचे नवीन राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन राज्यसभेत सत्तापक्ष नेते होण्याची शक्यता नाही.

राज्यसभेत येण्यासाठी नितीशकुमार यांनी बिहारच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्याची तयारी केली, हे या निवडणुकीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. नितीशकुमार राज्यसभेत आल्यामुळे आता बिहारमध्ये सत्ताबदल होण्याचा आणि भाजपाच्या मुख्यमंत्र्याने शपथ घेण्याचा मार्ग प्रशस्त झाला आहे. उत्तर भारतातील बिहार हे एकमेव असे राज्य होते, ज्याठिकाणी अनेक वर्ष सत्तेत सहभागी असूनही कधी भाजपाचा मुख्यमंत्री झाला नाही. बिहारचे नितीन नवीन भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाल्यानंतर त्यांच्या पायगुणाने बिहारमध्ये भाजपाचा मुख्यमंत्री पदारूढ होण्याची परिस्थिती निर्माण झाली.

राज्यसभा निवडणुकीने आणखी एक बदल घडवला तो म्हणजे नितीशकुमार यांचा मुलगा निशांतकुमार यांचे राजकारणात पदार्पण झाले आणि नितीशकुमार यांचा राजकीय उत्तराधिकारी म्हणून त्यांची प्राणप्रतिष्ठा होण्याचा मार्ग मोकळा झाला. निशांतकुमार बिहारचे मुख्यमंत्री होण्याची शक्यता नसली तरी उपमुख्यमंत्री मात्र निश्चितपणे होऊ शकतात. घराणेशाहीच्या राजकारणाचा ठपका टाळण्यासाठी नितीशकुमार यांनी आतापर्यंत निशांतकुमारला राजकारणापासून दूर ठेवले होते.

या निवडणुकीने राज्यसभेतील उपाध्यक्षपदही रिकामे होणार आहे. विद्यमान उपाध्यक्ष हरिवंशनारायणसिंह यांना जदयुने उमेदवारी दिली नाही. त्यामुळे त्यांच्या जागेवर नव्या उपाध्यक्षाची निवड करावी लागणार आहे. त्यामुळे राज्यसभेला जसे नवे अध्यक्ष मिळाले, तसेच नवे उपाध्यक्षही मिळणार आहेत. त्यामुळे यावेळची राज्यसभा निवडणूक अनेक अर्थाने वेगळी आणि महत्त्वपूर्ण ठरली आहे.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### शालिवाहन शके १९४८ (२०२६-२७) - गुढीपाडवा

या वर्षी नवीन शालिवाहन शक १९४८ 'पराभव' नामक संवत्सराचा आरंभ फाल्गुन कृ. ३० सह चैत्र शु. १ गुरुवारी सकाळी ६ वा. ५३ मि. नंतर होत आहे. प्रतिपदा क्षयतिथी असल्याने नूतन वर्षारंभ, गुढीपाडवा गुरुवार १९ मार्च २०२६ रोजीच होईल. या दिवशी सकाळी ६ वा ५३ मि. नी. गुढी उभारावी. गुढीचे पूजन करून प्रार्थना करावी. गुढी पूजनाचे वेळी पुढील मंत्राने प्रार्थना करावी ''ब्रह्मध्वज नमस्तेतु सर्वाऽभिष्ट फलप्रद। प्राप्तेऽस्मिन्वत्सरे नित्यं मद्गृहे मंगलं कुरु ।'' नवीन पंचांग व त्यावरील गणपतीचे पूजन करावे, संवत्सर फल वाचावे. गुढीपाडवा हा साडेतीन स्वयं सिद्ध मुहूर्तातील एक पूर्ण मुहूर्त आहे. आपणा सर्वांना शके १९४८ पराभव नाम संवत्सर सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो ही ईश्वर चरणी प्रार्थना.

या चैत्र शुक्ल प्रतिपदेला शालिवाहन शक १९४८ पराभव नामक सुरू होत आहे. या पराभव नामक संवत्सरात राजपद गुरूकडे, मंत्रिपद मंगळाकडे, मेघांचे आधिपत्य चंद्राकडे, अग्रधान्याचा (खरीप पिकांचा) स्वामी गुरू, रसपदार्थांचा स्वामी शनि, रबीच्या पिकांचा स्वामी बुध आहे. मध्यधान्याचा अधिपति बुध आहे. या पराभव नाम संवत्सरात पाऊस थोडा मध्यम, परंतु पिके चांगली येतील. देशविदेशात युद्धाचे वातावरण राहील. रोगराई वाढेल. राजपद गुरू या शुभ ग्रहाकडे असल्याने त्याच्या अंमलाखालील गुजरात, विदर्भ भागात पाऊस योग्य प्रमाणात पडेल. फळे व धान्याचे उत्पादन चांगले होईल. समाजात यज्ञयाग इ. धार्मिक कृत्ये होतील. रोगराई प्रमाण कमी राहील.

मंत्रिपद मंगळाकडे असल्याने धान्याची महागाई, आग, चोर यापासून नुकसान व युद्धजन्य परिस्थिती राहील. मेघांचा अधिपति चंद्र असल्याने ऊस, धान्य, फुले, दुधदुभते चांगले भरपूर येतील. नद्या, विहिरी, तळी यात भरपूर पाणी राहील. विद्वानांचा गौरव होईल. अग्रधान्याचा (खरीप पिकांचा) स्वामी गुरू आहे. त्यामुळे पृथ्वीवर पाऊस पाणी चांगले, धान्य व फळांचे उत्पादनही चांगले होईल. जनता आनंदित राहील. रसपदार्थांचा स्वामी शनि असल्याने लोकर, नीळ, लोखंड यांच्या किमती थोड्या कमी होतील. सोने, चांदी, पारा महाग होईल. रब्बीच्या पिकांचे आधिपत्य बुधाकडे आहे. त्यायोगे गहू, तांदूळ, मूग, ऊस यांचे उत्पादन चांगले, दुधदुभते भरपूर होईल. जनतेची शास्त्र अभ्यासाकडे प्रवृत्ती वाढेल. मध्यधान्याचा अधिपती बुधच असल्याने पाऊसपाणी मध्यम, तांबड्या काळ्या जमिनीत चांगली पिके येतील.

यावर्षी निज ज्येष्ठ शुक्ल अष्टमी सोमवार, हस्त नक्षत्र, वरियान् योग, बव करणावर सूर्योदयापासून दुपारी १२ वा. २३ मि. नी. सूर्य आर्द्रा नक्षत्रात प्रवेश करतो. त्यायोगे धान्य व वस्त्रे यांची थोडी वृद्धी होईल, सर्व वस्तूंची सुबत्ता राहील. जनतेला धनधान्य भरपूर मिळून जनता सुखी राहील. या वर्षात काल नावाचा मेघ वृष्टी करणार आहे व तक्षक नावाचा नाग पृथ्वी धारण करणार आहे. त्यायोगे देशविदेशात युद्धजन्य परिस्थिती राहील. या वर्षात रोहिणी नक्षत्र समुद्रावर पडले आहे. ते पर्जन्यवृष्टी चांगली होऊन सर्व धान्ये भरपूर येतील असे दर्शविते. हे शुभकारक वर्षफल गुढीपाडव्याचे दिवशी श्रवण केल्याने लक्ष्मीची व आयुष्याची वृद्धी होऊन नवीन वर्ष सुखसमाधानाचे जाते.

**ज्यो. विद्या राजंदेकर**/नागपूर

### तोच खरा हिंदू अपुला

चैत्र प्रतिपदेच्या नववर्षाला
स्पर्श तो झाला सोनेरी पहाटच्या सूर्यकिरणाला...
श्रीप्रभू रामाच्या चरणी जो नतमस्तक राहिला...
तोच खरा हिंदू अपुला



बलिदानाला न घाबरता
राष्ट्रहिताची तळमळ ज्याला...
मातृभूमीचा सच्चा रखवाला...
तोच खरा हिंदू अपुला

मातृत्वाच्या त्या ऋणाला
न विसरता जो राहिला...
मुली, भगिनींच्या अब्रूचा खरा रखवाला...
तोच खरा हिंदू अपुला

कर्तृत्वाची जाणीव ज्याला
संस्कृतीची ओळख त्याला...
''वसुधैव कुटुंबकम्''ला प्राधान्य ज्याला...
तोच खरा हिंदू अपुला

''सर्वे भवन्तु सुखिन''चा मंत्र जो जपला
''अतिथी देवो भव'' सदैव वदला...
अभिमानाने उभा राहिला...
तोच खरा हिंदू अपुला

गुढी उभारून नव वर्षाला
जतन करूया अपुल्या संस्काराला...
नमन करूया भूमातेला...
तोच खरा हिंदू अपुला

**आनंद पाठक**/९९७०६००१२३

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९४२२६१२२४५/८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# हिंदू शौर्य पुरस्कार मिलिंद एकबोटे, सारिका परमानंद यांना जाहीर

## २६ मार्च रोजी वितरण : समितीच्या उत्सव अध्यक्षपदी राम कबाडे तर कार्याध्यक्षपदी महेश जेऊर





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

श्रीराम जन्मोत्सव समितीतर्फे यंदाच्या वर्षीपासून हिंदू शौर्य पुरस्कार देण्यात येणार आहे. पहिल्यावर्षी हा पुरस्कार गोरक्षक मिलिंद एकबोटे व वृंदावन वात्सल्य ग्राम प्रकल्प येथील साध्वी ऋतुंभरा दीदी यांच्या शिष्या साध्वी सारिका परमानंद यांना घोषित करण्यात आला आहे. या पुरस्काराचे वितरण २६ मार्च रोजी दाजी पेठ येथील हेडगेवार पटांगणात होणार आहे.

श्रीराम जन्मोत्सव समितीची पदाधिकारी निवड बैठक दत्तनगर येथील श्री राम मंदिरात झाली. या बैठकीत श्रीराम नवमी निमित्त विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात आले. श्रीराम जन्मोत्सव समितीच्या उत्सव अध्यक्षपदी राम कबाडे यांची तर कार्याध्यक्षपदी महेश जेऊर यांची एकमताने निवड करण्यात आली. भारत हिंदू राष्ट्र म्हणून घोषित व्हावे याकरिता श्रीराम जन्मोत्सव समितीतर्फे २५ मार्च रोजी हेडगेवार पटांगण येथे १५१ हवन कुंडीय यज्ञ होणार आहे. या कार्यक्रमानंतर भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

तसेच २६ मार्च रोजी श्रीराम नवमी दिवशी सिताराम कल्याण महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यानंतर पुरस्काराचे वितरण होणार आहे. या बैठकीस श्रीराम जन्मोत्सव समितीचे नूतन उत्सव अध्यक्ष राम कबाडे, संजय साळुंखे, पंडित वेणुगोपाल जिल्ला पंतलु, नगरसेवक अक्षय अंजिखाने, संजय होमकर, चन्नवीर चिट्टे, यतीराज होनमाने, सागर अतनुरे, नागेश सरगम, भीमाशंकर पदमगोंडा, सचिन शिवशक्ती, संदीप महाले, विश्वनाथ चिडगुंपी , बाबुराव क्षीरसागर, अर्जुन मोहिते, केतन अंजिखाने, शीलवंत छपेकर, योगेश कबाडे, गंगाधर झुरळे, नरेश ताटी, अनुप कुलकर्णी, रविराज हरसुरे, मनोज विटकर आदी उपस्थित होते.

### श्रीराम जन्मोत्सव समितीची उत्सव अन्य पदाधिकारी

उपाध्यक्ष - लक्ष्मण सरवदे, उपाध्यक्ष - सतीश पारेली, उपाध्यक्ष - नागेश मंजेली, उपाध्यक्ष - अमर गट्टी, सचिव - आनंद शर्मा, सचिव - पिनू करपे, सचिव - कल्याण करजगी सहसचिव - प्रसाद भास्कर, सह सचिव - चारुदत्त हुलजंतीवाले, धार्मिक विधी प्रमुख - अनिल वंगारी, होम हवन प्रमुख - शिवराज दासी.



# खेळाडूंनी देशाचे नाव उज्वल करावे

## मेरा युवा भारत स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी नगरसेविका चालुक्य यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

युवकांनी मोठ्या प्रमाणात क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन आपले कौशल्य सिद्ध करावे आणि देशाचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन नगरसेविका वृषाली चालुक्य यांनी केले.

शासकीय मैदान नेहरूनगर येथे मेरा युवा भारत व सोलापूर स्पोर्ट्स अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी माजी तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव, राजेंद्र कुलकर्णी, वैभव कुलकर्णी तसेच मेरा युवा भारतचे समन्वयक सुभाष चव्हाण आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेमध्ये माढा, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, उत्तर सोलापूर आदी तालुक्यांतील खेळाडूंनी खो-खो, कबड्डी, १०० मीटर धावणे, गोळाफेक, लांब उडी, स्लो सायकलिंग आदी क्रीडा प्रकारांत सहभाग घेतला. सुमारे ८० खेळाडूंनी आपली उपस्थिती नोंदवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनंजय धेंडे यांनी केले. अकॅडमीचे सचिव वैभव कुलकर्णी यांनी आभार केले. हा कार्यक्रम जिल्हा युवा समन्वयक राहुल डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली झाला.



# सीए उत्कर्ष बनकरचा लोकमंगल बँकेत सत्कार

**सांगोला, दि. १८ मार्च-**

लोकमंगल बँक शाखा सांगोलाचे सल्लागार सीए उत्तम बनकर यांचे चिरंजीव उत्कर्ष बनकर हे नुकतेच सीए परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल बँकेचे संचालक विजय कुलकर्णी यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शाखा सल्लागार अमोल खरात, ॲड.गजानन भाकरे, गिरीश नष्टे, सीए उत्तम बनकर, उद्योगपती रामहरी लेंडवे, योगेश ज्ञानमोटे, व्यवस्थापक शिवाजी दरेकर उपस्थित होते. सर्वांचे स्वागत ज्योती गुळमिरे यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुहास वालीकर, अजय महामुनी, विजय स्वामी यांनी परिश्रम घेतले.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सामान्य विद्युत सेवा**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (सामान्य), मध्य रेल्वे, सोलापूर, हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी, खालील कामांकरिता प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-खरेदी संकेतस्थळावर (www.ireps.gov.in) ऑनलाईन ई-निविदा आमंत्रित करत आहेत. निविदा क्रमांक: SUR/L/T/2025/37, कामाचे नाव: सोलापूर विभागांतर्गत कलबुर्गी रेल्वे स्थानकावर नवीन 'पिट लाईन' (Pit Line) उपलब्ध करून देण्याशी संबंधित कामाचा 'विद्युत सामान्य सेवा' भाग., अंदाजित खर्च: रु. 1,86,23,708.30, निविदा सुरक्षा (Bid Security): रु. 3,72,500/-, कामाचा कालावधी: 09 महिने, प्रस्तावाची वैधता: 60 दिवस. संकेतस्थळावर निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख व वेळ: 09.04.2026 रोजी 15:00 वाजता. निविदा सुरक्षा रक्कम (Bid Security) ही www.ireps.gov.in या संकेतस्थळावर ई-पेमेंटद्वारे अदा करावी.

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (सामान्य)**
**DE/Sur-09 मध्य रेल्वे, सोलापूर**

सुरक्षित प्रवास करा,
फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.

# अणदूर येथे उद्या मोफत नेत्र तपासणी शिबीर

**अणदूर, दि. १८ मार्च-**

अणदूर येथील आश्वमेघ मित्र मंडळ व सोलापूर येथील शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले असून त्याचा गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे. शुक्रवार दि. २० मार्च रोजी अणदूर येथील धनराज मुळे कॉम्प्लेक्स मध्ये सकाळी ९/३० ते दुपारी २ वाजेपर्यंत सदरील शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या मध्ये सोलापूर येथील प्रसिद्ध नेत्र डॉक्टर रुग्णाची तपासणी करणार आहेत, मोतीबिंदू असणाऱ्या रुग्णांची मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार असून, सदरील शिबिराचा लाभ गरजूंनी घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**CHANGE IN NAME**

I HAVE DECLRAE THAT MY OLD NAME IS **Sabeena Taufiqurrehman Shaikh** HAS BEEN CHANGED TO **Sabeena Ahmed Sharif Shaikh**

Resi. - 280, Muslim Pacha Peth, Solapur

**KINDLY NOTE**

**THE SAME. (13235 Dtd.18.03.2026)**

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**६५ मिमी आकाराच्या खडीचा पुरवठा**

मध्य रेल्वे, सोलापूर येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे), हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामासाठी प्रतिष्ठित संस्था/कंत्राटदारांकडून ई-निविदा (e-tender) आमंत्रित करत आहेत. निविदा सूचना क्र.: 08-2026-SrDENS, कामाचे नाव: फेब्रुवारी 2023 च्या RDSO/LKO च्या अद्ययावत तपशीलांनुसार (latest specifications) - ज्यामध्ये अद्ययावत सुधारणा, रॉयल्टी आणि इतर शुल्क इत्यादींचा समावेश आहे- 65 मिमी आकाराची, यंत्राद्वारे फोडलेली खडी (machine crushed stone ballast) पुरवणे आणि रेल्वेच्या जागेवर (ground) साठवून ठेवणे; तसेच DUD डेपो येथील कामाच्या ठिकाणी (site) DEN यांनी दिलेल्या निर्देशानुसार ती खडी रेल्वेच्या हॉपर/वॅगन्स इत्यादींमध्ये भरून देणे. (एकूण 50,000 घनमीटर), कामाचा अंदाजित खर्च: रु. 5,27,29,500/-, बयाणा रक्कम (Earnest Money): रु. 4,13,700/-, कामाचा पूर्तता कालावधी: 18 महिने, देखभाल कालावधी (Maintenance Period): लागू नाही (NA), www.ireps.gov.in या संकेतस्थळावर निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख व वेळ: 07/04/2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत, www.ireps.gov.in या संकेतस्थळावर निविदा उघडण्याची तारीख व वेळ: 07/04/2026 रोजी 15:30 वाजता. इच्छुक निविदाकारांना असा सल्ला दिला जातो की, निविदा बंद होण्याच्या अंतिम तारखेपूर्वी त्यांनी या निविदेसंदर्भात जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्रक (corrigenda) पाहण्यासाठी संकेतस्थळाला वारंवार भेट द्यावी. संकेतस्थळ: www.ireps.gov.in

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे)**
**DE/Sur-08 मध्य रेल्वे, सोलापूर**

सुरक्षित प्रवास करा,
फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.

Classifieds

**विकणे आहे**

**2325 स्क्वे. फुट, गंगा नगर येथे, NA, क्लिअर टायटल, खुला प्लॉट विकणे आहे. जुना देगाव नाका, मंगळवेढा रोडटच, CNS हॉस्पिटलजवळ, सोलापूर-1, मो. 8975744539**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस या खरेदरपुर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णनः-** जिल्हा व उपजिल्हा सोलापूर पैकी तालुका दक्षिण सोलापूर पैकी सोलापूर जिल्हा परिषद हद्दीतील मौजे कुंभारी येथील प्लॉटजागा यांसी गट नं. ५२६/अ/३ यामधील नियोजित दयाल सरोवरमधील मंजूर फा.ले-आऊट व बिनशेती प्लॉट नं. ४४ याचे एकूण क्षेत्र १०० चौरस मीटर (यांसी ऑनलाईन उताराप्रमाणे क्षेत्र १.००.०० आर. चौ.मी.) किंवा १०७६ चौ. फुट इतके खुली जागा आहे. यांसी चतुः सिमा :-पुर्वेस - प्लॉट नं. ५० व ५१, दक्षिणेस - प्लॉट नं. ४५, पश्चिमेस - ९.०० मी. रुंदीचा रस्ता, उत्तरेस - प्लॉट नं.४३.

वर वर्णन केलेली प्लॉट जागा ही अनंत भगवंत पुराणिक यांचे खरेदी मालकी कब्जेवहिवाटीची आहे. सरदहू मालकांनी त्यांचे मालकीची वर नमूद प्लॉट जागा आमचे अशिलास कायम खुषखरेदी देण्याचे ठरविले आहे. सदरहू मालकांनी वरील प्लॉट जागा ही निर्वेध व निजोखमी असल्याची हमी व खात्रीही आमचे अशिलास दिलेली आहे.

तरी परंतु वर नमूद प्लॉट जागेवर अन्य कोणत्याही बँकेचे, वित्तीय संस्थेचे अथवा अन्य कोणाचेही, कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध व अधिकार, टाच, दान, लिज, साठेखत, पोटगी, कोर्ट दावा, गहाणखत, तारण वा बोजा वगैरे असल्यास त्यांनी ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ०४ दिवसांच्या आत खालील पत्यावर लेखी हरकत द्यावी. कोणाचेही कसलेही हरकत वा तक्रार मुदतीत न आल्यास आमचे अशिल वरील प्लॉटजागेचे पुढील खरेदीचे व्यवहार पुर्ण करतील याची नोंद घ्यावी.

ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली ता. १८/०३/२०२६.

**सही/-**
**ॲड. अमोल सतीश स्वामी**
**बी.कॉम., एलएल.बी.**
**रा. गाळा नं.९, स्क्वेअर-वन, कॉम्प्लेक्स, दिवाणी न्यायालयासमोर, सोलापूर**
**मो.नं. ९१७५७०२२११**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

### जाहीर प्रगटन

दि. कि. अर्ज नं. १/२०२६
नि. ५

**करमाळा येथील मे. सि.ज.सि.डि. साहेब यांचे कोर्टात**

**श्री नंदकिशोर बाबुराव गडकर**
वय - ६२, धंदा - सेवानिवृत्त,
रा. साईरामवाटीका, ए विंग, तळमजला,
ए/००१, खडकपाडा, कल्याण (पश्चिम), जि. ठाणे — **अर्जदार**

विरुध्द

१) **श्री श्रीकांत बाबुराव गडकर**
वय - ६९, धंदा - व्यावसाय,
रा. महाविरनगरी, जीव्हाळा, ए-१०,
राधा नगर सोसाटी जवळ, गांधार नगर,
खडकपाडा, कल्याण पश्चिम, ठाणे,
२) **सौ. ज्योती किरण समेळ,**
वय - ७१, धंदा - घरकाम,
रा. मार्तंड बंगला, संतोषी माता मंदीराजवळ,
कल्याण पश्चिम, जि. ठाणे — **सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार यांनी त्यांचे आई शांताबाई उर्फ दुर्गाबाई उर्फ इर्गबाई बाबुराव गडकर या दि.१०/०१/२०२५ रोजी कल्याण येथे मयत झालेने वारस या नात्याने अर्जदार यांनी या मे. न्यायालयात सदर अर्ज दाखल केलेला आहे. मयत शांताबाई उर्फ दुर्गाबाई उर्फ इर्गबाई यांचे नावे मौजे साडे, ता. करमाळा येथील शेतजमीन गट नं. **अ)** ६४२/१ चे क्षेत्र ०४ हे. ४० आर पोट खराब ०० ०८ एकूण ०४ हे. ४८ आर आकार रु.०४.०० पैसे, **ब)** ६४३ चे क्षेत्र ०० हे. १५ आर आकार रु.००.०५ पैसे, **क)** ६४४ चे क्षेत्र ०० हे २२ आर अकार रु.००.१० पैसे **ड)** मौजे साडे येथील सिटी सर्वे नंबर ६८६ याचे एकूण क्षेत्र ११३.१० चौरस मीटर बाबत अर्जदार व सामनेवाला हेच वारस आहेत करीता वारसा प्रमाणपत्र मिळणेकामी अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

त्याआर्थी, यातील अर्जदार व सामनेवाला यांचे व्यतिरिक्त कोणी वारस आहेत असे कोणास म्हणावयाचे असेल अथवा कोणाचा काही हक्क असलेस त्यांनी हे जाहीर प्रकटन झाले पासून ३० दिवसांचे आत अथवा दि. २३/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. या न्यायालयात स्वताः अगर आपले वकीलांमार्फत हजर राहून लेखी हरकत दाखल करावी अन्यथा मुदतीत कोणाची काही हरकत न आलेस यातील अर्जदार व सामनेवाला हे मयत शांताबाई उर्फ दुर्गाबाई उर्फ इर्गबाई यांचे वारस आहेत असे जाहिर केले जाईल अथवा इतर योग्य ते हुकूम केले जातील. त्यानंतर कोणाचीही हरकत अथवा तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

कोर्टाचे सही शिक्क्यासह आज दि. १६/०३/२०२६ रोजी प्रसिध्द केले.

| | | |
|---|---|---|
| **सही/-**<br>**क. लिपीक** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/-**<br>**सहायक अधिक्षक,**<br>**दिवाणी न्यायालय व. स्तर, करमाळा.** |

### जाहीर प्रगटन

दि. कि. अर्ज नं. १५/२०२६
नि. ६

**करमाळा येथील मे. सि.ज.ज्यु.डि. साहेब यांचे कोर्टात**

**श्री नंदकिशोर बाबुराव गडकर,**
वय - ६२, धंदा - सेवानिवृत्त,
रा. साईरामवाटीका, ए विंग, तळमजला,
ए/००१, खडकपाडा, कल्याण (पश्चिम), जि. ठाणे — **अर्जदार**

विरुध्द

१) **श्री श्रीकांत बाबुराव गडकर**
वय - ६९, धंदा - व्यावसाय,
रा. महाविरनगरी, जीव्हाळा, ए-१०,
राधा नगर सोसाटी जवळ, गांधार नगर,
खडकपाडा, कल्याण पश्चिम, ठाणे,
२) **सौ. ज्योती किरण समेळ,**
वय - ७१, धंदा - घरकाम,
रा. मार्तंड बंगला, संतोषी माता मंदीराजवळ,
कल्याण पश्चिम, जि. ठाणे) — **सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार यांनी त्यांचे आई शांताबाई उर्फ दुर्गाबाई उर्फ इर्गबाई बाबुराव गडकर या दि.१०/०१/२०२५ रोजी कल्याण येथे मयत झालेने वारस या नात्याने अर्जदार यांनी या मे. न्यायालयात सदर अर्ज दाखल केलेला आहे. मयत शांताबाई उर्फ दुर्गाबाई उर्फ इर्गबाई यांचे नावे सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादीत, सोलापूर मौजे साडे शाखा मधिल बचत खाते क्र. २८७५ मध्ये असलेली रक्कम रु. २३,०००/- बाबत अर्जदार व सामनेवाला हेच वारस आहेत करीता वारसा प्रमाणपत्र मिळणेकामी अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

त्याआर्थी, यातील अर्जदार व सामनेवाला यांचे व्यतिरिक्त कोणी वारस आहेत असे कोणास म्हणावयाचे असेल अथवा कोणाचा काही हक्क असलेस त्यांनी हे जाहीर प्रगटन झाले पासून ३० दिवसांचे आत अथवा दि. २२/०४/२०२६ रोजी सकाळी ११०० वा. या न्यायालयात स्वताः अगर आपले वकीलांमार्फत हजर राहुन लेखी हरकत दाखल करावी अन्यथा मुदतीत कोणाची काही हरकत न आलेस यातील अर्जदार व सामनेवाला हे मयत शांताबाई उर्फ दुर्गाबाई उर्फ इर्गबाई यांचे वारस आहेत असे जाहिर केले जाईल अथवा इतर योग्य ते हुकूम केले जातील. त्यानंतर कोणाचीही हरकत अथवा तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

कोटांचे सही शिक्क्यासह आज दि. १६/०३/२०२६ रोजी प्रसिध्द केले.

| | | |
|---|---|---|
| **सही/-**<br>**क. लिपीक** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/-**<br>**सहायक अधिक्षक,**<br>**दिवाणी न्यायालय क स्तर, करमाळा.** |

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर येथील तसेच आजूबाजूच्या परिसरातील लोकांना आमच्या अशिलानी दिलेल्या माहिती व कागदपत्रावरुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि।। व सब डि।। सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका ग.व.सु. हद्दीतील पेठ-शास्त्री नगर अ झोपडपट्टी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील झोपडी घर नं. ७५९ ही मिळकत घरजागा आमचे अशिल श्रीमती सुरेखा रमेश दंतकाळे यांचे मयत सासू कै. विमल केशवराव दंतकाळे यांचे नावावर असून याची नोंद सोलापूर महानगरपालिकेच्या ग.व.सु. विभागाचे कर आकारणी विभागास नोंद आहे. तसेच आमचे अशिलाचे सासरे कै. केशवराव विश्वनाथ दंतकाळे यांचेही दि. १४/०६/१९९८ रोजी मृत्यू झालेला आहे व तसेच आमचे अशिलाचे पती रमेश केशवराव दंतकाळे यांचेही दि. १९/११/१९९४ रोजी मृत्यू झालेला आहे. या सर्वांचे मृत्युपश्चात वर नमुद आमचे अशिल मयताचे सून या नात्याने मुख्य वारस आहेत त्यांचेशिवाय अन्य कोणीही वारस नाही.

सदरहू घरजागेत आमचे अशिल श्रीमती सुरेखा रमेश दंतकाळे हे त्यांचे कुटुंबासह कायमस्वरुपी राहणेस आहेत. सदरहू घर नं. ७५९ शास्त्रीनगर अ झोपडपट्टी या मिळकतीवरील आमचे अशिलाचे सासू कै. विमल केशवराव दंतकाळे यांचे नांव कमी करुन आमचे अशिल श्रीमती सुरेखा रमेश दंतकाळे यांचे नांवाची वारस नोंद करणेकामी सो.म.पा.चे कर आकारणी ग.व.सु. विभागाचे दप्तरी वारस नोंद होऊन त्यांचे नावे कर पावती मिळावे याकरिता आमचे अशिल म.न.पा.कडे अर्ज दाखल करणार आहेत.

तरी सदरहू घरजागेवर आमचे अशिला व्यतिरिक्त इतर कोणाचाही कुठल्याही प्रकारचे हक्क व अधिकार असेल अथवा इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, लीज, करार, मदार, टाच, जप्ती, बोजा, पोटगी, बक्षिसपत्र, खरेदीखत अगर इतर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही कसलेही हरकत व तक्रार न आल्यास ही घरजागा निर्वेध, निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांचे नांवाची वारस नोंद सो.म.पा. चे कर आकारणी विभाग, ग.व.सु. विभागाचे दप्तरी त्याचे नावाची वारस नोंद करून घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख : १९/०३/२०२६

**सही/-**
**ॲड. एस.एम. ढेकणे**
**रा. १२६-ए, वाणी गल्ली बाळे,**
**ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम विशेषतः डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी बार्शी म्यु.पल हद्दीतील व आसपासचे परिसरातील लोकांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

१) **मिळकतीचे वर्णन :** डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी बार्शी शहर म्यु.पल हद्दीतील गट नं. १२४०/३ याचे क्षेत्रफळ ०५ हे. ८९ आर., यापैकी पुर्व बाजूची जमीन याचे क्षेत्र ०२ हे. ४५ आर., यापैकी उत्तर-पश्चिम कोपऱ्यातील बाजूकडून बार्शी-लातूर बाहय वळण रस्त्यासाठी संपादन केलेले क्षेत्र सोडून जमीन याचे क्षेत्र ०१ हे. ६२.४३ आर., यापैकी पश्चिम-दक्षिण कोपऱ्यातील मिळकत ०० हे. २०.६० आर., याचा आकार ०० रु. २७ पैसे, यांसी चतुःसिमा :- पुर्वेस - वर नमुद मिळकतीतील ३० फुट रुंदीचा अंतर्गत रस्ता व गट नं. १२४०/३ पैकी सुरजितसिंह कोकाटे यांचे नावे असलेली उर्वरीत मिळकत, दक्षिणेस गट नं. १२४०/४, पश्चिमेस लिहून घेणार बापुसाहेब अंधारे यांचे मालकीचे गट नं. १२४०/३ पैकीचे ५० आर. क्षेत्र व उत्तरेस - गट नं. १२४०/३ पैकी लिहून देणार यांनी नाकाडे यांना विक्री केलेले क्षेत्र, येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक वर्णनाची मिळकत, आतील झाड-झुडुपे, दगड-माती, तदंगभूत वस्तुंसह

२) वर कलम १ मध्ये नमुद केलेली मिळकत ही श्री. सुरजितसिंह शंकर कोकाटे, रा. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांच्या स्वकष्टार्जीत खरेदी मालकीची असून, मिळकतीचे हक्कपत्रकी व रेकॉर्ड ऑफ राईटसला त्यांचे नावाची नोंद आहे. वर कलम १ मध्ये नमुद केलेली मिळकत ही सुरजितसिंह शंकर कोकाटे यांनी योग्य त्या बाजारभाव किंमतीने आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरवून तसा आमचे अशिलांसोबत इसार पावतीचा करार केलेला आहे. सदर मिळकत ही स्वतंत्र मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची, निर्वेध, निजोखमी व बिन-बोजाची असल्याची खात्री मिळकत मालकाने आमच्या अशिलास दिलेली आहे व आमचे अशिलांचीही तशी खात्री झालेली आहे.

३) तरी वर नमुद मिळकतीवर कोणाचा कसलाही हक्क हितसंबध असल्यास, सदर मिळकती संदर्भाने कोणी इसार पावती, साठेखत, गहाणखत, खरेदीखत, भाडेपट्टा, दान, लिज, पोटगी, हितसंबंध, बोजा, बक्षिस, मृत्युपत्र किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर मिळकतीवर कोणाचा बोजा असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०५ दिवसाच्या आत आमच्या अशिलास लेखी स्वरुपात कागदपत्रासह विधीज्ञांचे खालील नमुद पत्यावर हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बिन-बोजाची आहे, असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही हरकत आमचे अशिलांचे खरेदी हक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणुन ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली असे. दि. १८/०३/२०२६.

**सही/-**
**ॲड. प्रशांत पांडुरंग एडके**
**कचेरी रोड, न्यायालयाच्या समोर,**
**खेडकर बिल्डींग, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**मो.नं. ७३८५११०१८५/९८२२८१६४७८**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

### जाहीर प्रगटन

लातूर जिल्हा विशेषतः मौजे यावली (दु.), ता. बार्शी जि. सोलापूर येथील तमाम जनतेस या जाहीर प्रगटनद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार बालाजी चंद्रकांत कल्याणे रा. पंचशिल नगर, किनगाव ता. अहमदपूर जि. लातूर यांनी मला दिलेल्या माहिती व दाखविलेल्या कागदपत्रावरुन सर्व जनतेच्या माहितीस्तव पुढीलप्रमाणे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांना **१)** सुनिता आण्णा चव्हाण यांची जमीन गट नंबर ५५३/१ मधील खरेदी मालकी जमीन क्षेत्र ३ हे. १३ आर, **२)** आण्णा जगनाथ चव्हाण यांची जमीन गट नंबर ५५३/१ मधील खरेदी मालकी जमीन क्षेत्र ३ हे. १४ आर, **३)** विठ्ठल जगन्नाथ चव्हाण यांची जमीन गट नंबर ५५३/२ मधील खरेदी मालकी जमीन क्षेत्र २ हे. ४० आर, **४)** मनिषा विठ्ठल चव्हाण यांची जमीन गट नंबर ५५३/२ मधील खरेदी मालकी जमीन क्षेत्र २ हे. ४० आर व **५)** रवि विठ्ठल चव्हाण यांची जमीन गट नंबर ५५३/२ मधील खरेदी मालकी जमीन क्षेत्र २ हे. ३८ आर आहे.

वर नमुद शेत जमीनी विक्रीचा ठराव १) सुनिता आण्णा चव्हाण, २) आण्णा जगन्नाथ चव्हाण, ३) विठ्ठल जगन्नाथ चव्हाण, ४) मनिषा विठ्ठल चव्हाण व ५) रवि विठ्ठल चव्हाण यांनी माझ्या पक्षकारांसोबत केला असून इसारापोटी कांही रक्कम स्विकारलेली आहे. उर्वरीत रक्कम खरेदीखताच्या दिवशी देण्याचे ठरले असून खरेदीखतासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्राची पुर्तता पूर्ण करण्याची जबाबदारी ही लिहुन देणार यांची आहे, तसेच विद्यमान मालकाने सदर शेत जमीनी ही निर्विवाद व निजोखीम असल्याची हमी माझ्या पक्षकारास दिली आहे.

तरी सदर शेत जमीनीबाबत जर कोणाचा उजर, हक्कसंबंध, कर्जबोजा, गहाणखत, बक्षिस पत्र, कोर्ट डिक्री, मृत्युपत्र, तारण, लिज, लिन, हिबानामा, शेजाऱ्यांचा वाद, शासकीय अथवा निमशासकीय कर्ज व इतर काही असेल तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत माझे खालील दिलेल्या कार्यालयीन पत्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी उजर अथवा अक्षेप दाखल करावा व त्याची रितसर पोहोच घ्यावी. मुदतीमध्ये जर कोणाचा उजर अथवा आक्षेप नाही आल्यास सदरील शेत जमीन ही निर्विवाद व निजोखीम आहेत असे गृहीत धरुन माझे पक्षकार हे सदर शेत जमीनीचे नोंदणीकृत खरेदीखत करुन घेतील. त्यानंतर येणारा उजर, आक्षेप माझे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्व जनतेनी नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन. दि.१६/०३/२०२६

| | |
|---|---|
| **जाहीर प्रगटन देणार,**<br>**सही/-**<br>**बालाजी चंद्रकांत कल्याणे तर्फे** | **सही/-**<br>**ॲड. डी.जी. मिटकरी**<br>**बी.ए., एल एल.बी.**<br>**मो.नं. ९४२०८७२४२१**<br>**कार्यालय : मिटकरी निवास, शिव नगर, सिग्नल कॅम्प, लातूर मो.नं. ९४२०८७२४२१** |

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे गोरमाळे व आसपासचे परिसरातील तसेच बार्शी तालुक्यातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डि. सोलापुर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे गोरमाळे येथील शेतजमीन गट नं. १९१ क्षेत्र ०० हे १५ आर, आकार ०० रु ०६ पैसे व गट नं. १९२ क्षेत्र ०१ हे ४७ आर, आकार ०३ रु. ११ पैसे येणेप्रमाणे शेतजमिनी आतील सर्व तदंगभुत वस्तु व मालकी वहिवाटीच्या हक्कांसह.

वर नमुद केलेल्या मिळकती या आमचे अशिल रामलिंग श्रीपती बळी व त्यांचे चुलत भाऊ किसन भाऊ बळी आणि मयत चुलत भाऊ भगवान व एकनाथ यांचे वारस मंगल भगवान बळी, शुभांगी अशोक सावंत, स्वाती भगवान बळी, अनुपमा गणेश भालेकर, अमित भगवान बळी, श्रध्दा दादासाहेब टोणपे, सुनिता अंबऋषी ननवरे, चंद्रकांत एकनाथ बळी, महारुद एकनाथ बळी, कालीदास एकनाथ बळी, हरीदास एकनाथ बळी, यांचे एकत्र हिंदु कुटुंबाच्या व प्रत्यक्ष सामाईक कब्जे वहिटीच्या असुन सदर मिळकतीचे ७/१२ हक्कपत्रकी आमचे अशिल रामलिंग श्रीपती बळी यांचे सह वर नमुद त्यांचे कुटुंबातील सदस्यांची समाईकात नावाची नोंद आहे. सदर मिळकतींचे अद्यापपावेतो कोणत्याही प्रकारे वाटप विभाजन झालेले नाही. सदर मिळकतीमध्ये आमचे अशिलांचा अविभक्त हक्क हिस्सा आहे. असे असताना आमचे अशिलांचा चुलत भाऊ व मयत चुलत भावांचे वर नमुद कायदेशीर वारस आमचे अशिलांचे एकत्र हिंदु कुटुंबास कोणत्याही प्रकारची कायदेशीर गरज नसताना सदर मिळकतींचे ७/१२ हक्कपत्रकी असलेल्या नोंदीचा गैरफायदा घेऊन व सदर मिळकतीचे वाटप विभाजन झालेले नसताना विक्री करण्याचे प्रयत्नात आहेत. त्यामुळे गोरमाळे येथील गट नं. १९१ व १९२ चे ७/१२ हक्कपत्रकी असलेल्या नोंदीचा गैरफायदा घेवुन आमचे अशिलांचा कायदेशीर हक्क हिस्सा, डावलुन किसन भाऊ बळी व इतर वरील व्यक्ती या सदर मिळकती बाबत बेकायदेशीर खरेदीखत, गहाण, दान, बक्षीस, साठेखत, मृत्युपत्र, वारसा, फेडपत्र, टाच, कर्ज-बोजा, करार, नोटरी, अथवा अन्य हस्तांतरणाचा दस्त करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे किसन भाऊ बळी व इतर वरील व्यक्ती यांचेशी कोणीही कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार करु नये. या ऊपर हस्तांतरणाचा व्यवहार केल्यास तो मुळीच आमचे अशिलांचे हक्क, हिस्सा, अधिकारांवर बंधनकारक राहणार नाही. आमचे अशिलांचे हक्काची माहिती व्हावी तसेच कोणाचीही फसगत होवु नये म्हणुन ही जाहीर नोटीस दिली असे ता. १९/०३/२०२६

**सही/-**
**ॲड रणजित नेताजी गुंड**
**बी.एस.एल. एलएल.एम.**
**ॲड राजकुमार शशिकांत गुंड**
**बी.ए.एलएल.बी**
**मो. ९८६०००७१२३**
**ऑफिस- छत्रपती नगर, हॉटेलसागर समोर, बार्शी रोड, मानेगांव (वैराग) ता. बार्शी**
**आमचे अशिल-श्री रामलिंग श्रीपती बळी तर्फे ॲडव्होकेट**

### जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १०/२०२६

**अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

**सिद्राम विठ्ठल शिवशरण** - **अर्जदार**
विरुध्द
**कोणीही नाही** - **सामनेवाला**

ज्याअर्थी वरील अर्जदारांने अक्कलकोट येथील दिवाणी कोर्टात मयत गंगाबाई विठ्ठल शिवशरण यांचे पश्चात कायदेशीर वारसदार या नात्याने मयत गंगाबाई विठ्ठल शिवशरण यांच्या नावे या मे. कोर्टाकडे वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी याबाबत कोणाची हरकत असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत अथवा नेमलेल्या तारखेस दिनांक ०२/०५/२०१६ रोजी मे. कोर्टात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहून लेखी हरकत दाखल करावी, अन्यथा मे. कोर्ट कोणाचीही हरकत नाही, म्हणून अर्जदाराच्या मागणीप्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ही जाहीरनामा दाखल केले दिनांक १८/०३/२०२६

| | | |
|---|---|---|
| **सही/-**<br>**कनिष्ठ लिपीक** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/-**<br>**सह. अधिक्षक**<br>**दिवाणी व फौजदारी न्यायालय, अक्कलकोट** |

### जाहीर प्रसिद्धीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ४०/२०२५
नि-०७

**पंढरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन सो यांचे कोर्टात**

१) **श्री. अनिल गोपाळ भाळवणकर (जोशी)**
वय वर्षे - ८२, धंदा - सेवानिवृत्त व शेती,
रा. फ्लॅट नं. ५०३, ईस्टर्न मॅजिस्ट्री, टाटा कॉलनी,
मुलुंड (ईस्ट), मुंबई ४०००८१
२) **सुभाष गोपाळ भाळवणकर (जोशी)**
वय वर्षे - ७८, धंदा - सेवानिवृत्त व शेती,
रा. एस.टी. कॉलनीजवळ, नक्षत्र बंगलो, निर्मिती बहार,
विजापूर रोड, सोलापूर पिन - ४१३००४
स्वतःसाठी व अर्जदार नं. १, ३ ते ७ यांचे कुलमुखत्यार म्हणून
३) **मुरलीधर गोपाळ भाळवणकर (जोशी)**
वय वर्षे - ७६, धंदा - सेवानिवृत्त व शेती,
रा. प्लॉट नं. २६, विठ्ठल नगर, पंढरपूर ता. पंढरपूर, जि. सोलापूर
४) **वामन गोपाळ भाळवणकर (जोशी)**
वय वर्षे - ७०, धंदा - सेवानिवृत्त व शेती,
रा. प्लॉट नं. ४०/२/ब/२१, नागालॅण्ड हॉटेल पाठीमागे,
सिध्दीविनायक नगर, पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर
५) **विलास गोपाळ भाळवणकर (जोशी)**
वय वर्षे - ६८, धंदा - सेवानिवृत्त व शेती,
रा. फ्लॅट नं. १७-ए, शिवतेज अपार्टमेंट, तेजस नगर,
मंत्री पार्क, कोथरूड ४११०३८
६) **सौ. अनुराधा अशोक लाले**
वय वर्षे - ७०, धंदा - गृहिणी
रा. फ्लॅट नं. बी-३०२, सर्व्हे नं. २७/१, लिगसी मिलेनिया
सीएचएस, जीके रोस अस्टर समोर, पुनावळे,
पुणे सिटी, पुणे ४११०३३
७) **सौ. वसुमती विलास डंके,**
वय वर्षे - ७४, धंदा - गृहिणी,
रा. स्नेहल टेरेस बी-६, फ्लॅट नं. बी-७ भुजबळ टाऊनशिप,
एकलव्य पॉलिटेक्निक कॉलेज पाठीमागे, कोथरूड, पुणे ४११०३८ — **अर्जदार**

विरूध्द

**कोणीही नाही** - **सामनेवाले**

तमाम लोकांना विशेषतः भाळवणी, ता. पंढरपूर येथील आसपासचे लोकांना याद्वारा असे सुचित करण्यात येत आहे की, यातील अर्जदार यांनी मयत सदाशिव विठ्ठल भट-जोशी (भाळवणकर) यांचे वारस गोपाळ दिगंबर भाळवणकर (भट-जोशी) यांची मुले अर्जदार हे वारस असल्याबाबत औपचारीकपणे जाहिर करून त्यांचे नावे वारस दाखला मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. याकामी कोणाचीही काहीही हरकत असल्यास दि. १३/०४/२०२६ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता उपरोक्त न्यायालयात स्वतः जातीने वा मुखत्यारद्धारा वा न्यायालयाने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे योग्य व समाधानकारकरित्या देऊ शकतील अशा विधी व्यवसायिक वकीलामार्फत हजर रहावे व आपले म्हणणे द्यावे. तसे न घडल्यास, मग उपरोक्त न्यायालय आपल्या अनुपस्थितीत पुढील योग्य ते आदेश करतील, याची नोंद घ्यावी.

ही जाहिर नोटीस दि. १३/०३/२०२६ रोजी आमचे सही निशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

ही जाहिर नोटीस दिली दिनांक : १३/०३/२०२६

| | | |
|---|---|---|
| **सही/-**<br>**कनिष्ठ लिपीक** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/-**<br>**अधिक्षक**<br>**दिवाणी न्यायालय व. स्तर, पंढरपूर** |

# सोलापूर जिल्हा परिषदेत भाजपाचे ऐतिहासिक वर्चस्व

## ● जनतेच्या विश्वासाला पात्र राहून काम करा : नूतन पदाधिकाऱ्यांना पालकमंत्र्यांचा सल्ला
## ● नूतन अध्यक्ष वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी मानले जनतेसह पक्षाचे आभार
## ● सोलापूरचा चौफेर विकास करणार असल्याचे दिले जिल्हावासियांना आश्वास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ मार्च-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी बार्शी तालुक्यातील उपळाईचे दीपक वैद्य तर उपाध्यक्षपदी मार्डीचे इंद्रजीत पवार यांची निवड झाल्यानंतर त्यांचा पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना गोरे यांनी हा दिवस सोलापूर जिल्ह्याच्या दृष्टीने ऐतिहासिक असल्याचे सांगत नूतन पदाधिकाऱ्यांना जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे आवाहन केले.

एका सामान्य शेतकरी कुटुंबातील व्यक्ती जिल्हा परिषद अध्यक्ष होणे हे केवळ भाजपमुळे शक्य झाले आहे. आजपर्यंत कोणत्याही पक्षाला असे बहुमत मिळाले नव्हते. हा क्षण ऐतिहासिक आहे, असे गोरे म्हणाले.उपाध्यक्षपदी निवड झालेले इंद्रजीत पवार हे भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते असून पक्षाचा मजबूत वारसा त्यांच्याकडे असल्याचेही त्यांनी नमूद केले. जिल्ह्यातील सर्व नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम केल्यामुळेच हा विजय शक्य झाल्याचे सांगत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाचे कौतुक केले. निवडणुकीदरम्यान बाहेरचा पालकमंत्री म्हणून माझ्यावर टीका झाली होती, मात्र त्याच लोकांनी नंतर पालकमंत्री कुठे जिल्ह्यात लक्ष घालत असतात का, अशी आरोळी उठवली असल्याचे गोरे यांनी जनतेला दिलेला शब्द पाळा, मी दिलेले २१ कोटी रुपये देण्याचे वचन पूर्ण करणारच, असे



स्पष्ट केले. निवडणूक संपल्यानंतर सर्व पक्षांना सोबत घेऊन काम करण्याची भूमिका त्यांनी मांडली. निवडणुकीत महायुती नसली तरी आता सर्वांना घेऊन जिल्ह्याच्या विकासासाठी काम करू, असे ते म्हणाले. जिल्हा परिषदेत मिळालेले वर्चस्व आनंददायी असले तरी जबाबदारीही तितकीच मोठी असल्याचे सांगत त्यांनी नूतन सदस्यांना लोकांच्या अपेक्षांना न्याय द्या, संधीचे सोने करा, असा सल्ला दिला. दरम्यान, पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या दमदार भाषणानंतर राजेंद्र राऊत यांच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत सभागृह टाळ्यांनी दणाणून सोडले. भाषणानंतर जिल्हा परिषद आवारात राऊत समर्थकांनी जल्लोष करत फटाक्यांची आतिशबाजी केली. यावेळी आमदार सचिन कल्याण शेट्टी, माजी आमदार प्रशांत परिचारक, राजन पाटील, राजेंद्र राऊत, राम सातपुते, दीपक साळुंखे पाटील, जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, शहराध्यक्ष चेतन केदार, रोहिणी तडवळकर यांसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

**नूतन अध्यक्ष व उपाध्यक्षांनी दिले आश्वासन :** नूतन अध्यक्ष दीपक वैद्य आणि उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी सत्काराला उत्तर देताना म्हणाले की, सर्व सोलापूर जनतेचे तसेच पक्षातील ज्येष्ठ नेत्यांचे आभार मानतो. त्यांनी आम्हाला या पदावर विराजमान केले आहे. सोलापूर शहराचा विकासासाठी नेहमी प्रयत्नशील राहू अशा आश्वासन देखील त्यांनी यावेळी उपस्थित नवनियुक्त सदस्यांना आणि पक्षातील पदाधिकारी तसेच ज्येष्ठ नेत्यांना दिले.

**शेतकरी 'सभागृहाचा मालक' बनल्याचा अभिमान :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी कार्यकर्त्यांना बळ दिले. बार्शीकरांना प्रथमच अशी मोठी संधी मिळाली असून शेतकरी जिल्हा परिषद सभागृहाचा 'मालक' बनल्याचा अभिमान आहे. पुढील कारभार शिस्तबद्ध व पारदर्शक राहील, असा विश्वास माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी व्यक्त केला.

**एक सदस्य ते ३८ सदस्य भाजपाची झेप :** ६८ सदस्य असलेल्या सभागृहात एकेकाळी भाजपचा केवळ एक सदस्य जिल्हा परिषदेत होता, आज तब्बल ३८ सदस्य निवडून आले आहेत. पालकमंत्री गोरे यांच्या नेतृत्वाची ही ताकद आहे, असे माजी आमदार राम सातपुते म्हणाले.

**निधीची कमतरता भासणार नाही :** जिल्हा परिषद इतिहासात प्रथमच एवढे मोठे बहुमत मिळाले असून त्यामागे कार्यकर्त्यांची ताकद आहे. ग्रामविकास खाते पालकमंत्र्यांकडे असल्याने निधीची अडचण भासणार नाही, असा विश्वास माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी व्यक्त केला.

**भाजपाचे आमदार वाढवण्याचे लक्ष्य :** आजचा दिवस सुवर्णाक्षरांनी लिहावा असा असून यापुढे जिल्ह्यातील सर्व आमदार भाजपचे निवडून यावेत, यासाठी झेडपी सदस्यांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन माजी आमदार राजन पाटील यांनी केले.

**नेतृत्वावर जनतेचा शिक्कामोर्तब :** झेडपीमध्ये प्रथमच भाजपची सत्ता आली असून हा ऐतिहासिक विजय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वामुळे शक्य झाला आहे. नूतन पदाधिकारी जनतेच्या अपेक्षांनुसार काम करतील, असा विश्वास आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केला.

---

# मूकपदयात्रेद्वारे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांना आदरांजली



### पुण्यतिथीनिमित्त श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचा उपक्रम : शेकडो हिंदू बांधवांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपति धर्मवीर छत्रपति श्री संभाजी महाराज यांच्या बलिदान दिवसानिमित्त बुधवारी मूकपदयात्रेद्वारे आदरांजली वाहण्यात आली. श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान सोलापूर विभागातर्फे या मूकपदयात्रेत शेकडो हिंदू बांधव सहभागी झाले होते.

धर्मवीर छत्रपति श्री संभाजी महाराज यांची समाधी असलेल्या श्रीक्षेत्र वढू बुद्रुक येथून मूकपदयात्रेसाठी मशाल प्रज्वलित करून आणण्यात आली होती. परिवहन समितीचे माजी सभापती जय साळुंखे यांच्या हस्ते शिवस्मारक येथे मशालीचे आणि भगव्या ध्वजाचे पूजन झाल्यानंतर मूकपदयात्रेस प्रारंभ झाला. यावेळी नगरसेवक संजय कोळी, नगरसेवक राजकुमार पाटील, महादेव गवळी, सागर अतनुरे उपस्थित होते. शिवस्मारकपासून निघालेली मूकपदयात्रा भागवत चाळ, पत्रा तालीम, श्री सळई मारुती मंदिर, वडार गल्ली, बाळीवेस, विजयी चौक, श्री शिवगंगा मंदिर, बलिदान चौक मार्गे महापालिका शाळा क्रमांक दोन जवळ विसर्जित झाली. प्रेरणामंत्राने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. श्री संभाजीसूर्यहृदय श्लोकमालिका सामूहिकरीत्या म्हणण्यात आली. यावेळी इतिहास व्याख्याते केदार केसकर यांनी 'धर्मवीर छत्रपति श्री संभाजी महाराज बलिदान मास' विषयावर मार्गदर्शन केले. ध्येयमंत्राने कार्यक्रमाचा समारोप झाला. याप्रसंगी श्री शिवप्रतिष्ठानचे शेकडो धारकरी उपस्थित होते.



# आई प्रतिष्ठानतर्फे शासकीय रुग्णालयात दुर्धर आजारग्रस्त ३५० मुलींना पौष्टिक आहार वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

दुर्धर आजाराने ग्रस्त असलेल्या सुमारे ३५० गरजू मुली आणि महिलांना आई प्रतिष्ठानतर्फे पौष्टिक आहाराचे वाटप करण्यात आले. गुढीपाडवा आणि जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने राबविलेल्या आई प्रतिष्ठानच्या या कौतुकास्पद उपक्रमामुळे गरजूंचा गुढीपाडवा गोड झाला.

छत्रपती शिवाजी महाराज शासकीय सर्वोपचार रुग्णालयातील डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या एआरटी प्लस सेंटरमध्ये बुधवारी हा कार्यक्रम झाला. प्रारंभी व्याहाती होम करून कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. याप्रसंगी व्यासपीठावर प्रभारी अधिष्ठाता डॉ. विद्या किरणकर, उपअधिष्ठाता डॉ. नरेश झंजाड, वैद्यकीय अधीक्षक डॉ. संपत तोडकर, वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. अग्रजा चिटणीस, आई प्रतिष्ठानच्या सृष्टी डांगरे उपस्थित होते. यावेळी दुर्धर आजारग्रस्त मुली आणि महिलांना पौष्टिक आहाराचे ३५० किट वाटण्यात आले. उपअधिष्ठाता डॉ. नरेश झंजाड म्हणाले, महिलांसाठी आई प्रतिष्ठान करत असलेले कार्य कौतुकास्पद आहे. दुर्धर आजारग्रस्त महिलांना पौष्टिक आहार देण्याची संकल्पना अत्यंत चांगली असून यातून महिलांना आर्थिक आणि मानसिक आधार मिळतो. वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. चिटणीस म्हणाल्या, दुर्धर आजाराबद्दल समाजात अनेक गैरसमज आहेत. ते दूर होण्याची आवश्यकता आहे. शासनाकडून आजारग्रस्तांना सर्वतोपरी सहाय्य करण्यात येते. औषधोपचाराने आजार बरा होत असल्यामुळे रुग्णांनी शासकीय रुग्णालयात उपचार घ्यावेत, असेही डॉ. चिटणीस याप्रसंगी म्हणाल्या.

आई प्रतिष्ठानच्या सृष्टी डांगरे म्हणाल्या, आई प्रतिष्ठानकडून दुर्धर आजारग्रस्त महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षण, शिलाई प्रशिक्षण, संगणक, ब्युटी पार्लर तसेच इतर व्यवसायांचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था आहे. गरजू महिलांनी याचा लाभ घ्यावा. आपण उभारलेली गुढी फक्त आपल्या घरासाठी नाही. तर समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या सन्मानासाठी असली पाहिजे.कोणताही आजार कोणाचं आयुष्य थांबवत नाही. तुम्हालाही स्वप्न आहेत, तुम्ही पुढे जाऊ शकता, आणि समाजात आपलं स्थान निर्माण करू शकतात.समाजातील प्रत्येक घटकाने एकमेकांचा आधार बनून समाजाचा विकास करणे आवश्यक असल्याचेही सृष्टी डांगरे यांनी याप्रसंगी सांगितले. डॉ. अग्रजा चिटणीस यांनी प्रास्ताविक तर वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनीता गायकवाड यांनी सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केले.

### तक्रार प्रलंबित ठेवल्याप्रकरणी

# महापालिकेतील ४६ अधिकारी-कर्मचाऱ्यांना दंड

### एकूण १८ हजार ८०० रुपये दंडाची केली आकारणी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

नागरिकांनी नोंदवलेल्या अधिसूचित सेवा वेळेत न निकाली काढणाऱ्या आणि तक्रारी प्रलंबित ठेवणाऱ्या महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अखेर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत महानगरपालिकेने एकूण ४६ अधिकारी-कर्मचाऱ्यांवर आर्थिक दंड ठोठावला असून एकूण १८ हजार ८०० रुपयांचा दंड वसूल करण्याचे आदेश उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिले आहेत.

महापालिकेतील घनकचरा व्यवस्थापन विभाग, जन्म मृत्यू नोंदणी विभाग, बांधकाम परवाना , विविध झोन कार्यालय, आरोग्य विभाग तसेच इतर संबंधित विभागांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी विविध सेवा विहित कालावधीत न दिल्याचे निदर्शनास आले होते. या प्रकरणात नागरिकांच्या तक्रारी अद्याप प्रलंबित असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार विविध विभागातील एकूण ४६ कर्मचाऱ्यांवर ही कारवाई करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांना एकूण १८ हजार ८०० रुपये दंड आकारण्यात आला आहे. हा दंड त्यांच्या मार्च २०२६ पेड इन एप्रिलच्या वेतनातून वसूल केला जाणार आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून कामकाजातील निष्काळजीपणा मुळे लोकसेवेवर परिणाम होत असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष केल्यास कारवाई अटळ असल्याचा कडक इशारा महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिला आहे.

---

# कै.कल्याणराव-बाळासाहेबांचं पुण्यस्मरणदीन सर्वांसाठी एक प्रेरणादायी प्रवास : श्री.म.नि.प्र. डॉ.अभिनव बसवलिंग महास्वामीजी

### १० व्या पुण्यस्मरण दिनानिमीत्त कै.कल्याणराव इंगळे स्मृती उद्यानात कै.कल्याणराव इंगळे यांच्या अर्धपुतळ्याचे महास्वामीजी व नगराध्यक्षांच्या हस्ते अनावरण व अभिवादन

### इंग्रजी कार्यशाळेसह तंत्रनिकेतन महाविद्यालय व कराड येथील हुतात्मा अपंग बहूउद्देशीय विकास कल्याणकारी संस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थी व गुणवंतांना पुरस्कार आणि सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि.१८ मार्च-**

दरवर्षी १८ मार्च उगवले की मनातील गाभाऱ्यात सामावलेले कै.कल्याणराव (बाळासाहेब) इंगळे यांच्या स्मृती जागृत होतात ते स्वामी सेवक कै.बाळासाहेबांच्या अजरामर सेवाभावामुळे. कै.बाळासाहेबांची ही सेवाभाव प्रवृत्ती व त्यांचे पुण्यस्मरण दिन आम्हाला आजही नेमहीच प्रेरणा देत असते, म्हणून कै.कल्याणराव उर्फ बाळासाहेबांचं पुण्यस्मरणदीन आपल्या सर्वांसाठी एक प्रेरणादायी प्रवास असल्याचे भावोद्गार नागणसूर येथील तुप्पीन मठाचे श्री.म.नि.प्र.डॉ.अभिनव बसवलिंग महास्वामीजी यांनी काढले.

कै.कल्याणराव इंगळे स्मृती उद्यान व कै. कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयात मंदीर समितीचे व तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांच्या अधिपत्त्याखाली व प.पू. मोहनराव (गुरुजी) पुजारी, हिरेमठ गौडगांव संस्थानचे शिवाचार्यरत्न श्री.ष.ब्र.डॉ. जयसिध्देश्वर महास्वामीजी, जगद्गुरु बसवलिंगेश्वर महासंस्थान नागणसूर तुप्पीन मठाचे श्री.म.नि.प्र.डॉ.अभिनव बसवलिंग महास्वामीजी, अक्कलकोट विरक्त मठाचे श्री.म.नि.प्र.बसवलिंग महास्वामीजी, मादन हिप्परगा विरक्त मठाचे श्री.म.नि.प्र.अभिनव महाशिवलिंगेश्वर महास्वामीजी, हत्तीकणबस विरक्त मठाचे श्री.म.नि.प्र. प्रभूशांत स्वामीजी, श्री.स्वामी समर्थ समाधी मठाचे वे.शा.प.पू.अण्णू महाराज पुजारी यांच्या दिव्य सान्निध्यात नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, उपनगराध्यक्ष बंटी राठोड, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, प्रथमेश



इंगळे, महाराष्ट्र राज्य शिवभक्त प्रतिष्ठानचे पै.अनिकेतभाऊ घुले, करमाळा पंचायत समितीचे मा.सभापती संपतराव शिंदे, कराड येथील हुतात्मा बहुउद्देशीय अपंग कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष सुनील फडतरे, पुणे येथील यश कल्याणी सेवाभावी संस्थेचे चेअरमन गणेश करे-पाटील, मडगाव गोवा येथील श्री स्वामी समर्थ मंदिराचे संस्थापक जयेश नाईक, माजी पंचायत समिती सदस्य सिद्धेश्वर स्वामी, चिपळूण येथील उद्योजक डॉ.विलास मोरे, डॉ.विजय माटे, दिलीप भाऊ सिध्दे, देवस्थानचे विश्वस्त संपतराव शिंदे, उज्वलाताई सरदेशमुख, माण तालुका भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष साधना गुंडगे, करमाळ्याचे बाळकृष्ण लावंड, पक्षीमित्र कल्याणराव साळूंखे, नगरसेविका अपर्णाताई सिध्दे, नगरसेवक अविनाश मडीखांबे, पोलीस निरीक्षक भिताडे साहेब, नगरसेवक शिवकुमार स्वामी, नन्नू कोरबू, दहिवडी माणचे सिध्दार्थ गुंडगे, कलाकार अथर्व कर्वे, साक्षी महाजन कर्वे आदींसह ज्ञात अज्ञात मान्यवरांनी कै.कल्याणराव इंगळे यांच्या अर्धपुतळ्यास अभिवादन केले. यावेळी उद्यानातील महालक्ष्मी मंदीराच सुशोभिकरण शुभारंभ व पुजन ही करण्यात आले. यावेळी श्री.म.नि.प्र.डॉ. अभिनव बसवलिंग महास्वामीजी बोलत होते. यावेळी कै.कल्याणराव इंगळे यांच्या १० व्या पुण्यस्मरणानिमीत्त इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयात आयोजीत करण्यात आलेल्या आरोग्य शिबीर, क्युप्रेशर शिबीर, रक्तदान शिबीर आदी उपक्रमांचे नगरसेवक महेश इंगळे यांच्या अधिपत्त्याखाली महास्वामीजींच्या दिव्य सान्निध्यात नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांच्या शुभहस्ते शुभारंभ करण्यात आले. ९३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी कै.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन कडून डॉ.प्रचिती पुंडे यांना महास्वामीजींच्या हस्ते गुणीजन पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.कराड येथील हुतात्मा अपंग बहूउद्देशीय विकास कल्याणकारी संस्थेच्या वतीने राज्यातील ३२ गुणीजनांना मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रीय गुणीजन पुरस्कारांनी सन्मानीत करण्यात आले. कै. कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन मधील गुणवंत विद्यार्थ्यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

> आज बाळासाहेब इंगळे यांची पुण्यतिथी एक असा दिवस, जो आठवणींनी डोळे पाणावतो आणि त्यांच्या कार्याची जी जाणीव पुन्हा एकदा अंतर्मनात जागवतो. बाळासाहेब इंगळे हे केवळ व्यक्तिमत्त्व नव्हते, तर ते एक चालते-बोलते स्वामीभक्तीचे विद्यापीठ होते. देवस्थानाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी जी निस्वार्थ सेवा केली, ती खरोखरच अतुलनीय आणि प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्यामध्ये केवळ व्यवस्थापन नव्हते, तर त्यात श्रद्धा, समर्पण आणि स्वामींवरील अखंड विश्वास यांचा संगम होता.आज त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन. त्यांच्या कार्याला आणि विचारांना पुढे नेण्याचा संकल्पच त्यांना खरी आदरांजली ठरेल.
>
> **- श्री.नागनाथ जेऊरे,** प्राचार्य कै.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालय, अ.कोट

श्री.स्वामी समर्थ रुग्णालयात जनरल फिजीशीयन डॉ.स्वप्निल हिप्परगी, डॉ.रोहित कुंभार, नेत्ररोग तज्ञ डॉ. स्वप्ना हिप्परगी, डॉ.राजेश मलंग, दंतरोग तज्ञ डॉ.नम्रता पवार यांच्या वतीने सर्वरोग निदान आरोग्य शिबीराच्या माध्यमातून १४७ रुग्णांची तपासणी करून औषधोपचार व पुढील सेवाभावी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी संतोष पराणे, खाजप्पा झंपले, सुनिल पवार, बाळासाहेब एकबोटे, स्वामी हिरेमठ, डॉ.हिरण्णा पाटील, कोल्हापूरचे स्वामी भक्त सुहास पाटील, माळशिरस ग्रामसेवक संघटनेचे तालुका अध्यक्ष विजयसिंह माने-देशमुख, प्रा.शिवशरण अचलेर, सचिन किरनळ्ळी, बाबा सुरवसे, मुंबईचे स्वामी भक्त सुंदर जाधव, शरण मठाचे विश्वस्त बसवराज आलमद, चंद्रकांत सोनटक्के, मनोज जगताप सर, श्रीकांत झिपरे, अरविंद पाटील, मनोज इंगुले, श्रीशैल गवंडी, रमेश शिंदे सर, अंकूश केत, ज्ञानेश्वर भोसले, राजू एकबोटे, रामलिंगय्या स्वामी, सागर गोंडाळ, कुमार हत्तुरे, विश्वनाथ देवरमनी सर, नंदकुमार जगदाळे, प्रसाद पाटील सर, प्रविण देशमुख, सैदप्पा इंगळे, स्वामीनाथ लोणारी, ऋषिकेश लोणारी, सुरेश वाले सर, नरसिंग क्षीरसागर, प्रशांत गुरव, गणेश दिवाणजी, सिद्धाराम टाके, अभिषेक लोकापूरे, मेजर अमोल माने, प्रसन्न हत्ते, शैलेश राठौर, शेखर आडवितोटे, प्रज्वल गवंडी, दर्शन घाटगे, तुषार मोरे, उदय जमगे, सुनिल नाईकवडी, रवि मलवे, श्रीकांत मलवे आदींसह ज्ञात अज्ञात आप्तेष्ट व कै.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतनचे प्राचार्य नागनाथ जेऊरे आदींसह शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाची विद्यार्थिनी शिवानी भोसले यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा.काशिनाथ घुरघुरे, प्रा.शिवशरण अचलेर यांनी मानले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### आ. उत्तमराव जानकर यांच्याकडून वेळापुरात रोजा इफ्तारचे आयोजन

**वेळापूर, दि. १८ मार्च-**

आमदार उत्तमराव जानकर यांच्या वतीने सालाबादप्रमाणे यावर्षीही वेळापूर येथील सुन्नी मदिना मशीद येथे मुस्लिम बांधवांसाठी रोजा इफ्तार (जेवण) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून आमदार जानकर यांनी पुन्हा एकदा सामाजिक बांधिलकी जपत समाजात ऐक्याचा संदेश दिला. या कार्यक्रमाला समाजातील विविध स्तरांतील मान्यवरांनी उपस्थिती लावली. यामध्ये वेळापूर ग्राम पंचायतीचे सरपंच रजनीश बनसोडे, रिपाईचे तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, मुस्लिम जमातीचे अध्यक्ष खुदबुद्दीन कोरबू, सचिव जावेद मुलाणी, तसेच, रणजीत सरवदे, युवराज मंडले, प्रदीप सरवदे, विकी तीकोटे, स्वप्नील सरवदे, दीपक माने उपस्थित होते.



### मोडनिंब येथे कैलास तोडकरी मित्र परिवाराकडून इफ्तार पार्टी

**मोडनिंब, दि. १८ मार्च-**

मोडनिंब (ता. माढा) येथे कैलासदादा तोडकरी मित्र परिवार व ग्रामपंचायत मोडनिंब यांच्या वतीने रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले. भाजपा नेते रणजित शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच समानतेची जाणीव निर्माण करून आपापसांतील बंधुभाव वाढवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे कैलास तोडकरी यांनी सांगितले. बंधुभाव वाढवण्यासाठी आयोजित इफ्तार पार्टीचे हे विसावे वर्ष असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी दिग्विजय कांबळे, संतोष पाटील, गणेश महाडीक, मारुती वाघ, रमेश शिरसाट यांनी मनोगत व्यक्त केले. विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याच्या संचालकपदी निवडीकरिता कैलास तोडकरी यांचा मुस्लिम मस्जिद व कब्रस्तान ट्रस्ट यांच्यावतीने सन्मान करण्यात आला. यावेळी कैलास तोडकरी, दिग्विजय कांबळे, नूरभई तांबोळी, गणेश महाडीक, चांगदेव वरवडे, संतोष पाटील, अमित कोळी, मुबारक शेख, राजू तांबोळी, माधव सुर्वे, किरण खडके, किरण तोडकरी, अतुल गाडे, केतन तोडकरी उपस्थित होते.



### जि.प. सदस्या शांभवी कल्याणशेट्टी आणि संस्कृती सातपुते यांचा सत्कार

**मोडनिंब, दि. १८ मार्च-**

अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पत्नी शांभवी कल्याणशेट्टी आणि माळशिरसचे माजी आमदार राम सातपुते यांच्या पत्नी संस्कृती सातपुते यांची जिल्हा परिषद सदस्यपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. हॉटेल बालाजी सरोवर येथे नगरसेवक बिज्जू प्रधाने यांच्या वतीने शाल आणि पुष्पगुच्छ देऊन हा गौरव सोहळा संपन्न झाला. यावेळी अक्षय अंजिखाने, राजशेखर विजापुरे, यतिराज होनमाने, माऊली पवार, अनिकेत प्रधाने उपस्थित होते.



### सुराणा विद्यालयाचे मुख्याध्यापक दिलीप वायदंडेंचा सेवानिवृत्तीनिमित्त सन्मान

**जेऊर, दि. १८ मार्च-**

रयत शिक्षण संस्थेच्या चिखलठण (ता.करमाळा) येथील रामबाई बाबूलाल सुराणा विद्यालयाचे मुख्याध्यापक दिलीप वायदंडे यांचा मान्यवरांच्या हस्ते सेवानिवृत्ती निमित्त सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्कूल कमीटीचे अध्यक्ष संदीपान बारकुंड होते तर प्रमुख पाहुणे म्हणून यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश भाऊ करे पाटील व ड बाबुराव हिरडे होते. या कार्यक्रमाला पंचायत समिती सदस्य चंद्रकांत सरडे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र कुमार बारकुंड, सरपंच धनश्री गलांडे, जिल्हा बँकेचे माझी संचालक भर्तरीनाथ अभंग, चिखलठाण सोसायटीचे अध्यक्ष विकास गलांडे, शिक्षण विस्तार अधिकारी जयवंत नलावडे, शहाजी धुमाळ, सुनील शिंदे, श्रीमंत झाकणे, विठ्ठल पवार, अमोल सकट, सचिन क्षीरसागर उपस्थित होते. सूत्रसंचालन नवनाथ शेंडगे यांनी केले तर आभार निता देशमुख यांनी मांनले.

### पांडुरंग पोटरे यांचे निधन



**टेंभुर्णी, दि. १८ मार्च-**

नगोरली तालुका माढा येथील वारकरी संप्रदायातील पांडुरंग पोटरे यांचे वयाच्या १०४ व्या वर्षी निधन झाले. या भागातील विकास सेवा सोसायटीचे सचिव आणि प्रतिष्ठित शेतकरी साहेबराव पोटरे यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात एक मुलगा, चार मुली, जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे.



# यमाई तलाव : दुर्मिळ पक्ष्यांच्या संवर्धनासाठी उपाययोजनांची गरज

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १८ मार्च-**

येथील यमाई तलाव परिसरा मध्ये होत असलेली वृक्षतोड आणि माणसांची वर्दळ वाढल्यामुळे तलाव परिसरातील विविध प्रकारच्या दुर्मिळ पक्षांना धोका पोहचण्याची भिती निर्माण झाली आहे. या बरोबरच दुर्मिळ पक्ष्यांच्या दिवसाढवळ्या शिकारी देखील केल्या जात आहेत. या परिसरातील अनेक पक्षी सध्या इतरत्र स्थलांतरित होत आहेत. त्यामुळे यमाई तलाव परिसरात पक्ष्यांचे संवर्धन करण्यासाठी पालिकेने पुढाकार घेऊन विविध उपाय योजण्याची गरज असल्याचे मत निसर्गप्रेमी नागरिक तसेच पक्षीमित्रांकडून व्यक्त केली जात आहे.

येथील यमाई तलाव परिसरामध्ये पूर्वीपासून विविध प्रकारचे दुर्मिळ पक्षी वास्तव्यास असतात. या परिसरात पूर्वी काटेरी बाभळी तसेच विविध प्रकारच्या वृक्षांची दाटीयामुळे पक्ष्यांसाठी येथील वास्तव्य सुखकर होते. मात्र गेल्या काही वर्षापासून या परिसराचा पालिकेने विकास करण्याचे काम हाती घेतलेले आहे. तलावा मधील पाण्यात बोटींग आणि या परिसरात दिसणारे विविध पक्षी नागरिकांना पाहण्यासाठी वॉच टॉवर आदी कामे अद्यापही प्रलंबित आहेत. त्या मध्येच या तलावाच्या बाजूलाच वनविभागाकडून तुळशीवृदांवन देखील तयार करण्यात आलेले आहे. या संपूर्ण तलावाच्या परिसरात चार ते



पाच किलोमीटर एवढा चालण्यासाठी पालिकेकडून ट्रक तयार करण्यात आलेला आहे. त्यामुळे व्यायामासाठी, फिरण्यासाठी येणाऱ्या लोकांपेक्षा उपद्रवी लोकांचा वावर या भागा मध्ये जास्त झाला आहे. या उपद्रवी मंडळींकडून या भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करण्यात येत आहे. याचा परिणाम म्हणून येथील विविध प्रकारच्या दुर्मिळ पक्ष्यांच्या वास्तव्यास धोका पोहचून त्यांचे वास्तव धोक्यात आले आहे. यावर पालिकेने योग्य उपाय योजून या दुर्मिळ पक्ष्यांच्या संवर्धनासाठी ठोस उपाय योजण्याची गरज असल्याची मागणी निसर्गप्रेमी नागरिक तसेच पक्षी मित्रांकडून केली जात आहे.

#### तलाव परिसरात स्थानिक व स्थलांतरित पक्षी

पेटेंड स्टॉर्क (रंगीत करकोचा), म्यून बील (चमचा बदक), आयबीस (पांढरे व काळे बदक ) स्पॉटेंड बील ( ठिपक्यांचे बदक), रिव्हर टर्न ( नदी सुरव), कुट (वारकरी बदक), सँडपायपर (तुतवार), टिटवी, बगळे ( साधे व गाय बगळे), मार्श हॅरिअर (दलदल ससाणे), शिकरा, जांभळी पाणकोंबड्या, डॅबचिक (पाणबुडी), फ्लोमिंगो, पांढऱ्या छातीची पाणकोंबडी, खंड्या, बंड्या अशा प्रकारचे एकुण चौसष्ठ स्थानिक पक्षी तर चक्रवाक, थापट्या, रोकाट्या, तुरमती ससाणा, गुलाबी मैना, धोबी गार्गनी आदी चेवेचाळीस स्थलांतरित पक्षी यमाई तलाव परिसरात आढळून येतात.

#### पक्ष्यांची पैदास धोक्यात

यमाई तलावाच्या मधल्या दोन्ही बेटांवर काटेरी बाभळी उगविल्या आहेत. तेथेच सुरक्षित अधिवास म्हणून करकोट्यांची प्रतिवर्षी पन्नास ते साठ घरटी होतात. पाणी कमी झाल्यामुळे उपद्रवी व्यक्ती सहजपणे बेटावर जावून पक्ष्यांच्या शिकारी करतात. घरट्यांमधील अंडी चोरतात. ही काटेरी बाभळीच्या झाडे तोडल्यामुळे घरट्यांना देखील धोका होत आहे. त्यामुळे नवीन पक्ष्यांची पैदास धोक्यात आली आहे.

#### दिवसाढवळ्या पक्ष्यांची होते आहे शिकार

या भागात अस्ताव्यस्त पडलेले पक्ष्यांची पिसे, मोडून पडलेल्या त्यांच्या माना, पक्ष्यांचे मोठाले पाय पडल्याचे सर्रास दिसून येतात. त्यामुळे पक्ष्यांच्या शिकारी देखील करण्यात येत आहेत. बाभळी सारख्या काटेरी झाडांवरील पक्ष्यांच्या घरट्यातून पक्ष्यांनी घातलेल्या अंड्याच्या देखील चोऱ्यांचे प्रमाण वाढलेले दिसत आहे.

#### या उपाय योजना करणे आहे शक्य

यमाई तलाव परिसरा मध्ये पक्ष्यांना आकर्षित करणाऱ्या वृक्षांची लागवड करणे गरेजेचे. बेटाच्या बाजूने खंदक किंवा चर काढावी. बेसुमार वृक्षतोड थांबवावी. तारेचे कुंपण सर्व बाजूंनी बंधिस्त करावे. पक्षी निरीक्षणासाठी वॉट टॉवरची उभारणी करावी. पक्ष्यांच्या ठिकाणी मनुष्याची वर्दळ टाळावी. कायम पाणी पातळी राहिल याची दक्षता घ्यावी.

## नातवाला मारहाण, जाब विचारणाऱ्यांवर हल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १८ मार्च-**

शहरातील बगले बरड परिसरात नातवाला बेल्टने मारहाण केल्याच्या कारणावरुन जाब विचारण्यासाठी गेलेल्या कुटुंबघियांवर लाकडी बॅटने हल्ला करुन चौघांना जखमी केल्याची घटना सोमवारी घडली. या प्रकरणी एकाविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

याबाबत चंद्रकांत दत्तु भालशंकर (वय-६५, रा. सोलापूर रोड, बगले बरड, बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचा नातू कार्तिक अविनाश भालशंकर हा सोमवारी दुपारी ३ वाजता जुनी मिलजवळील १०० फुटी रस्त्यावर सायकल खेळत होता. त्यावेळी परिसरातील शुभम उर्फ शिव



संदीप निखाळजे याने तेथे खेळू नकोस असे सांगितले. यावर कार्तिकने आई वडिलांना सांगतो असे म्हटल्याचा राग आल्याने निखाळजे याने कमरेचा बेल्ट काढून कार्तिकच्या पाठीवर मारहाण केली, असे फिर्यादीत नमूद आहे. ही माहिती समजल्यानंतर चंद्रकांत भालशंकर, त्यांची सून माधुरी, आण्णा भालशंकर व नात ज्योती धनंजय गायकवाड हे सायंकाळी ६ वाजता निखाळजे याला जाब विचारण्यासाठी त्याच्या घरासमोर गेले. त्यावेळी निखाळजे याने शिवीगाळ करत तेथे पडलेली लाकडी बॅट उचलून माधुरी भालशंकर यांच्या तोंडावर मारुन जखमी केले. भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या चंद्रकांत भालशंकर यांच्या डाव्या कानावर तसेच ज्योती गायकवाड यांच्या डाव्या हातावरही बॅटने मारहाण करण्यात आली.

दरम्यान, भांडण सोडवण्यासाठी आलेले अनिल बाबुराव हावळे यांनाही हातावर मारुन जखमी केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. परिसरातील लोक जमा होताच आरोपीने माझ्या नादाला लागलात तर जिवंत सोडणार नाही, अशी धमकी देत तेथून पळ काढल्याचेही फिर्यादीत नमूद आहे.

## जिजामाता शाळेत पालक सभा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ मार्च-**

महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ बाळे सोलापूर संचलित जिजामाता प्राथमिक शाळा व जिजामाता बालक मंदिर तुळशीदासनगर कोंडी यांच्या संयुक्त विद्यमाने पालक शिक्षक सभा, सखी सावित्री समिती, विद्यार्थी सुरक्षा समिती सभा आयोजित करण्यात आले होते.



सभेच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलू होते तर प्रमुख अतिथी म्हणून पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्षा सुजाता पवार आणि बाल वर्गाच्या प्रमुख सुरेखा नान्नजकर उपस्थित होत्या. या सभेत गुढीपाडवा पट वाढवा या अभियानांतर्गत नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी पालकांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच उपस्थिती, शालेय व स्पोर्ट्स गणवेश, स्काऊट गाईड अतंर्गत कब बुलबुल योजना, परीक्षा आदींबाबत चर्चा करण्यात आले. गुढीपाडवा पट वाढवा या शैक्षणिक उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ, शिल्पा ठोकळ यांनी कौतुक केले. सूत्रसंचालन अपर्णा चव्हाण यांनी केले.

## बौध्द विहार उभारण्यासाठी चौदा वर्षापासूनची प्रतीक्षा

### ●मंदिर समिती कर्मचाऱ्यांना जागा दिल्यास आमरण उपोषण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१८ मार्च-**

चौदा वर्षा पासून यमाई तलावा नजिक असणाऱ्या नगरपरिषदेच्या जागेवर बुध्द विहार उभारण्याची आमची मागणी आहे. याबाबत वारंवार पाठपुरावा करून, नगरपरिषदेने ठराव करून देखील आम्हाला न्याय मिळाला नाही. तर दुसरीकडे श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीच्या कर्मचाऱ्यांना मात्र तातडीने घर बांधणीसाठी जागा देण्यात येणार असल्याची माहिती असून प्रशासनाच्या या कारभारा विरोधात दि.२० मार्च रोजी अमरण उपोषण करण्यात येणार असल्याची घोषणा बुध्द विहार




कृती समितीचे अध्यक्ष सिध्दार्थ जाधव यांनी पत्रकार परिषदेमध्ये केली.

याबाबत माहिती देण्यासाठी पंढरपूर नगरपरिषद प्रस्तावित बुध्दभूमी निर्माण कृती समितीच्या वतीने पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यास आप्पासाहेब जाधव, प्रशांत लोंढे, रवींद्र शेवडे, स्वप्नील गायकवाड, अमित कसबे, महेश मोटे, योगेश जाधव, अमर फडतरे, दीपक साबळे, रूपशे वाघमारे आदी उपस्थित होते.

## कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात लक्ष्मीबाई पाटील यांची पुण्यतिथी साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १८ मार्च-**

पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात रयत माऊली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांची ९६ वी पुण्यतिथी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी विद्यालयाचे वरीष्ठ लेखनिक तुकाराम भोरकडे याच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी शेगर, जमदाडे, देवकर यांनी लक्ष्मीबाई पाटील याच्या विषयी आपले मनोगत व्यक्त केले.तर वाघमारे, झाडे यानी वहीनिषयी कवीता व गितगायन केले. यावेळेस शालेय पोषण आहार प्रमुख ढोले व जाधव यांनी मुलांना गोड खाऊ वाटप केले. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांची ९६ वी पुण्यतिथी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळेस विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक बागल, शाळा व्यवस्थापन समीतीचे सदस्य संजय पाटील, उपस्थित होते. सूत्रसंचालन जमदाडे यांनी तर आभार शेगर यांनी मानले.

# सणासुदीत मंद्रूप परिसरात गॅस टंचाई

## रमजान व गुढीपाडवा सणावर परिणाम

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.१८ मार्च-**

इराण व अमेरिका युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशामध्ये निर्माण झालेल्या गॅस टंचाईचा परिणाम मंद्रूप परिसरातही झाल्याचे दिसून येत आहे. गेल्या आठवड्यात मंद्रूप मध्ये दोन दिवसाला एकदा गॅस टाकी पुरवठा करण्यात येत होते. मात्र पुरवठा कमी होत असल्यामुळे आता चार दिवसानंतर गॅस टाक्या मिळणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

मंद्रूपमध्ये असणाऱ्या गॅस वितरकांकडे तीन हजार पेक्षा अधिक ग्राहकांची प्रतीक्षा यादी असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे गुढीपाडवा व रमजान सणावर गॅस टंचाईचा परिणाम जाणवणार असल्याचे सांगण्यात येत आहे. इराण व अमेरिका युद्धामुळे संपूर्ण जगावर गॅस व पेट्रोल डिझेलच्या टंचाईचा परिणाम होत आहे. त्या पार्श्वभूमीवर सरकारकडून नियोजन करण्यात येत असले तरी



मागणीप्रमाणे गॅस व तेल पुरवठा होत नसल्यामुळे वितरकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावे लागत आहे. ऑनलाइन बुकिंग करूनही गॅस टाक्या वेळेवर मिळत नसल्यामुळे ग्राहकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. दोन दिवसांवर असणाऱ्या गुढीपाडवा व रमजान सणांसाठी मोठ्या प्रमाणात गॅस टाक्या उपलब्ध असणे गरजेचे असताना यापूर्वीच दीड हजारपेक्षा अधिक ग्राहकांची प्रतीक्षा यादी असल्यामुळे रमजान सणाला गॅस टाक्यांचा तुटवडा जाणवणार आहे.

■ **ऐन सणात ग्राहकांना त्रास :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील गॅस टंचाई बाबत तहसीलदार किरण जमदाडे यांनी गॅस वितरकांची आढावा घेऊन शासनाच्या नियमाप्रमाणे गॅस पुरवठा करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र मागणीच्या दहा टक्के गॅस टाक्या पुरवठा होत असल्याने ऐन सणात ग्राहकांना त्रास सहन करावे लागणार आहे. यापूर्वीच प्रतीक्षा यादी असताना गुढीपाडवा व रमजान सणाला गॅस टाकी टंचाई निर्माण होणार हे निश्चित आहे.

■ **तीन हजार पेक्षा अधिक लोकांची प्रतीक्षा यादी :** मंद्रूप परिसरामध्ये अधिकृत गॅस एजन्सी आहे. मात्र या गॅस एजन्सी कडून मागणीपेक्षा कमी पुरवठा होत असल्याने शासनाच्या नियमाप्रमाणे गॅस टाक्या वितरण करण्याच्या सूचना देण्यात आले आहेत. बुधवारपर्यंत मंद्रूपमध्ये तीन हजार ग्राहकांची प्रतीक्षायादी होती. यामुळे ग्राहकांना गॅस टाकी देताना अडचणी येत आहेत . प्रथमच ग्राहकांना गॅसटंचाईचा सामना करावा लागत असल्याने गोंधळ निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पोलीस बंदोबस्त देण्याची मागणी करण्यात येत आहे.

■ **चार दिवसांनी गॅस पुरवठा :** जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्ह्यात गॅसटंचाई नसल्याचे सांगितले आहे. तर दुसरीकडे बुकींग केलेल्या ग्राहकांची प्रतीक्षायादी तीन हजारपेक्षा अधिक आहे. चार दिवसांतून एखदा गॅस टाक्या पुरवठा होत असल्याने गुडीपाढवा व रमजान सणाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागात गॅस टंचाई जाणवत आहे . त्यामुळे जिल्हाधिकार्यांनी गॅस पुरवठा सुरळीत होण्यासाठी उपाययोजना करण्याची गरज आहे.


विक्रम सम्वत् 2083
भारतीय नववर्ष
की हार्दिक
मंगलकामनाएं
नरेन्द्र मोदी, प्रधानमंत्री
डॉ. मोहन यादव, मुख्यमंत्री
राज्यस्तरीय
जल गंगा संवर्धन
अभियान
जनभागीदारी की अनूठी पहल का
तृतीय चरण : 19 मार्च से 30 जून 2026
शुभारंभ
मुख्यमंत्री
डॉ. मोहन यादव
द्वारा
इस्कॉन मंदिर, इंदौर
पिछले दो चरणों में 3.50 लाख से अधिक जल स्रोतों के पुनर्जीवन के साथ
नए निर्माण कार्य, भू-जल स्तर में वृद्धि और खेतों के लिए संजीवनी साबित हो रहे हैं
आइये, सब जुड़ें
जब सब जुड़ेंगे, तब ही जल बचेगा, धरती बचेगी
आने वाली पीढ़ियों का भविष्य सुरक्षित होगा
सीधा प्रसारण
@Cmmadhyapradesh
@jansampark.madhyapradesh
@Cmmadhyapradesh
@jansamparkMP
JansamparkMP
डॉ. मोहन यादव का
अभ्युदय
मध्यप्रदेश

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## मार्चअखेर सुट्ट्यांच्या दिवशीही दुय्यम निबंधक कार्यालये सुरू राहणार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ मार्च :** आर्थिक वर्षाच्या शेवटच्या दिवसांमध्ये मालमत्ता नोंदणीला मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता लक्षात घेता, २६, २८, २९ आणि ३१ मार्च २०२६ या चार सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी दुय्यम निबंधक कार्यालये सुरू ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

आर्थिक वर्ष संपुष्टात येत असल्याने व नवीन आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला लोकांच्या मालमत्ता खरेदी-विक्रीकडे अधिक कल असतो. यामुळे दस्तऐवज नोंदणीचे प्रमाण वाढण्याची शक्यता असून, इष्टांक पूर्ती, अभिनिर्णय, कमी पडलेले मुद्रांक शुल्क वसुली इत्यादी कामे विहित वेळेत पूर्ण करण्यासाठी या सुट्टीच्या दिवशीही कार्यालये कार्यान्वित राहतील. याशिवाय, सह दुय्यम निबंधक कार्यालय, लातूर क्रमांक १ हे कार्यालय नियमितपणे शनिवार व रविवार सुरू असते. त्यामुळे या कार्यालयाची साप्ताहिक सुट्टी सोमवार व मंगळवार असते. परंतु मार्च अखेरच्या कालावधीत मंगळवार हा दिवसही कार्यालय सुरू राहील. सर्व संबंधित नागरिकांनी या सुधारित वेळापत्रकाचा लाभ घ्यावा व आवश्यक दस्तऐवज नोंदणीसाठी वेळीच कार्यालयात भेट द्यावी, असे आवाहन सह जिल्हा निबंधक जी. बी. सातदिवे यांनी केले आहे.



## विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग १९ व २१ मार्च रोजी बंद राहणार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ मार्च :** विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग गुरुवार, १९ मार्च २०२६ (गुढीपाडवा) आणि शनिवार, २१ मार्च २०२६ (रमजान ईद) रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने बंद राहील.

तसेच रविवार, २२ मार्च २०२६ पासून बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गरड यांनी कळविले आहे. तसेच रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास सुरु राहील.

०००००००००००००००००००

## सात वर्षीय आवेजचा पहिला रोजा



लातूर तालुक्यातील माटेफळ येथील शेख आवेज आलिफ या सात वर्षीय बालकाने रमजानच्या महिन्यातील आपला पहिला रोजा केला. त्याचे समाजातील सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

## प्रा. मनोहर गायकवाड चिखलीकर यांची अजा मोर्चा भाजप जिल्हाउपाध्यक्षपदी नियुक्ती

**लातूर, दि. १८ मार्च :** सामाजिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक धार्मिक व ग्रंथालय क्षेत्रात कार्यरत असलेले प्रा. मनोहर गायकवाड चिखलीकर यांची भाजपा अनुसूचित जाती मोर्चा जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे. अनुसूचित जाती मोर्चा जिल्हा अध्यक्ष व माजी समाजकल्याण सभापती लातूर रोहिदास वाघमारे यांनी ही नियुक्ती केली आहे.



या नियुक्तीचे पत्र इंजि. विश्र्वजीत अनिलकुमार गायकवाड यांच्या हस्ते नुकतेच प्रदान करण्यात आले.याप्रसंगी माजी खासदार सुनील गायकवाड, डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी, रोहिदास वाघमारे, भागवत कांबळे, बाबुराव बोडके व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

या निवडीचे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी स्वागत करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्याकडून उपसरपंच गोविंद देशमुख कुटुंबियांचे सांत्वन



**लातूर/प्रतिनिधी :** बाभळगाव तालुका लातूर येथील उपसरपंच गोविंदराव देशमुख यांचे वडील शेषेराव देशमुख यांचे नुकतेच निधन झाले आहे या दुःखद घटनेनंतर राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांनी बाभळगाव येथील त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट दिली.

शेषराव देशमुख यांच्या स्मृतिस पुष्पहार घालून अभिवादन केले व कुटुंबाचे सांत्वन केले धीर दिला.

यावेळी राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील बाभळगाव येथील हणमंत देशमुख विठ्ठल देशमुख, दत्ता देशमुख बालाजी देशमुख , एन आर देशमुख ,महादेव देशमुख, उपसरपंच गोविंदराव देशमुख, अशोक नाडागुडे, भीमा शिंदे, गोपाळ थडकर, तांनाजी जाधव अविनाश देशमुख निखील देशमुख यांच्यासह ग्रामस्थ देशमुख कुटुंबातील सदस्य उपस्थित होते

# लातुरात शिक्षकांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन : डॉ. मिलिंद पोतदार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ मार्च :** लातूरच्या सावली सेंटर फॉर मेंटल हेल्थ अँड रिसर्च च्या द्विदशकपूर्तीचे औचित्य साधून शिक्षकांसाठी 'विद्यार्थ्यांची मानसिकता : शिक्षकांना काय माहिती असायला हवे' या विषयावरील विशेष कार्यशाळेसह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती डॉ. मिलिंद पोतदार, डॉ. मुग्धा पोतदार यांनी दिली.समाजात वावरताना प्रत्येकाला ताणतणावाचा सामना करावाच लागतो. त्यामुळे सरासरी दहापैकी चार जणांना समुपदेशनाची नितांत गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

आरोग्यसेवेसोबतच सामाजिक कार्यातही आपला खारीचा वाटा उचलण्याचे काम आपण सातत्याने करत असून येत्या शनिवार दि. २१ मार्च २०२६ रोजी दुपारी अडीच वाजता विद्यालयाच्या कस्तुर कांचन सभागृहात होणार आहे. या कार्यशाळेसाठी ८५ शाळांमधील प्रत्येकी दोन शिक्षकांना निमंत्रित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच रविवार दि. २२ मार्च रोजी सकाळी अकरा वाजता हॉटेल ग्रँड येथे बालरोगतज्ञ, मानसोपचार तज्ञ आणि न्यूरोलॉजिस्ट यांच्यासाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी पाच वाजता दगडोजीराव देशमुख सभागृहात पुण्याचे प्रसिद्ध बालमानसोपचार तज्ज्ञ डॉ. भूषण शुक्ल यांच्या प्रमुख उपस्थितीत ' तंत्रज्ञान युगातील पालकत्व - कानगोष्टी पालकत्वाच्या ' या विषयावर पालकशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'मानसिक आरोग्य विषयावरील निबंध स्पर्धा आणि रिल्स स्पर्धा' यांच्या विजेत्यांचा गौरवदेखील करण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे दि. २८ व २९ मार्च रोजी दोन दिवसीय नाट्यमहोत्सव आयोजित केला आहे. यामध्ये आनंद ओवरी, मन (संवेदनशील मनाची स्पंदने), मग तू मला खा, तो राजहंस एक या नाटकांचे प्रयोग सादर होणार आहेत. प्रत्येक दिवशी दोन नाटके सादर केली जाणार असल्याचे डॉ. पोतदार यांनी सांगितले. आपल्या हॉस्पिटलमध्ये आजमितीस मानसिक आजाराच्या सर्व सोयी सुविधा उपलब्ध आहेत. आपल्या देशात १० ते १२ हजार मानसोपचार तज्ज्ञ उपलब्ध असून ताणतणावांसह विविध प्रकारच्या मानसिक कारणावरून किमान १५ ते १८ कोटी लोकांना कोणत्या ना कोणत्या उपचाराची आवश्यकता भासू शकते.त्यामुळे मानसिक आरोग्यावरही प्राधान्याने विचार होणे गरजेचे असल्याचे डॉ. पोतदार यांनी सांगितले.



लातूर आणि परिसरातील शिक्षकांसाठी विशेष कार्यशाळा डॉ. भूषण शुक्ल यांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा श्रीकिशन सोमाणी

## अवकाळी पाऊस व गारपिटीने झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत द्या

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ मार्च :** लातूर, धाराशिव जिल्ह्यांसह मराठवाड्यातील अनेक ठिकाणी झालेल्या वादळी वारा, पाऊस आणि गारपिटमुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे फळबागा, भाजीपाला आणि रब्बी पिके उद्ध्वस्त झाली असून, प्रशासनाने नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शासनाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई जाहीर करावी, अशी मागणी राज्याचे माजी मंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केली आहे.माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, या अगोदर २२ फेब्रुवारी २०२६ रोजी लातूर जिल्ह्यात अनेक ठिकाणी अवकाळी पाऊस झाला होता, ज्यातून रब्बी पिके कशीबशी वाचली होती. मात्र, काल १७ मार्च रोजी पुन्हा झालेल्या गारपिटमुळे हाताशी आलेली पिके पूर्णतः जमीनदोस्त झाली आहेत. यामध्ये प्रामुख्याने काढणीला आलेली ज्वारी, गहू, हरभरा आणि करडई या पिकांचा समावेश आहे. तसेच आंबा, द्राक्ष बागा आणि भाजीपाल्याचीही मोठी नासाडी झाली आहे. शासनाने या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन प्रशासनाला तात्काळ पंचनाम्यांचे आदेश द्यावेत आणि शेतकऱ्यांना ठोस दिलासा द्यावा.

प्रशासनाने सतर्क राहून जागृती करावी

हवामान खात्याच्या अंदाजानुसार २०-२१ मार्चपर्यंत विदर्भ आणि मराठवाड्यात पुन्हा अवकाळी पाऊस व गारपीट होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने शेतकरी वर्गामध्ये व्यापक जनजागृती करावी, जेणेकरून संभाव्य नुकसान टाळण्यासाठी शेतकरी पूर्वतयारी करू शकतील, असेही आमदार अमित विलासराव देशमुख यांनी प्रशासनाला सुचवले आहे.

## देऊळवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह निमित्त सर्व रोग निदान शिबिर व भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

**लातूर, दि. १८ मार्च :** उदगीर तालुक्यातील आदर्श गाव देऊळवाडी येथे श्री समर्थ सद्गुरू धोंडूतात्या महाराज यांच्या ९४ व्या पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. हा सप्ताह रविवार दि. १५ मार्च २०२६ ते रविवार दि. २२ मार्च २०२६ या कालावधीत मोठ्या भक्तिभावाने साजरा होत असून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या अखंड हरिनाम सप्ताहाच्या औचित्य साधून शुक्रवार दि. २० मार्च २०२६ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ४ या वेळेत समर्थ धोंडूतात्या मंदिर, देऊळवाडी येथे सर्व रोग निदान शिबिर व भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या आरोग्य शिबिरामध्ये विविध आजारांवरील तपासणी, तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन तसेच रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून मा. संतोष गुट्टे (तहसीलदार, खुलताबाद) तसेच एकनाथ नागरगोजे (पोलीस उपनिरीक्षक, वैजापूर) हे उपस्थित राहणार आहेत.

या शिबिरामध्ये डॉ. विजय बिराजदार (एमबीबीएस, एमएस ऑर्थो), डॉ. राधिका बिराजदार (एमबीबीएस, डीजीओ), डॉ. हर्षवर्धन जाधव (एमबीबीएस, एमडी मेडिसिन), डॉ. उबेद शेख



(एमबीबीएस, डीसीएच), लायन्स क्लब उदगीरचे वैद्यकीय तज्ञ, डॉ. अस्मिता पाटील (वैद्यकीय अधिकारी, नळगीर), डॉ. माधव मठपती (बीडीएस) व डॉ. निवेदिता मठपती (बीडीएस) हे तज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी करणार आहेत.

अखंड हरिनाम सप्ताहात दररोज ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, शिवपुराण कथा, हरिपाठ, हरी कीर्तन, संगीत भजन व हरीजागर तसेच पहाटे काकडा आरती असे विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

शिबिराचे आयोजन कै. त्र्यंबकआप्पा माळेवाडे प्रतिष्ठान, उदगीर यांच्या वतीने करण्यात आले असून या शिबिरास मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन माळेवाडे प्रतिष्ठानचे अध्यक्ष गुरुबसप्पा माळेवाडे, उपाध्यक्ष संजय राजुळे, अखंड हरिनाम सप्ताह कमिटी देऊळवाडी तसेच ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय देऊळवाडी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## रोटरी क्लब लातूर सेंट्रलच्या वतीने चिखुर्ड्यात शैक्षणिक साहित्याचे वाटप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ मार्च :** रोटरी क्लब लातूर सेंट्रलच्या वतीने लातूर तालुक्यातील चिखुर्डा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास लातूर पंचायत समितीचे नवनिर्वाचित सभापती श्रीकांत बैले, उपसभापती महेश चव्हाण, पं. स. सदस्य बाळासाहेब कदम, जि. प. सदस्य दत्तात्रय वैजनाथराव शिंदे, लातूर शहर महानगरपालिकेचे नगरसेवक तथा क्लबचे सदस्य गिरीश ब्याळे, क्लबचे सचिव डॉ. नेताजी शिंगटे, प्रेसिडेंट इलेक्ट अ‍ॅड. नागेश स्वामी, सुदर्शन कांबळे, आंबेकर, चंद्रकांत गुंडरे, साहेबराव मोरे, गावचे सरपंच, केंद्रप्रमुख दयानंद आवारे, संतोष जगताप (तंटामुक्ती अध्यक्ष), माजी सरपंच आनंद कदम, अ‍ॅड. प्रशांत कदम आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना



आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना सभापती श्रीकांत बैले यांनी विद्यार्थ्यांसाठी अशा प्रकारच्या पुढाकाराबद्दल रोटरी क्लबच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. रोटरीचा सामाजिक कार्यात सातत्याने सहभाग असल्याच्या प्रतिक्रिया यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

याप्रसंगी जि. प. प्राथमिक शाळा चिखुर्डा येथील मुख्याध्यापक गायकवाड, शिवणे, सहशिक्षिका जगताप मॅडम, वडार वस्ती शाळेच्या मुख्याध्यापिका देशमुख मॅडम, अंगणवाडी ताई मानेमॅडम, श्रीमती काशीद मॅडम, श्रीमती कांबळे मॅडम, श्रीमती लहाने मॅडम, श्रीमती गवळी मॅडम तसेच ग्रामसेवक भुजबळ, गोरोबा कापसे, जालिंदर हुडे, विश्र्वजीत कदम, ऋषिकेश मुटकुळे, रवींद्र ढोले, लक्ष्मण घाडगे, प्रदीप कापसे, काकासाहेब कुंभार, शरद हुडे, कपिंद्र घाडगे, दिलीप कुंभार, दत्तात्रय घाडगे, दीपक घाडगे, अनिल कापसे, महादेव घाडगे, प्रभाकर गवळी, गणेश गवळी, दिलीप गिरी आदींची उपस्थिती होती.

# सनरीच माहेश्वरी प्रिमिअर लीग स्पर्धेचे विजेतेपद निर्मल ग्लॅडिएटर्सने पटकावले, महिला संघाचे जेतेपद शिवास स्ट्रायकर्सने जिंकले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ मार्च :** लातूर जिल्हा माहेश्वरी युवा संगठन, युवा माहेश्वरी एवं किशोरी मंडळाच्या सनरीच एमपीएल (माहेश्वरी प्रिमिअर लीग) स्पर्धा २०२६ चे पुरुषांच्या संघाचे

विजेतेपद निर्मल ग्लॅडिएटर्सने पटकावले. अत्यंत अटीतटीच्या झालेल्या सामन्यात महिला संघाचे जेतेपद शिवास स्ट्रायकर्सने जिंकले. या स्पर्धांना प्रेक्षकांचा अतिशय उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला.







सनरीच एमपीएल २०२६ च्या पुरुषांच्या स्पर्धा दयानंद महाविद्यालयाच्या क्रिकेट ग्राऊंडवर पार पडल्या. या स्पर्धेचा अंतिम सामना आशिष सोमाणी यांच्या निर्मल ग्लॅडिएटर्स आणि रंजन बाहेती यांच्या राजश्री मोनार्क्स या दोन संघात झाला. यामध्ये निर्मल ग्लॅडिएटर्स विजयी ठरला. राजश्री मोनार्क्स ला उपविजेतेपद मिळाले. महिलांचे सामने ग्रँडस्लॅम टर्फवर खेळविण्यात आले. महिला संघाचा अंतिम सामना शिवास स्ट्रायकर्स विरुद्ध राजमुंद्रा वॉरियर्स यांच्यात झाला. यात शिवास स्ट्रायकर्सने जेतेपद पटकावले. या स्पर्धेत खेळाडूंनी उत्कृष्ट खेळ व खिलाडूवृत्तीने प्रदर्शन केले. या स्पर्धेचे मुख्य प्रायोजक सनरीच कंपनी हे होते. तर सह प्रायोजक म्हणून धनराज सॉल्व्हेक्स, मुंदडा इंटेरिओ,इंदू टाईल्स, वेंकटेश सिरॅमिक्स, सुनंदा सोलार पॉवर यांनी जबाबदारी सांभाळली.

सनरीच एमपीएलच्या सर्व स्पर्धांना क्रिकेट रसिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. पुरुष व महिला खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून लातूरकरांनी मने जिंकली. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी प्रोजेक्ट चेअरमन अमित भुतडा, आलोक बाहेती, पुष्कर तोष्णीवाल, निकुंज भुतडा, एड. योगेश मालपाणी, अमित भुतडा, प्रांजल डागा, अभिषेक मुंदडा, सीए गिरीश सोनी, सीए अभिषेक डागा, केदार मुंदडा, कृष्णा लाहोटी, कृष्णा सोनी, महेश तोष्णीवाल, सीए निलेश चांडक, रोहन सोनी, रुपेश हेड्डा, संस्कृती लोया, रितेश रांदड, गौरव बाहेती, रामजी भुतडा, विशाल काबरा, दीपक बजाज यांसह लातूर जिल्हा माहेश्र्वरी युवा संगठन, युवा माहेश्वरी एवं किशोरी मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# संक्षिप्त...

## सार्वजनिक जयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी आ. संजय बनसोडे

**उदगीर :** प्रतिवर्षा प्रमाणे उदगीर शहरात विश्र्वरत्न, भारतरत्न प.पू.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची सार्वजनिक जयंती मोठ्या थाटामाटात साजरी करण्यात येते. यावर्षीही भारतीय



राज्य घटनेचे शिल्पकार, महामानव, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यासाठी व नवीन कार्यकारणीची निवड करण्यासाठी शहरातील नालंदा बुद्ध विहारात देविदास कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या बैठकीत सर्वानुमते राज्याचे माजी क्रीडा मंत्री तथा उदगीरचे आमदार संजय बनसोडे यांची अध्यक्षपदी एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी शशिकांत बनसोडे, शिवकुमार कांबळे, धिरज कसबे, जवाहरलाल कांबळे, नरसिंग शिंदे, दिलीप सोनकांबळे, दयानंद शिंदे, आदीसह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जळकोट ग्रामीण रुग्णालयात आर बी एस के अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांना मोफत चष्मे वाटप



**जळकोट :** दि .१६ मार्च रोजी ग्रामीण रुग्णालय जळकोट येथे आर बी एस के अंतर्गत, शालेय विद्यार्थ्यांना मोफत चष्म्याचे वाटप करण्यात आले.या विद्यार्थ्यांना दृष्टीदोष आहे अशा विद्यार्थ्यांचे आर बी एस के मार्फत तपासणी करण्यात आली व दोषी विद्यार्थ्यांना आरबीएसके मार्फत चष्मे मोफत वाटप करण्यात आले, या यावेळेस आर बी एस के चे डॉक्टर सचिन सिद्धेश्र्वर, डॉक्टर भारती राठोड, भोगे सिस्टर, नदीम सय्यद अशी आरबीएसके ची पूर्ण टीम यावेळी उपस्थित होते, यासोबतच जिल्हा परिषद शाळेचे आनंत धुळेशेटे सर, राजर्षी शाहू चे शिक्षक व एमपी शाळेचे शिक्षक या वेळी मोठ्या प्रमाणात शिक्षक उपस्थित होते,यावेळी एकूण २१ विद्यार्थ्यांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले.

## प्रा. हेमा हसरगुंडे (सुलतानपुरे) यांना पीएचडी पदवी प्राप्त

**उदगीर :** येथील श्री हावगीस्वामी महाविद्यालयाची माजी विद्यार्थीनी हेमा हसरगुंडे (सुलतानपुरे) यांनी द्रविडीयन विद्यापीठ, कुप्पम (आंध्रप्रदेश) ची पीएचडी पदवी प्राप्त केली आहे. डॉ. लक्ष्मीनारायण लाल के नाटकों में यथार्थ बोध या हिंदी विषयात त्यांनी ही पदवी प्राप्त केली आहे. यासाठी त्यांना श्री हावगीस्वामी महाविद्यालयातील हिंदी विभाग प्रमुख प्रा.डॉ. एन.जी. एमेकर यांचे मार्गदर्शन लाभले आहे.



डॉ. हेमा हसरगुंडे या सध्या कर्नाटक राज्यातील बिदर येथे गुरुनानक शिक्षण संस्थेच्या गुरूनानक फस्ट ग्रेड कॉलेजमध्ये हिंदी विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असून त्या अत्यंत मेहनती व जिज्ञासू आहेत. याच संस्थेतील कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणूनही त्यांनी चार वर्षे काम केले आहे. यापूर्वी त्यांनी डॉ. लक्ष्मीनारायण लाल यांच्या नाटकांवर एम फिल पदवी पूर्ण केली आहे. त्यांचे अनेक आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय सेमिनारमध्ये पेपर वाचन झालेले आहे. डॉ. हेमा हसरगुंडे या येथील काँग्रेसचे जेष्ठ कार्यकर्ते तथा भारत लिबरल एज्युकेशन सोसायटीचे जेष्ठ सदस्य शिवकुमार हसरगुंडे यांच्या कन्या तर भारत लिबरल एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष रविंद्र हसरगुंडे यांच्या भगिनी आहेत. त्यांच्या या यशाबद्दल भारत लिबरल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष उमेश पाटील देवणीकर, उपाध्यक्ष राजकुमार हरकरे व रविंद्र हसरगुंडे, सचिव डॉ. मनीषा वडियार, सहसचिव सुबोध आंबेसंगे, कोषाध्यक्ष संगमेश्र्वर जिरगे सह सर्व सन्माननीय सदस्य, प्र. प्राचार्य डॉ. आप्पाराव काळगापुरे, उपप्राचार्य डॉ. एन. जी. एमेकर, कार्यलयीन अधीक्षक ऋषिकेश पाटील व सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच आप्तेष्टांनी अभिनंदन केले आहे.

## डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती समितीच्या अध्यक्षपदी धम्मानंद काळे

**निलंगा :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती ज्ञानसागर बौद्ध विहार अशोक नगरची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली





असून अध्यक्षपदी धम्मानंद काळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यंदा सामाजिक उपक्रम व भव्य मिरवणूक काढून जयंती साजरी करण्याचा निर्णय घेण्यात आला. ज्ञानसागर बौद्ध विहार जयंती उत्सव समितीच्या कार्यकारणीत उपाध्यक्षपदी किरण कांबळे, सचिव अजय शिंदे, सहसचिव अनिकेत धारिया, कोषाध्यक्ष निलेश गायकवाड, सहकोषाध्यक्ष- विनोद सूरवसे, सल्लागार ॲड अखिल देशमुख, ॲड अमोल ढेरे, ॲड धनराज धैर्य, सहसल्लागार देविदास धैर्य, कार्याध्यक्ष अंकुश ढेरे, सजावट प्रमुख लहू ढेरे, विकास ढेरे, मनोज कांबळे, नारायण धैर्य, सुशिला कांबळे, आशिर्वाद धैर्य, तेजस गायकवाड, सदस्य म्हणून आनंद ढेरे, अमित ढेरे, अभय ढेरे, चंद्रकांत भोसले, बन्नी धैर्य, प्रथमेश कांबळे, बाबा कांबळे, अदित्य कांबळे, शाहीर धैर्य, गौरिशंकर भंडारी, गौरव वाघमारे, प्रथमेश पाटील, करण वगराळे, ईश्र्वर धैर्य, दिपक मंजुळे, संजय मंजुळे, अनिल कांबळे, विशाल कांबळे, भिमा कांबळे, निखिल गायकवाड, राहुल कांबळे, विशाल कांबळे, अविनाश धैर्य, आशिष गायकवाड, नकुल कांबळे, तेजस ढेरे, राजकुमार धैर्य, राजू पवार यांची निवड करण्यात आली. निवडीचे सर्वांनी स्वागत केले.

# रोजा केवळ अन्न-पाण्याचा त्याग नाही, तर मन, विचार आणि वर्तन शुद्ध करण्याचा मार्ग आहे - साजिद आझाद

**तभा वृत्तसेवा/ रियाज मोमीन**

**वलांडी, दि. १८ मार्च :** देवणी तालुका ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने आज वलांडी येथे पवित्र रमजान महिन्यांमध्ये दावत ए इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी बोलत असताना इस्लामिक विचारक व प्रसारक साजिद आझाद यांनी रमजान आणि रोजा यावर सखोल मार्गदर्शन केले. , जो व्यक्ति रोजा राहून सुद्धा खोटे बोलने सोडत नाही, खोटे वागणे सोडत नाही अशा व्यक्तीच्या निरंकार उपवासाची अल्लाहला तिळमात्र गरज नाही. रोजा म्हणजे केवळ उपवास नव्हे, तर ती आत्मसंयमाची शिदोरी आहे.

रमजान महिना हा केवळ उपवासाचा नसून तो संयम, शिस्त आणि मानवतेची शिकवण देणारा महिना आहे. रोजा ठेवण्यामागे केवळ धार्मिक श्रद्धा नसून त्यामागे एक मोठे आध्यात्मिक आणि वैज्ञानिक कारण दडलेले आहे. असे मत त्यांनी मांडले. रमजान निमित्ताने वलांडीत देवणी तालुका ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने आयोजित विशेष इफ्तार



पार्टीत ते बोलत होते.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आझाद म्हणाले की, रोजा ठेवणे म्हणजे पहाटेपासून सूर्यास्तापर्यंत अन्नाचा त्याग करणे इतकाच मर्यादित अर्थ अपेक्षित नाही. तर समाजात वावरताना आपण इतरांबद्दल वाईट बोलू नये, कोणाचे नुकसान करू नये आणि स्वतःच्या इंद्रियांवर ताबा मिळवावा, हीच रोजा मागची मुख्य भावना आहे. यामुळे मनुष्यामध्ये सहनशक्ती आणि गरिबांच्या भूकेची जाणीव निर्माण होते.

या इफ्तार पार्टीला परिसरातील सर्वधर्मीय बांधव आणि विविध पदावर कार्यरत असलेले पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यामध्ये राष्ट्र सेवा दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित शिंदे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष पंडितआण्णा धुमाळ, सहायक पोलीस निरीक्षक भीमरावजी गायकवाड, जिल्हा परिषद सदस्य जवळगा रामलिंग शेषेराव शेरे, जिल्हा परिषद सदस्य बोरोळ चे औदुंबर पांचाळ, पंचायत समिती सभापती सुशांत पाटील, पंचायत समिती उपसभापती बाळासाहेब पाटील, मंडळ अधिकारी बालाजी केंद्रे, लोकजागृती शिक्षण समितीचे अध्यक्ष, व सोसायटी चेरमन व्यंकटराव पाटील, जवळगा सरपंच विजयकुमार पाटील, हिसमनगर सरपंच विजयकुमार मुक्के, माजी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती बालाजी बिरादार, काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष मालबा घोणसे,वलांडी चे सरपंच रामभाऊ भंडारे, उपसरपंच महेमूद सौदागर, राष्ट्रवादी काँग्रेस वाहतूक सेल जिल्हा अध्यक्ष हकीम बौडीवाले, माजी तंटामुक्ती अध्यक्ष बालाजी सोनकवडे, सर्व पत्रकार देवणी ग्रामीण व शहरी तसेच सीमावर्ती भागातील मान्यवर उपस्थित होते. या सर्व मान्यवरांनी मुस्लिम बांधवांना रमजानच्या पवित्र महिन्याच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या शेवटी उस्मानिया मस्जिद चे हाफिज इब्राहिम मातोला यांनी सामूहिक दुआ (प्रार्थना) केली. आणि सर्वांनी एकत्र मिळून इफ्तारचा आनंद घेतला. या उपक्रमामुळे परिसरात जातीय सलोखा आणि प्रेमाचे, एकात्मतेचे वातावरण निर्माण होण्यास मदत होईल. या इफ्तार पार्टीचे आयोजन देवणी तालुका ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष हसन मोमीन, शादूल बौडीवाले, निहाज मुर्शेद यांनी केले होते.

## जळकोट पंचायत समिती कार्यालयात कर्मचाऱ्यांचा सत्कार, सेवा प्रवेशोत्तर परिक्षेत सात कर्मचारी उत्तीर्ण

**तभा वृत्तसेवा**

**जळकोट, दि. १८ मार्च :** जळकोट पंचायत समिती कार्यालयातील महाराष्ट्र राज्य, जिल्हा परिषद, जिल्हा सेवा प्रवेशोत्तर परीक्षा २०२४ मधील उतीर्ण कर्मचाऱ्यांचा जळकोट पंचायत समिती कार्यालयात गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, सभापती सौ. सुनिता कोसंबे, उपसभापती माधव वाघमारे, सहायक प्रशासन अधिकारी सचिन काडवादे, विस्तार अधिकारी जयवंत कोनाळे, यांच्या उपस्थितीत त्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार, सर्व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.





महाराष्ट्र राज्य, जिल्हा परिषद, कर्मचारी शाखा जळकोट तर्फे सेवा प्रवेशोत्तर परीक्षा दिलेल्या पंचायत समिती जळकोट येथील एकूण आठ कर्मचाऱ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी सात कर्मचारी उत्तीर्ण झाले. यामध्ये अरविंद बालाजी पाटील, शांतवीर संजय कासनाळे, साबळे विजय विश्वनाथ, भारती ऋषीकेश लक्ष्मण, शृंगारे आनंद गजेंद्र, इटकापल्ले वैष्णवी शंकर, गाजरवाड नवनाथ बागन्न, हे कर्मचारी उत्तीर्ण झाले. त्यांचा सत्कार महाराष्ट्र राज्य, जिल्हा परिषद कर्मचारी युनियन शाखा जळकोट च्या वतीने जळकोट पंचायत समिती कार्यालया तसत्कार करण्यात आला .

यावेळी गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, सभापती सौ. सुनिता संभाजी कोसंबे, उपसभापती माधव वाघमारे, सहाय्यक प्रशासन अधिकारी सचिन काडवादे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी आशिष यंगाले, विस्तार अधिकारी जयवंत कोनाळे, निळकंठ पटवारी, शिवकांत पटवारी, लक्ष्मण ढोबळे, निखिल पांचाळ, राजश्री स्वामी, वरिष्ठ सहाय्यक, संभाजी केंद्रे, शेख मौनोदीन, सुनील तोडसाम, सोमेश्र्वर डंबाळे, राजाराम अकुलवाड, सीमा पेन्सलवार, आदी यावेळी उपस्थित होते.

# भाऊसाहेब बँकेच्या व्यवस्थापन मंडळाच्या चेअरमनपदी दिनेश पाटील



**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. १८ मार्च :** येथील भाऊसाहेब सहकारी बँक लि. उदगीरच्या व्यवस्थापन मंडळाची स्थापना दि. १७ मार्च २०२६ रोजी झाली. रिझर्व्ह बँकेच्या निकषानुसार विविध क्षेत्रातील तज्ञ म्हणून दिनेश पंढरीनाथ पाटील, विजयकुमार भीमाशंकर पारसेवार, सतीश रेवनप्पा उस्तुरे, धनाजी विठ्ठलराव राजे आणि सीमा मनोज लोया (भुतडा) यांची नियुक्ती संचालकांच्या सर्वसंमतीने करण्यात आली. या व्यवस्थापन मंडळामुळे बँकेची प्रगती आणि व्यवस्थापन उत्तम

होण्यास निश्चित मदत होईल असे बँकेचे चेअरमन भगवानराव पाटील यांनी यावेळी सांगितले. यावेळी सर्वसंमतीने व्यवस्थापन मंडळाचे चेअरमन म्हणून दिनेश पंढरीनाथ पाटील यांची निवड करण्यात आली.

याप्रसंगी बँकेचे चेअरमन भगवानराव पाटील तळेगावकर, उपाध्यक्ष वसंतराव सोनकांबळे, किशनराव हरमुंजे, ईश्र्वर खटके, तानाजी पाटील तळेगावकर, गोपीनाथ सगर, मनोज पुदाले, रविंद्र हसरगुंडे, वैभव औटे, अक्षय कोटलवार, माधव पाटील, कोमल बिरादार, उत्तरा कलबुर्गे आदी संचालक उपस्थित होते. सभेचे कामकाज बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. लक्ष्मीकांत मा. कुलकर्णी यांनी केले. यावेळी बँकेचे अधिकारी शिवाजी पाटील व शिवाजी पाटील तळेगावकर उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

लातूर जिल्हा परिसरातील तमाम जनतेस या जाहिर प्रगटना द्वारे सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकार **लहू गुलाब पवार, रा.चिंचोलीराव, ता.जि.लातूर** यांनी मला दिलेल्या माहिती व कागदपत्रावरुन व वकिल म्हणून अधिकृत केले वरुन सर्व जनतेस खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देत आहे.

माझे पक्षकार यांना **नितीन कुमार जाधव, रा. खंडापूर, ता.जि.लातूर** यांनी खरेदीखत दस्त क्रं. ल.त.र — २ — ११२०८/२०२५, दि.०६/११/२०२५ ईसवी अन्वये खरेदी मलाकीचा व कब्जेवहिवाटीचा मौजे. खंडापूर, ता.जि.लातूर येथील जमीन गट नंबर ५२ पैकीचा प्लॉट याचा एन.ए नंबर २००४/जेएमबी/लातूर/सीआर/२७३०, दिनांक २४/११/२०२४ ईसवी अन्वये मे.सबडिव्हीजनल ऑफिस, लातूर यांनी मंजूर केलेला याचा लेआऊट नंबर लातूर/एन.एन.ए/ग.नं.५२/लातूर/एनआरएल/१९९३, दिनांक ०६/११/२००४ ईसवी अन्वये नगर रचनाकार, लातूर यांनी मंजूर केलेल्या पैकीचा प्लॉट नंबर ११ पुर्ण याचा ग्रा.पं. मिळकत नंबर १२२५ असून याची लांबी पुर्व — पश्चिम ४० फुट आणि रुंदी दक्षिण - उत्तर ३० फुट याचे एकूण क्षेत्रफळ १२०० चौ.फुट (१११.५२ चौ.मी.) आहे. याची चतु: सीमा खालीलप्रमाणे :-

पुर्वेस - ६ मी. रुंदीचा रस्ता, पश्चिमेस - प्लॉट नंबर १०, दक्षिणेस - प्लॉट नंबर ०८, उत्तरेस - ओपन स्पेस.

येणे प्रमाणे वरील चतु:सीमेच्या आतील मिळकत विद्यमान मालकाकडुन **लेखी** करार करुन घेऊण,इस्सारापोटी काही रक्कम माझे पक्षकाराकडुन स्विकारुन सदरची मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम असल्याची हमी माझे पक्षकारास दिली आहे. तरी सदर मिळकती बाबत जर कोणाचा उजर,आक्षेप,हितसंबंध,हक्कसंबंध,कर्जबोजा,गहाणखत,बक्षीसपत्र,कोर्टडिग्री,मृत्युपत्र,तारण,लीज, शेजाऱ्याचा वाद,शासकिय अथवा निमशासकिय कर्ज, न्यायालयीन वाद असतील तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून **सात** ( ०७ ) दिवसाच्या आत माझे खालील कार्यालयीन पत्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी उजर / आक्षेप नोंदवावा मुदतीत जर कोणाचा उजर/आक्षेप नाही आल्यास सदरची मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम आहे असे गृहीत धरुन माझे पक्षकार सदर मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत मूळ मालकाकडून आपल्या हक्कात करुन घेतील व त्यानंतर येणारे आक्षेप माझे पक्षकारावर बंधणकारक राहणार नाहीत याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

दिनांक — १८/०३/२०२६

| | |
|---|---|
| तर्फे ॲड.अशोक ज्ञा.लोखंडे | जाहीर प्रगटन देणार |
| नोटरी भारत सरकार. | **लहू गुलाब पवार,** |
| शाहू चौक,लातूर | **रा. चिंचोलीराव, ता.जि.लातूर** |
| मो नं.९४२१ ९८६४९५ | मो. नं. ८७८८९९७२६३/७५०७५९३७७७ |

# ग्राहक हक्कांविषयी जागरूक राहायला हवे; जागतिक ग्राहक हक्क दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**

**जळकोट, दि. १८ मार्च :** ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन संस्था महाराष्ट्र राज्य तसेच ग्राहक समिती महाराष्ट्र राज्य एवमं समर्पण करियर इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि.१५ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता समर्पण करिअर इन्स्टिट्यूटच्या सभागृहात जागतिक ग्राहक हक्क दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.पांडुरंग बालाजी फड हे होते. तर प्रमुख पाहुणे व मुख्य मार्गदर्शक म्हणून ग्राहक समिती महाराष्ट्र राज्याचे संस्थापक राज्याध्यक्ष तथा प्रदेशाध्यक्ष तानाजीराव नरहरीराव गुंड, राज्याचे प्रदेश कार्याध्यक्ष सतीशकुमार बुरगुटे, ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन संस्थेचे महाराष्ट्र राज्याचे संस्थापक प्रदेशाध्यक्ष तथा राज्याध्यक्ष बी.जी. शिंदे तसेच ग्राहक समिती महाराष्ट्र राज्याचे नवनिर्वाचित राज्य प्रदेश संघटक तथा मराठवाडा अध्यक्ष बालासाहेब शिंदे, प्रा.डॉ.अविनाश प्रभातराव पाटील, प्रा.डॉ.सुनील



यशवंतराव ढगे, तालुकाध्यक्ष प्राचार्य व्ही.एस.कणसे, शिरूर अनंतपाळ तालुकाध्यक्ष आर.एन.जाधव, प्रा.विकास पाटील उपस्थित होते. यावेळी समर्पण करियर इन्स्टिट्यूटचे विद्यार्थी, विद्यार्थिनी, पालक, महाविद्यालयीन कॉलेजकुमार, युवक, युवती, तरुणी, पदाधिकारी, कर्मचारी, ग्राहक स्वंयसेवक उपस्थित होते. यावेळी १५ मार्च २०२६ रोजी जागतिक ग्राहक हक्क दिन साजरा केला गेला., ज्याची मुख्य थीम सुरक्षित उत्पादने, आत्मविश्र्वासपूर्ण ग्राहक होती., जी उत्पादनांची सुरक्षा, डिजिटल फसवणूक रोखणे आणि ग्राहक सक्षमीकरणावर भर देते. ह्या दिवशी ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन संस्था महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने ग्राहकांना त्यांच्या हक्कांबद्दल (सुरक्षा, माहिती, निवड, सुनावणी, निवारण, शिक्षण) जागरूकता निर्माण करते. यावेळी ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन समिती महाराष्ट्र राज्याचे संस्थापक प्रदेशाध्यक्ष तथा राज्याध्यक्ष बी.जी.शिंदे यांनी मार्गदर्शनपर तथा तज्ञ व्यक्ती म्हणून मार्गदर्शन करताना म्हणाले की, २०२६ ची संकल्पना (ढहशाश): सुरक्षित उत्पादने, आत्मविश्र्वासपूर्ण ग्राहक व याचे उद्देश असे आहेत. डिजिटल युगात सुरक्षित खरेदी, गुणवत्तापूर्ण उत्पादने मिळवणे आणि ग्राहक हक्कांचे संरक्षण करणे असे असून महत्त्वाचे ग्राहक हक्क, सुरक्षेचा अधिकार, धोकादायक वस्तूंपासून संरक्षण, माहितीचा अधिकार, वस्तूची गुणवत्ता, किंमत आणि शुद्धता जाणून घेणे, निवडीचा अधिकार, स्पर्धात्मक किंमतीत उत्पादने निवडणे, सुनावणीचा अधिकार, ग्राहक मंचासमोर तक्रार मांडणे, निवारण अधिकार, फसवणूक झाल्यास नुकसान भरपाई मिळवणे हे आहेत. .

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी**
**शिरूर अनंतपाळ यांचे कार्यालय**
**(दंडीय – विभाग)**
**जा. क्र.२०. मएजी/कावि दि.:–//२०२६**

## जाहिर प्रगटन

**जन्म/ मृत्यु नोंदणी बाबत.**

श्री. कासीम दावलजी पटेल विरुध्द ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय तुरुकवाडी ज्याअर्थी नामे. शमाफरहीन कासीम पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरूर अ. रोजी जि. लातूर यांचा/ यांच्या मुलाचा/मुलीचा/माताचा/नातीचा जन्म दि. १४/०६/१९८२ मौजे. तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे झाला आहे. ज्याअर्थी अर्जदार कासीम दावलजी पटेल रा. तुरुकवाडी यांनी या न्यायालयात त्यांच्या मुलाच्या/मुलीच्या/नाताच्या/नातीच्या जन्माची नोंद करण्यासाठी आदेशीत करावे असा अर्ज दाखल केला आहे. त्या पृष्ठयार्थ त्यांनी शपथपत्र व ग्रामपंचायत कार्यालय तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे त्यांच्या जन्माबाबतची नोंद नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले आहे.

त्याअर्थी सदरहू नामे शमाफरहीन कासीम पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरूर अनतपाळ जि. लातूर हयाचा/ हिचा जन्म दिनांक. १४/०६/१९८२ रा. तुरुकवाडी रोजी झाला नाही, असे कोणास सांगावयाचे असेल, तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू नामे शमाफरहीन कासीम पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर यांचा जन्म तारखेबाबत लागलहीच पुरावा घेवून अर्जदाराच्या हक्कात सदरहू जन्म तारखेबाबत आदेश देण्यात येईल.

पुढील तारीख १५ दिवसानंतर

स्वाक्षरित/-
**तहसिलदार तथा**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**शिरूर अनंतपाळ**

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com सोलापूर तरुण भारत

## आळणीच्या श्रद्धा निंबाळकरचा नवोदयमध्ये झेंडा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ मार्च -**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आळणी येथे नवोदय विद्यालयात प्रवेश मिळवलेल्या श्रद्धा गणेश निंबाळकर हिचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. श्रद्धाच्या यशामागील आई-वडील व मार्गदर्शिका श्रीमती सावळकर यांचाही यावेळी विशेष सन्मान करण्यात आला.

याच वेळी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या १४ विद्यार्थ्यांचाही ग्रामपंचायत आळणीच्या वतीने गौरव करण्यात आला.



मुख्याध्यापक बशीर तांबोळी यांनी सांगितले की, श्रद्धा नवोदय प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांमध्ये प्रथम ठरली असून चार राज्यांमध्ये सातवा क्रमांक मिळवून शाळेचे नाव उज्वल केले आहे. आळणी पॅटर्न निमाण होत असल्याचा अभिमान त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमास सरपंच प्रमोद वीर, तंटामुक्त समिती अध्यक्ष श्याम बापू लावंड, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पेठे यांनी केले, तर आभार प्रदर्शन राधाबाई वीर यांनी मानले.

## अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतीचे नुकसान

### तातडीने मदत करण्याची उबाठाचे आ. प्रविण स्वामी यांची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ मार्च -**

धाराशिव जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारे व गारपीटीमुळे शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर धाराशिवचे आ. कैलास पाटील व उमरगा-लोहारा मतदारसंघाचे आ. प्रविण स्वामी यांनी विधानभवन येथे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांची भेट घेऊन तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली.



मंगळवार, दि.१७ मार्च रोजी धाराशिव-उमरगा-लोहारा परिसरात दुपारच्या सुमारास अचानक वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस व गारपीट झाली. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. द्राक्ष, केळी, आंबा यांसारख्या फळबागांसह कांदा, हरभरा, गहू, ज्वारी या पिकांचे हजारो हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. गारपीटीमुळे अनेक ठिकाणी उभी पिके जमिनीवर आडवी पडून पूर्णतः नष्ट झाली असून, हातातोंडाशी आलेले पीक वाया गेले आहे. त्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले असून, तातडीच्या मदतीची गरज निर्माण झाली आहे.

संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे करण्याचे आदेश देऊन शेतकऱ्यांना विलंब न करता नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी ठाम मागणी आमदारांनी केली आहे.

## बामणी शिवारात वीजतारा व ऑटो रिक्षा चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ मार्च -**

बामणी शिवारातील शेतातून अज्ञात चोरट्यांनी वीज तारा व ऑटो रिक्षा चोरी केल्याची घटना उघडकीस आली असून, सुमारे २ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास करण्यात आला आहे.

**२.२० लाखांचा मुद्देमाल लंपास**

याबाबत मनोज अशोक गोडाम (वय ३७, रा. पिजदुरा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. १७ मार्च रोजी पहाटे ५.३० वाजण्याच्या सुमारास बामणी शिवारातील गट नं. ४६४ मधील धोंडीबा कोंडाप्पा आरबळके यांच्या शेतातून ३०० किलो इलेक्ट्रिक ल्युमिनियम जर्मन तारा व ८ रोलर ऑटो रिक्षा असा एकूण २,२०,००० रुपयांचा माल चोरीस नेण्यात आला. या प्रकरणी बेंबळी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## महापौर समीर राजूरकर यांचा तुळजापूरात सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१८ मार्च -**

संभाजीनगर येथील नवनिर्वाचित भाजपचे महापौर समीर राजूरकर यांनी सहकुटुंब तुळजापूर येथे येऊन तुळजाभवानी देवीचे दर्शन घेतले. यानंतर पाटील-कदम परिवाराच्या वतीने राजूरकर दाम्पत्यांचा सत्कार करण्यात आला.

समीर राजूरकर हे तुळजापूर येथील काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब पाटील यांचे जावई आहेत. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा काँग्रेस जिल्हाध्यक्ष धीरज पाटील व ज्येष्ठ नेते माधव कुतवळ यांनी मनोगत व्यक्त केले.

यानंतर रोटरी क्लब व शहरातील विविध सामाजिक संस्थांच्या वतीनेही राजूरकर यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास शहरातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तुळजापूर येथे २२ रोजी लिंगायत समाज अधिवेशन

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१८ मार्च -**

लिंगायत महासंघ, जिल्हा धाराशिव शाखेच्या वतीने दि. २२ रोजी तुळजापूर येथील त्रिमूर्ती मंगल कार्यालयात भव्य लिंगायत समाज अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या अधिवेशनात महात्मा बसवेश्वरांच्या विविध तत्त्वांवर सखोल चर्चा करण्यात येणार असून, लातूर, सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये विजयी झालेल्या उमेदवारांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. तसेच सामूहिक ईष्टलिंग पूजा, 'समाज भूषण', 'जीवनगौरव' आणि 'अक्का महादेवी' पुरस्कारांचे वितरणही यावेळी होणार आहे. अधिवेशनास सर्व समाज बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन लिंगायत महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. सुदर्शन बिराजदार यांनी लोहारा येथे आयोजित बैठकीत केले.

दरम्यान, ही बैठक महात्मा बसवेश्वर मंदिरात पार पडली. यावेळी लिंगायत महासंघाचे तालुकाध्यक्ष शंकर अण्णा जट्टे, उपाध्यक्ष दत्तात्रय बिराजदार, सचिव तथा नगरसेवक जालिंदर कोकणे, जिल्हा उपाध्यक्ष वैजनाथ जट्टे, बसवराज बिडवे, ओम कोरे, राजू स्वामी आदी उपस्थित होते.

## नारंगवाडी येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर' संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१८ मार्च -**

तालुक्यातील नारंगवाडी येथे तहसिल कार्यालय, उमरगा अंतर्गत महसूल मंडळ नारंगवाडी यांच्या वतीने 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान टप्पा क्र. १' अंतर्गत जयराम विद्यालयात कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या शिबिरात उपस्थित राहून विविध शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांशी संवाद साधण्यात आला. शासनाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व विभागांचे स्वतंत्र स्टॉल उभारण्यात आले होते. संबंधित स्टॉलना भेट देऊन योजनांची माहिती घेण्यात आली तसेच नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या.

कार्यक्रमास मा.खा.प्रा. रविंद्र गायकवाड, पंचायत समिती सभापती ॲड. आकांक्षा चौगुले, उपविभागीय अधिकारी दत्तु शेवाळे, तहसीलदार गोविंद येरमे, नायब तहसीलदार अमित भारती, भीमाशंकर बेरूळे, तालुका कृषी अधिकारी ज्ञानोबा रितापुरे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. उमाकांत बिराजदार, पंचायत समिती सदस्या रूक्मीणी कांबळे, सरपंच शेखर घंटे यांच्यासह भूमिअभिलेख, पंचायत समिती, सार्वजनिक आरोग्य, महसूल व पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा सोहळ्यास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१८ मार्च -**

तुळजापूर येथील शुक्रवार पेठ कणे गल्लीमध्ये दि.१७ ते २४ मार्चपर्यंत अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा सोहळ्यास प्रारंभ झाला आहे.

या कार्यक्रमाची सुरुवात १७ मार्च रोजी करण्यात आली असून कथा प्रवक्ते हभप. तुकाराम महाराज शास्त्री आणि हभप. पांडूरंग महाराज रेड्डी हे भाविकांना मार्गदर्शन करणार आहेत. दि.२४ मार्च रोजी हभप. तुकाराम महाराज शास्त्री यांचे काल्याचे किर्तन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात परिसरातील भाविक भक्तांना हरिनाम सप्ताह आणि भागवत कथेचा लाभ घेता येईल, असे आयोजकांनी सांगितले आहे.

## स्त्रियांनी कायद्याचा उपयोग सबलीकरणासाठी करावा : ॲड. पोतदार

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१८ मार्च -**

स्त्री ही अबला नसून सबला आहे. समाज आणि कुटुंब या दोन्ही पातळ्यांवर तिची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. आज महिलांच्या सबलीकरणासाठी विविध कायदे अस्तित्वात असून त्याचा मोठ्या प्रमाणात महिलांना लाभ होत आहे. मात्र, महिलांनी या कायद्यांचा उपयोग स्वतःच्या प्रगतीसाठी आणि एकतेसाठी करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन ॲड. शुभदा पोतदार यांनी केले.



त्या उमरगा येथील कुंभारवाडा परिसरातील देवी मंदिरात आयोजित महिला दिनानिमित्त कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या. यावेळी विविध मनोरंजनात्मक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

कार्यक्रमास अश्विनी जोशी, डॉ. साधना इनामदार, प्रिया पवार, नगरसेविका आरती शिंदे, शिवाई किरण गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ब्राह्मण महिला संघटनेच्या वतीने 'फोटोला फुले वाहणे', 'बकेटमध्ये बॉल टाकणे', 'बिस्कीट खाणे', 'उखाणे' अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

कार्यक्रमाला ब्राह्मण महिला संघटनेच्या अध्यक्षा कल्पना होदलुरकर, अश्विनी जोशी, अनिता बडवे, धनश्री मुरूमकर यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या. सूत्रसंचालन रंजना पाटील यांनी केले.

## नळदुर्गात शासकीय कामात अडथळा

**नळदुर्ग, दि.१८ मार्च -**

गंधोरा शिवारात सुरू असलेल्या पवनचक्की तारा ओढण्याच्या कामात अडथळा निर्माण करून कामगारांना मारहाण केल्याप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १६ मार्च रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास गंधोरा शिवारातील गट क्रमांक २८४, २८५ येथे शासकीय काम सुरू असताना रुक्मिणी कल्लाप्पा राठोड (रा. गंधोरा तांडा), रेणुका राजेश राठोड व राजेश राठोड (रा. खोपोली, जि. रायगड) यांनी कामात अडथळा निर्माण केला.

## येडेश्वरी यात्रेसाठी गॅस टंचाई टाळा

### १५ दिवसांचा अतिरिक्त कोटा देण्याची मागणी...



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१८ मार्च -**

येरमाळा येथील प्रसिद्ध श्री येडेश्वरी देवीच्या चैत्र पौर्णिमा यात्रेदरम्यान कमर्शियल गॅस सिलेंडरचा तुटवडा भासू नये, यासाठी किमान १० ते १५ दिवसांसाठी अतिरिक्त गॅस कोटा मंजूर करून सुरळीत पुरवठा करावा, अशी मागणी स्थानिक व्यावसायिक व ग्रामस्थांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.




यासंदर्भातील निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांनी स्वीकारले असून, त्यासोबत देवस्थान ट्रस्ट व ग्रामपंचायत कार्यालयाचे अधिकृत पत्रही जोडण्यात आले आहे. येरमाळा येथे दरवर्षी चैत्र पौर्णिमेनिमित्त पारंपरिक व भव्य स्वरूपाची यात्रा भरते. या यात्रेला जिल्ह्यासह राज्याच्या विविध भागांतून लाखो भाविक उपस्थित राहतात. दरवर्षी सुमारे १० ते १५ लाख भाविक देवीच्या दर्शनासाठी येत असल्याने संपूर्ण परिसरात मोठ्या प्रमाणावर व्यापार-व्यवसायाला चालना मिळते.

यात्रेदरम्यान हॉटेल व्यवसाय, मिठाई विक्रेते, खानावळी तसेच विविध खाद्यपदार्थ व प्रसाद विक्री करणारे तात्पुरते स्टॉल मोठ्या संख्येने उभारले जातात. या वाढलेल्या गर्दीमुळे कमर्शियल गॅस सिलेंडरची मागणी नेहमीपेक्षा अनेक पटींनी वाढते. सध्याचा उपलब्ध गॅस पुरवठा या वाढत्या मागणीसमोर अपुरा पडण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

परिणामी, व्यावसायिकांना कामकाजात अडथळे येण्याबरोबरच भाविकांनाही आवश्यक सुविधा मिळण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात.

या पार्श्वभूमीवर यात्रेच्या कालावधीत किमान १० ते १५ दिवसांसाठी अतिरिक्त गॅस कोटा मंजूर करून संबंधित गॅस वितरक व एजन्सींमार्फत तात्काळ व सुरळीत पुरवठा करण्यात यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच संभाव्य तुटवडा टाळण्यासाठी प्रशासनाने आगाऊ नियोजन करून आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशीही अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

यात्रेच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने वेळीच सकारात्मक पावले उचलल्यास गॅस टंचाई टाळता येईल आणि लाखो भाविकांची गैरसोय होणार नाही, असा विश्वास स्थानिक नागरिक व व्यावसायिकांनी व्यक्त केला आहे.

## रमजानमध्ये 'एहसास'ची मानवतेची सेवा; १५० राशन किटसह विविध उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१८ मार्च -**

पवित्र रमजान महिन्याच्या निमित्ताने कळंब येथील सामाजिक कार्यात सक्रिय असलेल्या एहसास फाउंडेशनच्या वतीने यावर्षी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने संस्थेतर्फे सुमारे १५० रमजान राशन किटचे वाटप करण्यात आले.



एहसास फाउंडेशनने रमजानच्या पवित्र महिन्यात जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप करून अनेक गरजू कुटुंबांना दिलासा दिला. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर गरीब कुटुंबांना आपला उपवास (रोजा) सुखाचा करता यावा आणि अन्नासाठी भटकंती करावी लागू नये, हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू होता. या किटमध्ये महिनाभर पुरेल इतके गहू, तांदूळ, तेल, डाळी, साखर, चहापत्ती तसेच रमजानसाठी आवश्यक खजूर यांचा समावेश करण्यात आला होता. स्वयंसेवकांनी स्थानिक पातळीवर सर्वेक्षण करून खऱ्या गरजूंची निवड केली आणि अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने किटचे वाटप पूर्ण केले.

या उपक्रमांतर्गत कळंब तालुक्यातील विविध गावांमध्ये २० ते ३० राशन किट गरजू कुटुंबांपर्यंत पोहोचविण्यात आले.

विशेष म्हणजे मुस्लिम समाजासोबतच काही गरजू हिंदू बांधवांनाही या मदतीचा लाभ देण्यात आला. गरज आणि परिस्थिती पाहून धर्मभेद न करता मदतीचा हात देणे हा फाउंडेशनचा मुख्य उद्देश असल्याचे यावेळी स्पष्ट झाले.

याशिवाय रमजान महिन्यात बाहेरगावाहून आलेल्या रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी, ज्यांना सहरीची व्यवस्था करणे शक्य होत नाही, अशा गरजूंना सहरी टिफिन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. तसेच नागरिकांच्या सोयीसाठी रमजान टाइमटेबल कार्डचेही वितरण करण्यात आले. या सामाजिक उपक्रमासाठी अनेक दानशूर नागरिकांनी जकात, सदकात व सहकार्याच्या माध्यमातून आर्थिक मदत केली. विशेष म्हणजे मुस्लिम समाजाबरोबरच हिंदू बांधवांनीही उदारपणे सहकार्य केल्याने हा उपक्रम अधिक व्यापकपणे राबविणे शक्य झाले.

याबाबत फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अमन इसाक शेख म्हणाले, समाजातील गरजू व वंचित घटकांना मदतीचा हात देणे हेच आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. रमजानमध्ये मिळालेल्या सहकार्यामुळे हा उपक्रम यशस्वी झाला. भविष्यात दिवाळी सणानिमित्त गरजू हिंदू बांधवांसाठीही राशन किट वाटप करण्याचा मानस आहे.

एहसास फाउंडेशन गेल्या काही वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबवत असून त्यांच्या या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. नागरिकांनीही या उपक्रमाचे स्वागत करत फाउंडेशनच्या कार्याला दाद दिली आहे.

## जिल्हा परिषद परिसरात मानधनवाढीसाठी आशाताईंचे आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ मार्च -**

महाराष्ट्र राज्य आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक महासंघ यांच्या वतीने आशासेविका व गटप्रवर्तकांनी मानधनवाढीसाठी सोमवारी जिल्हा परिषद कार्यालयासमोर आंदोलन केले. सुमारे तीन तास चाललेल्या या आंदोलनात आशासेविकांनी आपल्या विविध मागण्यांसाठी जोरदार घोषणाबाजी केली.

जिल्ह्यात कार्यरत असलेल्या सुमारे १३०० आशासेविका व ६० गटप्रवर्तकांनी या आंदोलनात सहभाग घेतला.

आंदोलनादरम्यान त्यांनी काम बंद ठेवल्यामुळे ग्रामीण भागातील लसीकरण मोहीम, गृहभेटी, माता बैठका तसेच गरोदर महिलांना दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवांवर परिणाम झाला.

आंदोलनादरम्यान आशासेविकांना किमान २५ हजार रुपये व गटप्रवर्तकांना ३५ हजार रुपये मानधन देण्यात यावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली.

तसेच गटप्रवर्तकांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यात यावा व मागील तीन महिन्यांपासून प्रलंबित असलेले मानधन तात्काळ अदा करावे, अशी मागणीही करण्यात आली.

ग्रामीण आरोग्य व्यवस्थेचा कणा मानल्या जाणाऱ्या आशासेविकांच्या मागण्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने या आंदोलनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

आंदोलनात जिल्हा संघटक सुरेखा ठाकूर, नवनाथ धुमाळ यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना कळवण्यात येते की तुकडी **जिल्हा धाराशिव,** पोट तुकडी **तालुका उमरगा, गाव - मातोळा**, येथील **गट नंबर १०४** यांसी एकूण **क्षेत्र ० हेक्टर ३९ आर** इथून पुढे '**सदर मिळकत**' असे संबोधलेले आहे. सदर मिळकत ही **श्री. सचिन अनिल राजनाळे** यांचे मालकीची असून, त्यांनी ती **स्वाती इरण्णा पाटील** यांना, आमच्या अशील कंपनीच्या म्हणजेच इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या पेट्रोलपंपासाठी देऊ केलेली आहे.

सदर मिळकतीवर बांधण्यात येणाऱ्या आमच्या अशील कंपनीच्या म्हणजेच इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या पेट्रोल पंपासंदर्भात ही नोटीस देण्यात येत आहे. सदर मिळकत ही संपूर्णपणे निर्दोष, निर्जोखमी व बोजारहीत असल्याची, तसेच सदर मिळकतीबाबत कोणत्याही कोर्टात वादाचा विषय नसून त्यावर जप्ती अथवा मनाईचा हुकूम नाही अशी खात्री व भरवसा आमच्या अशिलांना म्हणजेच इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड यांना दिला आहे तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लीज, लोन, बक्षीस, ताबा, पोटगी, दावा, कुळ, खंड, साठेखत, खरेदीखत इत्यादी कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत आमच्याकडे समक्ष येऊन, मूळ कागदपत्रांनिशी त्याबाबत आमची खात्री पटवून द्यावी.

येणेप्रमाणे मुदतीत मूळ कागदपत्रांनिशी आक्षेप न आल्यास, सदर मिळकतीवर, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध अधिकार नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजण्यात येईल व व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. सबब जाहीर नोटीस दिली असे.

**सोलापूर, दिनांक १८/०३/२०२६.**

तर्फे
**ॲड. श्री. आनंद रामचंद्र देशपांडे**
बी.ए., एल.एल.बी., एम.ए. (इतिहास)
पत्ता : ९१/अ, मुरारजी पेठ, सोलापूर ४१३००१
मो. नं. : ९८२३२९१६४३

CMYK

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## विराज लांडगेचा नवोदय परीक्षेत यश; राज्यात १५ वा क्रमांक

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१८ मार्च -**

तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खोंदला येथील विद्यार्थी विराज विकास लांडगे याने जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत ९७.५० टक्के गुण मिळवून पहिल्या यादीत स्थान मिळवले आहे. राज्यस्तरावर १५ वा, तर जिल्ह्यात ९ वा क्रमांक मिळवत त्याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

ग्रामीण मराठी शाळेत शिक्षण घेत असतानाही विराजने मेहनत, चिकाटी आणि जिद्दीच्या जोरावर हे यश मिळवले.



त्याच्या या यशामुळे खोंदला गावासह कळंब तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शाळेतील शिक्षक, मुख्याध्यापक व ग्रामस्थांनी त्याचे कौतुक केले असून, विराजने या यशाचे श्रेय आई-वडील, शिक्षक आणि चुलते तथा जिल्हा परिषद विशेष शिक्षक प्रकाश लांडगे यांना दिले आहे. भविष्यात उच्च शिक्षण घेऊन देशसेवा करण्याचा त्याचा निर्धार आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### तेरखेड्यात कामगारांना साहित्य किटचे वाटप

**वाशी, दि.१८ मार्च -**

शासनाकडून राज्यभर बांधकाम व इतर कामगारांसाठी आवश्यक साहित्य किटचे वाटप करण्यात येत असून या योजनेचा लाभ ग्रामीण भागातील कामगारांना मोठ्या प्रमाणात होत आहे. वाशी तालुक्यातही ही योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. तालुक्यातील तेरखेडा येथे (दि.१८) मार्च रोजी नागरिकांना १०० साहित्य किटचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात भैरवनाथ ग्रुपचे कार्यकारी संचालक केशव सावंत, जिल्हा परिषद सदस्य विकी चव्हाण तसेच नगरसेवक नागजी नाईकवाडे, बाळासाहेब मांगले यांच्या हस्ते किटचे वितरण करण्यात आले. यावेळी पूजा उकरंडे, हेमा कवडे तसेच इतर कामगार मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



### देवकुरुळीत गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**इटकळ, दि.१८ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील देवकुरुळी (केंद्र सुरतगाव) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता पहिली ते सातवीतील गुणवंत व आदर्श विद्यार्थ्यांचा सत्कार उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच हणमंत जाधव होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी मल्लिकार्जुन नरुणे (दुबई), साक्षी गणेश मोरे (दुबई), गणेश मोरे तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आदिनाथ जाधव व देविदास ताकमोगे उपस्थित होते. यावेळी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. एस.के.जी. फाउंडेशन, दुबई यांच्या वतीने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचा हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन काशीद यांनी केले, तर प्रास्ताविक मुख्याध्यापक डोंगरे यांनी केले. आभार जावळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षकवृंदांनी विशेष परिश्रम घेतले.

### नागार्जुन हब्बूचे नवोदय परीक्षेत यश

**इटकळ, दि.१८ मार्च -**

सन २०२५-२६ साठी घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवी नवोदय प्रवेश पात्र परीक्षेत जिल्हा परिषद



प्राथमिक शाळा हिप्परगा ताड येथील विद्यार्थी नागार्जुन मल्लिकार्जुन हब्बू याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्याने अनुसूचित जाती प्रवर्गातून जिल्ह्यात चौथा तर सर्वसाधारण प्रवर्गातून २७ वा क्रमांक मिळविला आहे. नागार्जुनचे वडील दूध फॅक्टरीमध्ये काम करतात, तर आई शेतमजुरी करते. प्रतिकूल परिस्थितीतही मेहनत व चिकाटीच्या जोरावर त्याने हे यश मिळविले आहे. त्याला सदाशिव शिंदे, रूपाली स्वामी, रमेश मस्के, बालिका बामणे तसेच युवा प्रशिक्षक ज्ञानेश्वर सोनटक्के यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल मुख्याध्यापक साखरे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष भीमा विभुते व ग्रामस्थांनी त्याचे कौतुक केले आहे.


### सुधाकर रणदिवे यांना पुरस्कार जाहीर

**कळंब, दि.१८ मार्च -**

कळंब तालुक्यातील ईटकुर येथील सामाजिक कार्यकर्ते सुधाकर माणिक रणदिवे यांना महाराष्ट्र



पोलीस मित्र सोशल असोसिएशन (महाराष्ट्र राज्य) यांच्या वतीने नेताजी सुभाषचंद्र बोस राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार-२०२६ जाहीर करण्यात आला आहे. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार जाहीर करण्यात आला असून, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन त्यांनी केलेले योगदान विशेष मानले गेले आहे. लवकरच आयोजित कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्काराबद्दल रणदिवे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



### निपाणीत गुढीपाडवा 'प्रवेश वाढवा' अभियान

**नायगाव, दि.१८ मार्च -**

कळंब तालुक्यातील निपाणी (केंद्र-पाडोळी) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत 'गुढीपाडवा प्रवेश वाढवा' या अभियानांतर्गत इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. कार्यक्रमास जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष, बीडीओ अकेले, जिल्हा रेशीम अधिकारी आरती वाकुरे, जिल्हा कृषी अधीक्षक राजकुमार गोरे, केंद्रप्रमुख महादेव मेनकुदळे, सरपंच नवनाथ गुंड, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष अक्षय पाटील यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# पवनचक्की तारा चोरी प्रकरण उघड; ७५० किलो मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ मार्च -**

जिल्ह्यातील पवनचक्कीवरील ल्युमिनियम तारा चोरी प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत ७५० किलो वजनाच्या सुमारे ३ लाख ७५ हजार रुपयांच्या तारांसह दोन आरोपींना ताब्यात घेतले असून तब्बल ८ गुन्ह्यांची उकल केली आहे.

दि.१७ मार्च रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि. सुदर्शन कासार व पथक पेट्रोलिंग करत असताना गोपनीय माहितीच्या आधारे बालाजी उर्फ आवड्या अजिनाथ शिंदे (वय २४) व शहाजी भीमराव शिंदे (वय ३२, दोघे रा. मांडवा, जि. धाराशिव) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या ताब्यात पवनचक्कीतील चोरीचा ल्युमिनियम तारा लपवून ठेवलेला असल्याचे आढळून आले.

चौकशीत आरोपींनी तुळजापूर व वाशी तालुक्यातील नळदुर्ग, चिवरी, मानेवाडी, जिन्नर, दहिफळ शिवारातून पवनचक्कीच्या खांबांवरून तारा चोरी केल्याची कबुली दिली. जिल्हा गुन्हे अभिलेख तपासात अशा प्रकारचे ८ गुन्हे नोंद असल्याचे निष्पन्न झाले.

पोलिसांनी पंचनामा करून एकूण ७५० किलो वजनाच्या ल्युमिनियम तारांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपींनी इतर साथीदारांचीही माहिती दिली असून पुढील तपास सुरू आहे. आरोपींना वैद्यकीय तपासणीनंतर वाशी पोलीस ठाण्यात पुढील कारवाईसाठी हजर करण्यात आले.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सपोनि सुदर्शन कासार व त्यांच्या पथकाने बजावली.

## गारपीटीने शेतकरी संकटात; तात्काळ मदत द्या

**डॉ. प्रतापसिंह पाटील यांची मागणी**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ मार्च -**

अलीकडील अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) चे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



धाराशिव जिल्ह्यात गेल्या काही दिवसांत झालेल्या गारपिटीमुळे उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. विशेषतः रब्बी हंगामातील गहू, हरभरा, ज्वारी तसेच फळबागांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी पिके पूर्णपणे जमीनदोस्त झाली असून शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. आधीच वाढते उत्पादन खर्च, बाजारातील अनिश्चित दर यामुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांवर या नैसर्गिक आपत्तीमुळे दुहेरी संकट ओढवले आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत तात्काळ पंचनामे करण्यात यावेत. नुकसानाचे अचूक मूल्यांकन करून शासनाच्या नियमांनुसार शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक मदत देण्यात यावी. तसेच शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने विशेष मदत पॅकेज जाहीर करावे, अशीही मागणी त्यांनी केली आहे.

यावेळी त्यांनी प्रशासनाने संवेदनशीलता दाखवून शेतकऱ्यांच्या अडचणींची तात्काळ दखल घ्यावी व मदत कार्यात विलंब होऊ नये, असेही स्पष्ट केले. नैसर्गिक आपत्तीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना आधार देणे ही शासनाची जबाबदारी असून, त्यासाठी त्वरीत कार्यवाही आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

## धाराशिवात जनावरांची निर्दयी वाहतूक; ४.१५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ मार्च -**

शहरातील सय्यदनगर परिसरात गोवंशीय जनावरांची निर्दयीपणे वाहतूक करत कत्तलीसाठी नेण्याचा प्रकार उघडकीस आला असून पोलिसांनी कारवाई करत आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.१७ मार्च रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास वासू वैराग रोड, सय्यदनगर येथे लिलॅन्ड कंपनीच्या एमएच २५ पी ५७१८ या चारचाकी वाहनात एक जर्सी गाय व गावरान गायी असे गोवंशीय जनावरे चारा-पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने बांधून ठेवलेले आढळले. या जनावरांची कत्तलीसाठी बेकायदेशीर वाहतूक केली जात असल्याचे समोर आले. या प्रकरणी मैनोद्दीन उमर शेख (वय ३७, रा. फकीरा नगर, वैराग नाका, धाराशिव) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पोलिसांनी वाहनासह सुमारे ४ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून पुढील तपास सुरू आहे.

### वाहनधारकांकडून १.४३ लाखांचा दंड वसूल

**धाराशिव, दि.१८ मार्च -**

शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांनी दि.१७ मार्च रोजी महत्त्वाच्या रस्त्यांवर नियमभंगाविरुद्ध धडक कारवाई केली. या कारवाईत एकूण १९६ प्रकरणे नोंदवून १ लाख ४३ हजार ५० रुपयांचे तडजोड शुल्क वसूल करण्यात आले.

## भुममध्ये घरफोडी; सोन्या-चांदीसह ९८ हजारांचा मुद्देमाल लंपास

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१८ मार्च -**

शहरातील शिशंकर नगर परिसरात अज्ञात चोरट्यांनी बंद घर फोडून सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह मोबाईल असा एकूण



९८,७०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना घडली आहे.

याबाबत नारायण दत्तोबा नाइकनवरे (वय ३२, रा. शिशंकर नगर, भुम) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि.१६ मार्च रोजी अज्ञात व्यक्तीने घराचे गेट उघडून आत प्रवेश केला. घरातील किचनमधील डब्यात ठेवलेले सुमारे २० ग्रॅम सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने व मोबाईल फोन असा ऐवज चोरीस नेण्यात आला.

या प्रकरणी भुम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## धनंजय सावंत परिवारासह अनेकांचे भाजपात प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ मार्च -**

भारतीय जनता पार्टीच्या विचारसरणीवर विश्वास ठेवत जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत आणि त्यांच्या परिवारासह अनेकांनी आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपाच्या प्रदेश कार्यालयात पक्षप्रवेश सोहळा पार पडला. या सोहळ्यात प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण प्रमुख उपस्थित होते.

ज्योती धनंजय सावंत, संजय सावंत, सोहम सावंत, अजिंक्य सावंत यांच्यासह गौतम लटके, दत्तात्रय मोहिते, जयदेव गोफणे आणि अनेक कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला, ज्यामुळे पक्षाची ताकद अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त केला गेला.

सोहळ्यात धाराशिव भाजप जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, धनंजय सावंत, अनिल काळे, संताजी चालुक्य यांच्यासह जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

## झेडपीवर प्रथमच भाजपाचा झेंडा; जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्याकडून प्रदेशाध्यक्षांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ मार्च -**

जिल्हा परिषदेवर प्रथमच भारतीय जनता पार्टीचा झेंडा फडकवून ऐतिहासिक विजय मिळाल्यानंतर तसेच जिल्हा परिषद अध्यक्षपदी अर्चनाताई पाटील यांची निवड झाल्याबद्दल जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी मुंबई येथील भाजपा प्रदेश कार्यालयात महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले.

या विजयामागे प्रदेश नेतृत्वाचे योग्य मार्गदर्शन, जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मेहनत आणि जनतेचा भारतीय जनता पार्टीवर असलेला दृढ विश्वास यांचा मोठा वाटा आहे, असे सांगितले. आगामी काळातही विकासाची हीच गती कायम ठेवत धाराशिव जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सर्वजण एकत्रितपणे काम करू, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी प्रदेश नेतृत्वाकडून पुढील राजकीय व संघटनात्मक वाटचालीबाबत मार्गदर्शनही लाभले. भारतीय जनता पार्टीच्या विचारधारेवर ठाम राहून जनतेच्या सेवेसाठी सदैव कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला गेला. यावेळी मल्हार पाटील, धनंजय सावंत, अभय चालुक्य, हर्षवर्धन चालुक्य, शहाजी पाटील आदी उपस्थित होते.

## खोताचीवाडीत आजपासून अखंड हरिनाम सप्ताह

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.१८ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील खोताचीवाडी (मंगरुळ) येथे गुढी पाडव्याचे औचित्य साधून अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. यंदा या सोहळ्याचे १० वे वर्ष असून गावात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे.



मंगळवार, दि.२४ मार्च ते सोमवार, दि.३० मार्च दरम्यान हनुमान मंदिरात हा सोहळा पार पडणार आहे. सप्ताहात पहाटे काकडा भजन, सकाळी पारायण, दुपारी महाप्रसाद व रात्री हरिकीर्तन असे विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. तसेच मध्यरात्री 'जागर' करून विठ्ठल-रुक्मिणी नामघोष केला जाणार आहे.

या सोहळ्यात राज्यातील नामवंत कीर्तनकारांची उपस्थिती लाभणार असून भाविकांना सुश्राव्य कीर्तनांचा लाभ घेता येणार आहे.

सोमवार, दि.३० मार्च रोजी हभप. माधवबाबा नामदास महाराज (पंढरपूर) यांच्या काल्याच्या कीर्तनाने व महाप्रसादाने सोहळ्याची सांगता होणार आहे.

## नळदुर्ग नगरपालिकेत हितसंबंध संघर्षाचा आरोप

**चौकशी व निलंबनाची मागणी**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१८ मार्च -**

नळदुर्ग नगरपालिकेतील तात्कालीन मुख्याधिकारी व तांत्रिक सल्लागार यांच्याकडून हितसंबंधांचा संघर्ष व नियमबाह्य कामकाज झाल्याचा आरोप करत नगरसेवक सुधीर पोतदार यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे चौकशी करून संबंधितांवर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी केली आहे.

दिलेल्या निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, नगरपालिकेने तांत्रिक सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या अजहर जिलानी कुरेशी यांना त्याच नगरपालिकेतील विविध विकासकामांची कंत्राटे देण्यात आली. रहीम नगर परिसरातील रस्ता व




गटार बांधकामाच्या विविध कामांसाठी लाखो रुपयांची निविदा मंजूर करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.

तांत्रिक सल्लागार म्हणून संबंधित व्यक्ती ही कामांच्या मंजुरी, तपासणी व पडताळणी प्रक्रियेत सहभागी असताना त्याच्याकडून कंत्राटी कामे घेणे हा स्पष्ट हितसंबंधांचा संघर्ष असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच तत्कालीन मुख्याधिकाऱ्यांनी नियमांचे उल्लंघन करून ही कामे मंजूर केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

या प्रकरणात महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ तसेच भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अंतर्गत चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. संबंधित कामांची कागदपत्रे, निविदा प्रक्रिया, अंदाजपत्रके व देयकांची सखोल तपासणी करून दोषींवर प्रशासकीय व फौजदारी कारवाई करावी, तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

या निवेदनाच्या प्रती विभागीय आयुक्त, नगरविकास मंत्री व नगराध्यक्ष, नळदुर्ग नगरपरिषद यांनाही देण्यात आल्या आहेत.

# धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वे मार्गासाठी १००० कोटींची द्यावे

**खा. ओमराजे निंबाळकर यांनी रेल्वे अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली मागणी**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ मार्च -**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात रेल्वे मंत्रालयाच्या अनुदान मागण्यांवरील चर्चेदरम्यान धाराशिव लोकसभा मतदारसंघाचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी मराठवाड्यातील प्रलंबित रेल्वे प्रश्नांवर ठाम आणि आक्रमक भूमिका मांडत केंद्र सरकारचे लक्ष वेधले. मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी सक्षम रेल्वे सुविधा अत्यावश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

धाराशिव-तुळजापूर-सोलापूर या महत्त्वाच्या रेल्वे मार्गासाठी तात्काळ १००० कोटी रुपयांची तरतूद करावी, अशी प्रमुख मागणी त्यांनी केली. या प्रकल्पासाठी एकूण सुमारे २००० कोटी रुपयांची आवश्यकता असून केंद्राचा हिस्सा लवकर मंजूर करावा, असे त्यांनी सांगितले. तुळजापूरला रेल्वेने जोडण्याचे आश्वासन अद्याप अपूर्ण



असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. लातूर, धाराशिव आणि बार्शी परिसरातील प्रवाशांची गैरसोय लक्षात घेता लातूर-पुणे इंटरसिटी गाडी तातडीने सुरू करण्याची मागणी करण्यात आली. तसेच हरंगूळ-पुणे गाडी सध्या हडपसरपर्यंतच धावत असल्याने ती पूर्वीप्रमाणे पुणे मुख्य स्थानकापर्यंत चालवावी, असेही त्यांनी नमूद केले.

याशिवाय, कळंब रोड स्थानकावर लातूर-मुंबई गाडीला आणि ढोकी स्थानकावर नांदेड-पनवेल गाडीला थांबा देण्याची मागणी करण्यात आली.

धाराशिव ते छत्रपती संभाजीनगर या नवीन रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षणासाठी मंजूर निधीबद्दल समाधान व्यक्त करत हे सर्वेक्षण तातडीने पूर्ण करावे, असे त्यांनी सांगितले.

धाराशिव-छत्रपती संभाजीनगर थेट रेल्वे मार्गाची गरज अधोरेखित करत त्यांनी या प्रकल्पाला गती देण्याची मागणी केली.

या मार्गाच्या सर्वेक्षणासाठी मंजूर ६ कोटी रुपयांबद्दल त्यांनी रेल्वे मंत्रालयाचे आभार मानले, मात्र सर्वेक्षण लवकर पूर्ण करून प्रत्यक्ष काम सुरू करावे, अशी ठाम भूमिका त्यांनी व्यक्त केली.

